महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Maharashtracrimetimes.com MHCrimeTimes MAHCrimeTimes 9803386748 maharashtracrimetimes@gmail.com

मूल्य २/- रुपये

• संपादकः राकेश शंकर गोरे | वर्षः १५, अंकः १९, पृष्ठः ८ | मुंबई, मंगळवार ६ ऑगस्ट २०२४ ते सोमवार १२ ऑगस्ट २०२४ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

## संक्षिप्त

### 'पाच वर्षानंतर पक्ष झोपेतून उठला', आदित्य ठाकरेंची राज ठाकरेंवर खोचक टीका

■ मुंबई : यश सावंत

विधानसभेची निवडणूक दोन महिन्यांवर येऊन ठेपली आहे. या निवडणुकीच्या आधी सर्वच राजकीय पक्षांनी आतापासून जोरदार तयारी सुरू



केली आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने पदाधिकाऱ्यांच्या बैठका, मेळावे, सभा, मतदारसंघांचे दौरे अशा प्रकारचं काम राजकीय नेत्यांकडून सुरु असल्याचं चित्र सध्या पाहायला मिळत आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे हे महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आहेत. त्यांच्या या दौऱ्यावरून शिवसेना ठाकरे गटाचे नेते, आमदार आदित्य ठाकरे यांनी हल्लाबोल केला आहे. 'पाच वर्षानंतर पक्ष झोपेतून उठला आहे. ते निवडणुकीच्या काळात जागे होतात', अशी खोचक आदित्य ठाकरे यांनी मनसेवर केली. 'पाच वर्षानंतर पक्ष झोपेतून उठलेला आहे. ते निवडणुकीच्या काळात जागे होतात. मग महाराष्ट्र पिंजून काढणार, असे त्यांचे दौरे चालतात. सुपारीबाज पक्ष आहे ते त्यांचं काम करतील. आम्ही आमचं जनतेच्या सेवेचं काम करत आहोत. गेल्या पाच वर्षांच्या काळात मग त्यामध्ये कोविडच्या काळात किंवा मुंबईत इतर काही घटना घडत असताना हा पक्ष दिसला तरी का?

### श्रावणात तीर्थस्थळी मोफत एसटी सेवा

■ मुंबई : गणेश बागडे

राज्य परिवहन (एसटी) महामंडळाच्या विविध आगारातून श्रावण महिन्यानिमित्त तीर्थक्षेत्री जाण्यासाठी 'श्रावणात एसटी संगे तीर्थाटन' हा अभिनव उपक्रम सोमवारपासून सुरू करण्यात येत आहे. त्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिक, महिला यांना मोफत आणि



माफक दरात तीर्थाटनाचा आनंद घेता येणार आहे. या उपक्रमात जास्तीत जास्त एसटी प्रवाशांनी लाभ घ्यावा, असे आवाहन एसटी महामंडळाने केले आहे. श्रावण मासात अनेक ठिकाणी धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल असते. त्या अनुषंगाने बहुतांश नागरिक कुटुंबासह तीर्थक्षेत्री जाण्याचे नियोजन करतात. त्यासाठी एसटीने 'श्रावणात एसटी संगे तीर्थाटन' हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. एसटीच्या प्रत्येक आगारातून श्रावण महिन्यात एकदिवसीय अथवा एक मुक्कामी धार्मिक सहलीचे आयोजन करण्यात येते. त्यात सर्व प्रकारच्या सवलती दिल्या जातील. अमृतमहोत्सवी ज्येष्ठांना मोफत, ज्येष्ठ नागरिक व महिलांना आणि १२ वर्षाच्या आतील मुलांना अर्धे तिकीट आकारण्यात येईल. गावातील महिला बचत गट, ज्येष्ठ नागरिक संघ, विविध सेवाभावी संस्था यांच्या पुढाकाराने अशाप्रकारे सांघिक सहलीचे आयोजन केले जाते.

# महाराष्ट्राला आरक्षणाची गरजच नाहीय, इथे सर्व मुबलक; केवळ मतांच्या राजकारणासाठी...




■ मुंबई : विशाल कारंडे

महाराष्ट्र नवनिर्माण सेना आगामी विधानसभा निवडणुकीत २२५ ते २५० जागा लढवणार असल्याची घोषणा मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी केली. विधानसभेच्या निवडणुची तयारी त्यांनी सुरु केली असून राज ठाकरे सध्या सोलापूर दौऱ्यावर आहेत. येथे पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी आरक्षण मुद्द्यावर भाष्य केले. या महाराष्ट्रात इतक्या गोष्टी मुबलक प्रमाणात आहेत की तिथे आरक्षणाची गरजच नाही. पुणे, नागपूर अशा ठिकाणी फ्लायओव्हर वैगेरे सुविधा का होतात? मुळच्या लोकांसाठी नाही होत. बाहेरुन आलेल्या लोकांसाठी होतात. ठाणे हा जगातील एकमेव जिल्हा आहे जिथे ७ ते ८ महानगरपालिका आहेत. ही लोकसंख्या काय ठाण्यातील लोकांनी वाढवली? बाहेरुन येणाऱ्यांचा लोंढा खूप मोठा आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांकडे लक्ष देण्यास सरकारकडे वेळ नाही. यूपी बिहारला नोकऱ्यांच्या जाहिराती येतात पण महाराष्ट्रातील रोजगाराकडे लक्ष देण्यास सरकारला वेळ नाही. गेली अनेक वर्षे असेच सुरु आहे. आता बेरोजगारांची यादी येत नाही. महाराष्ट्राला आरक्षणाची गरजच नाही. सर्वात आधी इथल्या मुलांना प्राधान्य द्या, असे राज ठाकरे म्हणाले. महाराष्ट्रमध्ये आरक्षणाची गरजचं नाही इतक्या मुबलक गोष्टी आहेत. (शेष पृष्ठ २ वर)

## राज ठाकरेंच्या निषेधार्थ मराठा आंदोलक घुसले हॉटेलमध्ये, मराठा आरक्षणावरून जोरदार घोषणाबाजी

महाराष्ट्रात कोणत्याही समाजाला आरक्षणाची गरज नाही, असे विधान सोलापूर येथील पत्रकार परिषदेत राज ठाकरे यांनी केले. त्यावरून ठाकरेंच्या विरोधात धाराशिव येथील मराठा आंदोलकांमध्ये संतापाची लाट उसळली. सायंकाळी राज ठाकरे धाराशिव येथे मुक्कामासाठी आले असता, त्यांना भेटून जाब



विचारण्यासाठी मराठा तरूण जोरदार घोषणाबाजी करीत हॉटेलमध्ये घुसले. मनसे प्रमुख राज ठाकरे सायंकाळी ५.३० वाजण्याच्या सुमारास धाराशिवमध्ये दाखल झाले. (शेष पृष्ठ २ वर)

## लाडकी बहीण योजनेवर कोर्टाचा मोठा निर्णय, महिलांना १४ तारखेला पैसे मिळणारच

■ मुंबई : राकेश गायकवाड

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना महायुती सरकारने जाहीर केली. या योजनेला राज्यभरातून मोठा प्रतिसादही मिळाला. जवळपास दोन कोटी पेक्षा जास्त महिलांनी या योजनेसाठी आपले नाव नोंदवले आहे. लाडकी बहीण योजनेविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती, ती याचिका आता न्यायालयाने फेटाळली आहे. त्यामुळे आता १४ ऑगस्टला सरकारी तिजोरीतून जाणाऱ्या पहिल्या हफ्त्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मुंबई उच्च न्यायालयात लाडकी बहीण योजनेविरोधात याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेत १४ ऑगस्टला वितरीत करण्यात येणारा



मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा पहिला हप्ता थांबवण्याची मागणी करण्यात आली होती. आज मुंबई उच्च न्यायालयात मंगळवारी या याचिकेवर तातडीची सुनावणी झाली. या सुनावणीत सरकारी धोरणात हस्तक्षेप करण्यास न्यायालयाने नकार दिला आहे.

लाडकी बहीण योजना ही सरकारनं बजेटच्या अंतर्गत घेतलेला निर्णय, त्याला आव्हान कसं देता येईल? असा थेट सवाल मुंबई उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांना केला आहे. नवी मुंबईतील नावेद मुल्ला यांनी ही याचिका न्यायालयात दाखल केली होती. लाडकी बहीण योजना म्हणजे करदात्यांच्या पैशांचा अपव्यय आहे. विधानसभा निवडणूक डोळ्यांसमोर ठेवून राज्य सरकारने ही योजना सुरु केली आहे.

## मनोज जरांगे हा शरद पवारांनी उभा केलेला माणूस

■ मुंबई : गणेश बागडे

**राज्यात मराठा-ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरुन वातावरण चांगलंच तापलं आहे. यावरुन सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये देखील जुंपत असल्याचे चित्र आहे. आज मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आरक्षणावरुन महाराष्ट्राचं मणिपूर करण्यात शरद पवार यांनी हातभार लावू नये, असं म्हणत खोचक टोला लगावला होता.**

यानंतर आता वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनीदेखील आता शरद पवारांवर निशाणा साधला आहे. 'मनोज जरांगे हा शरद पवारांनी उभा केलेला माणूस आहे', असं प्रकाश आंबेडकर म्हणाले आहेत. ओबीसी-मराठा आरक्षणाच्या लढाईत सुरु असलेली प्रकाश आंबेडकरांची आरक्षण बचाव यात्रा अकोला जिल्ह्यात दाखल झाली आहे. अकोला जिल्ह्यातील मुर्तीजापुर तालुक्यातल्या लाखपुरी गावात ही यात्रा पोहोचली आहे. यावेळी प्रकाश आंबेडकर म्हणाले, मनोज जरांगे हा शरद पवारांनी उभा केलेला माणूस आहे. जर त्यांनी विधानसभा लढवण्याचा निर्णय घेतला नाही तर ते शरद पवारांनी उभा केलेला माणूस आहे यावर शिक्कामोर्तब होईल. पुढे ते म्हणाले, मराठ्यांना आरक्षण देण्यासाठी महाराष्ट्रातील सर्व पक्ष आणि राजकीय नेते आहेत. मात्र, ओबीसींचं आरक्षण वाचवायला कुणीच तयार




नसल्यानं त्यासाठी आपण पुढाकार घेतला. मी ही यात्रा काढली नसती तर राज्यात दंगली झाल्या असत्या. आता वातावरण निवळलंय, असंही प्रकाश आंबेडकर यांनी स्पष्ट केलं. प्रकाश आंबेडकरांनी मराठा आरक्षणाबाबत उद्धव ठाकरेंनी घेतलेल्या संदिग्ध भूमिकेवरही जोरदार टीका केली. आंबेडकर म्हणाले, उद्धव ठाकरेंनी मनोज जरांगे पाटलांच्या मागणीसंदर्भात म्हणजेच मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्याच्या मागणीसंदर्भात घेतलेली भूमिका मी दुर्दैवी मानतो. उद्धव ठाकरे हे मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या मागणीच्या बाजूने आहेत की विरोधात आहेत हे त्यांनी आधी स्पष्ट करावं. आपली भूमिका स्पष्ट करण्याऐवजी ठाकरे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदींकडे जा आणि आरक्षण वाढवून घ्या.

## 'पुढचे तीन महिने मला द्या, मी राज्यात तुमचं सरकार...', देवेंद्र फडणवीसांचं कार्यकर्त्यांना आश्वासन

■ मुंबई : नितीन देवळेकर

लोकसभा निवडणूक निकाल लागून दोन महिने पूर्ण झाले आहेत. आता वेध लागले आहेत महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे. महायुतीने विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी कंबर कसली आहे. देवेंद्र फडणवीस यांनी अमरावतीत जे भाषण केलं ते देखील याचीच प्रचिती देणारं होतं. महाराष्ट्रात आपल्याला नव्या दमाने मैदानात उतरण्याची गरज खऱ्या अर्थाने गरज आहे. आपण एकजुटीने मैदानात उतरलो तर महायुतीचा भगवा रोवण्यापासून आपल्याला कुणी रोखू शकणार नाही असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.महाराष्ट्रात जी लोकसभा निवडणूक झाली, त्यानंतर आपल्या कार्यकर्त्यांमध्ये काही प्रमाणात निराशा आली. कारण इतक्या कमी जागा येतील असं वाटलं नव्हतं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा बनण्यासाठी कौल जनतेने दिला. त्याचवेळी महाराष्ट्रात आपण कमी पडलो याची खंतही आपल्याला आहे. महाराष्ट्रात पक्षात आपली लढाई तीन पक्षांशी नव्हती. चार पक्षांशी होती, चौथा पक्ष होता फेक नरेटिव्ह. असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

आपल्या विरोधकांचं धोरण म्हणजे रोज खोटं बोलायचं आणि रेटून बोलायचं. रोज खोटं बोललं की ते लोकांना खरं वाटू लागतं. इतके निर्लज्ज लोक आहेत की त्यांना खोटं बोलल्याशिवाय सकाळचा नाश्ताही घशाखाली उतरत नाही आणि रात्रीचं जेवणही. फेक नरेटिव्हला आपण



परिणामकारक रित्या उत्तर देऊ शकलो नाही. त्याचा परिणाम असा झाला की काही मतं कमी झाली असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. पुढचे तीन महिने तुम्ही मला द्या, मी राज्यात तुम्हाला तुमची सत्ता देतो. ज्या कार्यकर्त्यांना जिंकण्याची उर्मी आहे ते तुमच्यासारखे कार्यकर्ते बरोबर आहेत. आपण पुन्हा जर पूर्ण ताकदीने जर मैदानात उतरलो तर छत्रपती शिवरायांच्या आशीर्वादने पुन्हा एकदा तुमच्या मनातलं सरकार आणून दाखवेन. असं आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकर्त्यांना दिलं. विरोधी पक्षातील लोक सत्तेत आले तर केवळ पैसा जमा करतात. मात्र, सत्ता गेली की यांना गरीब, शेतकरी, कष्टकरी आठवतो. तर माझा यांना सवाल आहे की, मागची ७० वर्ष तुम्ही राज्यात सत्ता उपभोगली.

## अकरावीची पहिली विशेष प्रवेश यादी जाहीर, ६५ हजार ५०१ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय

■ मुंबई : गणेश बागडे

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ अंतर्गत मुंबई महानगरक्षेत्रातील अकरावी प्रवेशाची पहिली विशेष प्रवेश यादी सोमवारी जाहीर करण्यात आली असून त्यात विविध महाविद्यालयांतील १ लाख ९७ हजार ६४८ जागांसाठी १ लाख ३ हजार १५४ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. त्यापैकी ९० हजार ४०० विद्यार्थ्यांना महाविद्यालय देण्यात आले. पहिल्या विशेष फेरीत अर्ज केलेल्या १२ हजार ७५४ विद्यार्थ्यांना महाविद्यालय मिळण्याची प्रतीक्षा आहे. तब्बल ६५ हजार ५०१ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे, १० हजार ७३३ विद्यार्थ्यांना दुसऱ्या पसंतीचे आणि ५ हजार २९२ विद्यार्थ्यांना तिसऱ्या पसंतीचे महाविद्यालय देण्यात आले आहे. पहिल्या तीन नियमित प्रवेश फेऱ्यांच्या तुलनेत नामांकित महाविद्यालयांतील प्रवेश पात्रता गुण हे (कट ऑफ) नव्वदीच्या उंबरठ्यावरच राहिले होते. मात्र, प्रवेश पात्रता गुणांमध्ये ४ ते ५ टक्क्यांची घट झालेली आहे. सर्व जागांवर प्रवेश निश्चित झाल्यामुळे काही महाविद्यालयांची संबंधित शाखांसाठीची पहिली विशेष प्रवेश यादी जाहीर झालेली नाही.



पहिल्या विशेष प्रवेश फेरीत नामांकित महाविद्यालयातील प्रवेश पात्रता गुणांत मोठी घट झाली आहे. कला शाखेसाठीच्या प्रवेश पात्रता गुणांत ५ ते ७ टक्के, वाणिज्य शाखेसाठीच्या प्रवेश पात्रता गुणांत २ ते ३ टक्के आणि विज्ञान शाखेसाठीच्या पहिल्या विशेष प्रवेश फेरीनुसार केंद्रीय प्रवेश प्रक्रिया आणि संस्थात्मक, अल्पसंख्यांक, व्यवस्थापन कोटाअंतर्गत महाविद्यालय मिळालेल्या विद्यार्थ्यांना ८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत प्रवेश निश्चित करता येतील.

## बांगलादेशच्या घडामोडींचे भारतातही पडसाद, सीमेवर बंदोबस्त वाढवला, रेल्वे सेवा तात्पुरती रद्द

■ ढाका : वृत्तसंस्था

बांगलादेशमधील राजकीय वातावरण गेल्या महिनाभरापासून अस्थिर आहे. जनतेचा वाढता रोष आणि हिंसाचार पाहून शेख हसीना यांनी आज (५ ऑगस्ट) पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला, पाठोपाठ त्यांनी बांगलादेशमधून पलायन केलं आहे. त्या देश सोडून कुठे गेल्या आहेत हे अद्याप माहिती नसलं तरी त्या आश्रयासाठी भारतात येत असल्याचा दावा काही वृत्तसंस्थांनी केला आहे. सरकारी नोकऱ्यांमध्ये देण्यात आलेल्या आरक्षणाच्या मुद्द्यावरून सुरू झालेला हिंसाचार थेट बांगलादेशच्या पंतप्रधानांच्या शासकीय निवासस्थानापर्यंत पोहोचला. त्यामुळे त्यांना देशाचं प्रमुखपद सोडावं लागलं आहे. तसेच देशातून पलायन करावं लागलं आहे. भारताच्या शेजारील देशात घडत असलेल्या सर्व घटना पाहता हा देश पुन्हा एकदा अस्थिरतेच्या वाटेवर असल्याचं दिसून येत आहे. तसेच बांगलादेशमधील घडामोडींनंतर भारतातही मोठी उलथापालथ सुरू झाली आहे. केंद्र सरकारने भारत बांगलादेश सीमेवर अनेक सैन्य तुकड्या पाठवल्या आहेत.

बांगलादेशमधील कायदा आणि सूव्यवस्थेची स्थिती पाहता सीमा सुरक्षा दलाने (बीएसएफ) भारत-बांगलादेश सीमेवर हाय अलर्ट जारी केला आहे. तसेच बीएसएफचे महासंचालक कोलकात्यात दाखल झाले आहेत. बांगलादेशमधील कायदा आणि सूव्यवस्था सध्या तिथल्या लष्कराच्या हातात आहे. भारत आणि बांगलादेशची



सीमा ४,०९६ किलोमीटर पर्यंत पसरली आहे. या संपूर्ण सीमेवरील बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. बीएसएफने बांगलादेश सीमेवरील सर्व चौक्या व सैन्यतळांना अलर्ट जारी केला आहे.बांगलादेशमधून मोठ्या प्रमाणात हिंसाचार व जाळपोळीच्या घटना समोर येत आहेत. सरकारविरोधात रस्त्यावर उतरलेले लोक शासकीय मालमत्तेचं नुकसान करत आहेत. रेल्वे गाड्यांवर हल्ले होत आहेत. हे सर्व पाहता भारत सरकारने १५ दिवसांपूर्वी कोलकाता-ढाका-कोलकाता मैत्री एक्सप्रेस तात्पुरती रद्द केली होती. ही रेल्वेसेवा अजून काही दिवस बंद असेल. पाठोपाठ भारतीय रेल्वेने आणखी एक निर्णय घेतला आहे. बांगलादेश सीमेनजिक धावणाऱ्या मालगाड्या व प्रवासी वाहतूक करणाऱ्या रेल्वेगाड्या रद्द केल्या आहेत. भारतीय रेल्वेने २०० हून अधिक रेल्वेगाड्या रद्द केल्याचं वृत्त समोर आलं आहे. कोलकाता व खुलना या दोन स्थानकांदरम्यान चालवली जाणारी बंधन एक्सप्रेस १५ दिवसांपासून बंद आहे. बांगलादेशमधील राजकीय संकट पाहता पुढील काही दिवस ही रेल्वेसेवा चालू केली जाणार नसल्याचं भारतीय रेल्वेने जाहीर केलं आहे. बंधन एक्सप्रेस आठवड्यातून दोन दिवस चालवली जाते. दरम्यान, एअर इंडियाने ढाक्यासह बांगलादेशमधील प्रमुख शहरांमध्ये ये-जा करणारी विमानसेवा थांबवली आहे. शेड्यूल केलेली उड्डाणे रद्द करण्यात आली असल्याचं एअर इंडियाने जाहीर केलं आहे.




# विकेंद्रीकरणाला छेद देणारी 'नीट'

सर्वोच्च न्यायालयाने वैद्यकीय पदवीसाठी घेण्यात येणारी 'राष्ट्रीय पात्रता व प्रवेश चाचणी' (नीट) परीक्षा पुन्हा घेण्याच्या मागणीला नकार दिला व 'राष्ट्रीय चाचणी प्राधिकरणा'ला (एनटीए) ला सुधारित निकाल जाहीर करण्याचा आदेश दिला. त्यामुळे महिनाभर सुरू असलेला 'नीट'चा सावळा गोंधळ तूर्तास संपला आहे. 'नीट' चे पेपरफुटीचे प्रकरण समाजमाध्यमांतून पसरल्यानंतर या परीक्षेची शैक्षणिक दृष्टिकोनातून चिकित्सा होत आहे. परंतु 'नीट' हा केवळ शैक्षणिक मुद्दा नसून तो संघराज्याचादेखील मुद्दा आहे. संयुक्त पुरोगामी आघाडी (युपीए) सरकारच्या काळात आधीच्या वैद्यकीय पदवीसाठी 'एआयपीएमटी' या प्रवेश परीक्षेच्या जागी 'नीट' परीक्षा सुरू करण्यात आली. देशातील सर्व शासकीय व खासगी वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेशासाठी एकच परीक्षा निश्चित करण्यात आली. तेव्हा या परीक्षेला गुजरात, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक आणि पश्चिम बंगाल या राज्यांनी जोरदार विरोध केला. २०१७ पासून 'नीट' ही परीक्षा नियमित होत आहे. आधी ही परीक्षा सीबीएसई बोर्ड घेत असे. परंतु 'नवीन शिक्षण धोरणा'नुसार ही परीक्षा 'एनटीए' घेते. सुरुवातीपासूनच 'नीट' मध्ये गडबड होत असल्याचे सातत्याने आरोप होत आहेत.

यावर्षी मात्र पेपरफुटीचे प्रकरण सर्वत्र पसरले. सुमारे ४० हजार विद्यार्थ्यांनी या पेपरफुटीचा 'लाभ' घेतल्याचा आरोप होत आहे. भारतासारख्या खंडप्राय देशात ज्या परीक्षेला २५ लाख विद्यार्थी बसतात, त्या परीक्षेचे आयोजन करण्याची जबाबदारी एकाच संस्थेला देणे, हेच मुळात गैरव्यवस्थापनाला वाव निर्माण करते. २१७ मध्ये स्थापन झालेल्या 'एनटीए' या संस्थेवर सुमारे १६ प्रकारच्या प्रवेश परीक्षा आणि १० प्रकारच्या 'कर्मचारी भरती परीक्षा' घेण्याची जबाबदारी आहे. एवढ्या परीक्षा घेणारी 'एनटीए' जगातील कदाचित एकमेव संस्था असावी. एक संस्था एवढ्या परीक्षांचा बोजा कसा पेलणार, याचा विचार सरकारने केला नाही. परीक्षाव्यवस्थेच्या अतिकेंद्रीकरणाचा फटका आज ना उद्या बसणार होताच. त्याची सुरुवात 'नीट', 'यूजीसी नेट'पासून सुरू झाली आहे. प्रत्येक राज्याचे सामाजिक, वांशिक, भाषिक व सांस्कृतिक वेगळेपण पाहता त्या राज्यातील परिस्थितीनुरूप शिक्षणव्यवस्था उभारणे आवश्यक ठरते. त्यानुसार राज्य सरकार शालेय अभ्यासक्रम निश्चित करते. 'नीट' ही परीक्षा सीबीएसई बोर्डाच्या अभ्यासक्रमावर आधारित आहे. सुमारे १२ वर्षे राज्य मंडळाचा अभ्यासक्रम शिकलेल्या मुलांना अचानक दुसऱ्या अभ्यासक्रमाची तयारी करावी लागते.




त्यामुळे राज्य शिक्षण मंडळाचे विद्यार्थी 'नीट' सारख्या राष्ट्रीय पातळीवरील परीक्षेत मागे पडतात. राज्य मंडळ व सीबीएसई बोर्ड यांचे विद्यार्थी समान पातळीवर स्पर्धा करत नाहीत. दोन भिन्न मंडळांच्या विद्यार्थ्यांमध्ये भेदभाव निर्माण करणारी 'नीट' घटनेतील समानतेच्या मूलभूत हक्काचे हनन करते. राज्य मंडळातील विद्यार्थ्यांना 'नीट'साठी कोचिंग क्लास अनिवार्य ठरतात. या क्लासेसचे अवाढव्य शुल्क गरीब विद्यार्थ्यांना परवडणारे नसते. त्यामुळे हुशार असूनही केवळ राज्य शिक्षण मंडळाचा अभ्यासक्रम शिकल्यामुळे त्यांना डॉक्टर बनण्याची संधी मिळत नाही. 'नीट' मुळे कोचिंग संस्कृतीला प्रोत्साहन मिळते. क्लास लावण्याची ऐपत नसणाऱ्या सामाजिक व आर्थिकदृष्ट्या वंचित विद्यार्थ्यांना 'नीट'देखील स्पर्धेतून बाहेर ढकलते. अभ्यासक्रमाच्या या अडचणीमुळे सधन पालक आपल्या मुलांना लहानपणापासून 'सीबीएसई' बोर्डाच्या शाळेत टाकतात.

# करांच्या रचनेत तर्काला वळसा!

अचल संपत्तीच्या मूळ किंमतीची महागाई निर्देशांकाशी असलेली संलग्नता (इंडेक्सेशन) २००१नंतर खरेदी केलेल्या मालमत्तांसंदर्भात मागे घेण्याची घोषणा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी अर्थसंकल्पात केली आहे. ज्यावेळी एखादा करदाता आपली अचल संपत्ती म्हणजे घर, शेतजमीन, कार्यालय विकतो, त्यावेळी सदर मालमत्तेची बाजारकिंमत पैशाची क्रयशक्ती महागाईमुळे कमी झाल्याने फुगते.

सदर फुगीर किंमत वास्तववादी करण्यासाठी महागाई निर्देशांकाशी तुलना करून खरा दीर्घकालीन भांडवलीनफा काढला जातो व त्यावर वीस टक्के प्राप्तिकर द्यावा लागत होता. ही पद्धत भारताखेरीज ऑस्ट्रेलिया, कॅनडा, जर्मनी, ब्रिटन, न्यूझीलंड, दक्षिण आफ्रिका अशा अनेक प्रगत देशांत आजही कार्यरत आहे.


या बदलामुळे ज्यावेळी अचल मालमत्ता विक्रीपश्चात मिळणाऱ्या नफ्याची टक्केवारी महागाईदरापेक्षा कमी असेल तर अशा परिस्थितीत प्राप्तिकर देणे लागत नव्हता. नवीन बदलानुसार मालमत्तेची किंमत भाववाढीच्या तुलनेत कमी झाली असली तरी संबंधितावर विक्रीपश्चात प्राप्तिकर आकारला जाणार आहे. हे थेट नुकसान आहे.

घरखरेदी करताना दिलेली स्टॅम्पड्युटीची; तसेच खरेदीसाठी वापरलेल्या कर्जाच्या व्याजरकमेवर वजावट घेतली नसेल तर आता ती मूळ किंमतीत समाविष्ट करता येणार नाही. बदलाचे हे गंभीर परिणाम आहेत. ज्याने करदायित्व वाढणार आहे.

कोणताही निर्णय जेव्हा सरकार घेते त्यावेळी तो सर्वांना समान न्यायाने लागू होईल, अशी किमान अपेक्षा असते. तथापि, हा निर्णय त्या निकषावर खरा ठरत नाही. कररचना सुलभ करणे, अनुपालनाचे ओझे कमी करणे आणि करपाया विस्तारणे, या उद्देशाने करसुधारणा प्रस्तावित केल्या आहेत, असे जरी अर्थविभाग सांगत आहे, तरी हा बदल केवळ करवसुलीसाठी केला आहे.

अर्थ मंत्रालयानुसार इंडेक्ससेशनच्या आकडेमोडीने सामान्य वर्गास जी क्लिष्टता येते, त्याच्यासाठी हा पर्याय असावा. पण मग हे तत्त्व मान्य केले, तर सरकारी सेवकांना मिळणाऱ्या महागाई भत्त्याचे काय? तोही 'सुलभीकरण' निकषाअंतर्गत बदलण्यात येणार आहे काय? सरकार दीर्घकालीन प्रकल्पांसाठी वारंवार निधी देतात. त्यासाठी सुधारित अर्थसंकल्प मांडतात. किंमतीत महागाईमुळे जी घसरण होते, त्यासाठी काय निकष असणार आहेत?

वित्त सचिवांच्या माहितीनुसार आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये साडेदहा लाख प्राप्तिकर विवरणपत्रे अचल मालमत्ता भांडवली नफ्यासंदर्भात होती, त्यातील प्राप्तिकराचे गुणोत्तर विक्रीच्या रक्कमेशी ११.८४




टक्के होते. म्हणजे साडेबारा टक्के दर आकारल्यास सर्वांना कर देणे सुसह्य होईल व क्लिष्टता जाईल, असा वित्त विभागाचा दावा. परंतु त्या विभागाने महत्त्वाचा मुद्दा विचारात घेतला नाही. सर्व भागांत सारख्या किंमती मिळत नाहीत.

त्यात ग्रामीण, शहरी, वादात अडकलेल्या, आरक्षण असणाऱ्या इत्यादी अनेक निकष विचारात घ्यावे लागतात. शेतजमिनी हा आणखी एक निकष. २००१ पूर्वी ज्यांनी शहराजवळ जमिनी घेतल्या होत्या, त्यांची किंमत गगनाला जाऊन भिडल्याने प्रचंड फायदा झाला आहे. पूर्वी २००१ पूर्वी एक कोटी रुपयांना घेतलेली जमीन आता ७५ कोटी किंवा त्यापेक्षा जास्त किंमतीला जाईल.

त्यावर २० टक्क्यांऐवजी साडेबारा टक्के आकाराने करवसुली करणे म्हणजे स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेण्यासारखे. ज्याला पैसे मिळतात तो ते नक्कीच देईल. तथापि, राहण्याच्या घरासारख्या बाबी आयुष्यात एकदा किंवा दोनदा खरेदी-विक्री होताना दिसतात. किंबहुना त्या पैशाच्या टंचाईच्या निकडीवर पण अवलंबून असतात. त्यामुळे इंडेक्ससेशन रद्द करून अशा करदात्याकडून अशाप्रकारे करवसुली करणे योग्य नाही.

विशेष म्हणजे २००१नंतर खरेदी केलेल्या घरांच्या विक्रीवर प्रत्यक्ष करदर १४.९५टक्के (१२.५ऱ् ऱ् १५ऱ् अधिभार ऱ् ४ऱ् उपकर) पर्यंत जाऊ शकतो.

परिणाम व उपाययोजना

१.या निर्णयाचा परिणाम अर्थव्यवस्थेच्या दृष्टीनेही अहितकारक ठरेल. कर बुडविण्याची वृत्ती वाढू शकते व मोठे व्यवहार काळ्या पैशाला आमंत्रण देणारे असू शकतात.

२. परवडणाऱ्या घरांवर विशेष भर देऊन सरकारने जाहीर केलेल्या विविध कर पुनर्रचना उपायांमुळे २०२४ च्या अर्थसंकल्पात रिअल इस्टेट क्षेत्रावर लक्ष केंद्रित करण्यात आले होते. त्या उपायांवर पाणी फेरले जाऊ शकते. स्थावर मालमत्ता श्रेणीतील गुंतवणूकदार मोठ्या प्रमाणात आर्थिकदृष्ट्या त्रस्त होण्याची शक्यता अधिक आहे. स्थावर मालमत्ता ही सेवानिवृत्तीसाठी दीर्घकालीन गुंतवणूक मानणाऱ्यांचे हित कसे साधता येईल, हेही पाहायला हवे.

३. ज्या लोकांनी निवृत्तीचे नियोजन म्हणून जमिन आणि इमारतींमध्ये गुंतवणूक केली आहे, त्यांच्यासाठी ६० वर्षानंतरच्या आयुष्यात कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या विक्रीतून भांडवली नफ्यावर केंद्र सरकार सामाजिक सुरक्षा पुरवित नसल्याने सरसकट सवलत द्यायला हवी. यामुळे अनेक सेवानिवृत्त लोकांना सेवानिवृत्तीचे नियोजन करण्यास मदत होईल.

४. इंडेक्सेशनचा फायदा तटस्थ केल्यास, भांडवली नफ्याची रक्कम प्रचंड वाढेल, म्हणून कलम ५४- इसीअंतर्गत असणारी करमुक्त भांडवली नफ्याची मर्यादा किमान तिप्पट म्हणजे रु.५० लाख वरून दीडकोटीपर्यंत वाढली पाहिजे. तसे झाल्यास ज्यांना स्थावर मालमत्तेत पुन्हा गुंतवणूक करायची नाही, ते सरकारकडे पैसे ठेवून कर वाचवू शकतील.

५. नवीन आणि जुनी करव्यवस्था निवडण्याच्या पर्यायाप्रमाणे, लोकांना इंडेक्सेशनसह करआकारणी आणि २० टक्के कर आणि १२.५ टक्के करासह इंडेक्सेशन न करता कर आकारण्याची मुभा द्यायला हवी. एक एप्रिल २०२४ पूर्वी गुंतवणूक असलेल्यांनाच हा पर्याय देऊ केला जाऊ शकतो आणि ३१ मार्च २०२७ या परिभाषित तारखेपूर्वी विक्री पूर्ण केली जावी, अशी अट ठेवता येईल आणि अशी योजना नोंदण्यासाठी अर्थविभागाने एक खिडकी उघडावी. असे केले तर सर्वसामान्यांचा फायदा होऊ शकतो. कोणताही प्रस्ताव सर्वांसाठी समान फायद्याचा नसतो हे खरे; परंतु प्रत्येकाला त्यांच्या हितासाठी किमान सर्वोत्तम मिळू शकते जे वरील उपाययोजनांमुळे होऊ शकेल.

प्राप्तिकर विभागाने नमूद केले आहे, की जुन्या दराच्या तुलनेत नवीन करदर सामान्यतः अधिक फायद्याचे आहेत. दहा वर्षांसाठी मालकीहक्क असलेल्या मालमत्तेची विक्री झाल्यास तिचे मूळ मूल्य २.४ पटीने किंवा त्याहून अधिक वाढले असले तरी फायदेशीर ठरेल. याचा अर्थ असाही होतो, की यापेक्षा किंमती कमी वाढल्यास जुनी व्यवस्था फायद्याची ठरेल.

ग्रामीण व शहरी भागातील बाजारमूल्य एकसारखे वाढत नाही सबब ग्रामीण भागातील भांडवली नफ्यावर नेहमीच कराचे सावट असू शकेल. जेव्हा अचल मालमत्ता विकत घेतली जाते, तेव्हा ती नेहमीच दीर्घकाळासाठी असते व ती लगेचच विकण्यासाठी क्वचितच असते. म्हणूनच कमी मालकीहक्काच्या कालावधीतील भांडवली नफा कमी दराने करपात्र होईल, असे म्हणणे धारिष्ट्याचे ठरेल. सबब अनेक करदात्याचे आर्थिक नुकसान संभवते. मालमत्ता मूल्य साधारणपणे नऊ ते अकरा टक्क्यांपेक्षा कमी वर्धित झाले तर पूर्वीचा करदर फायदेशीर आहे, याचा अर्थ नऊ ते अकरा टक्क्यांपेक्षा अधिक मूल्य वर्धित झाले तरच नवे करदर फायद्याचे ठरतील, अन्यथा नाही.

पान १ वरुन...

## महाराष्ट्राला आरक्षणाची...

आपला सर्वाधिक पैसा हा बाहेरच्या लोकांवर खर्च होतोय. ठाणे जिल्हा हा देशातील हा एकमेव जिल्हा जिथे ७-८ महापालिका आहेत. मग इथली लोकसंख्या ठाण्यातील लोकांनी वाढवली का? ही लोकसंख्या बाहेरच्या लोकांनी वाढवली. आपला पैसा त्यांची व्यवस्था करण्यातच जातो, आपल्या नोकऱ्याच्या जाहिराती युपी बिहारमध्ये येतात. मग आपल्या तरुणांना हे कळत नाही, अशी खंत यावेळी राज ठाकरेंनी बोलून दाखवली. आपल्या तरुणांना नोकऱ्या नाहीत. आता तर यादी ही यायची बंद झाली आहे. मी देश तोडायचं म्हणत नाहीये. आधी इथल्या तरुणांना नोकऱ्या द्या नंतर बाहेरच्या तरुणांना द्या. स्पोर्ट्स बजेट आलं त्यात ही गुजरात आणि युपीला प्राधान्य दिलं, असं कसं चालेल? प्रधानमंत्री यांनी सर्वांनी सारखं पहिले पाहिजे. पंतप्रधान मोदींनी सर्व राज्य समान पद्धतीने पाहिली पाहिजेत. एखादा नवा प्रकल्प आला की गुजरातला न्यायचा, काही नवं आलं की गुजरातला न्यायचं हे करणं बंद करावं. उद्या मराठी पंतप्रधान झाला आणि त्याने केवळ महाराष्ट्रातच अशा सुविधा आणल्या तर मी त्याला विरोध करेन. यावर आक्षेप घ्यायचे नाहीत का? नरेंद्र मोदींच्या चांगल्याला चांगल म्हणणार, वाईटाला वाईट म्हणणार, असे म्हणत त्यांनी पंतप्रधान मोदींवर टीका केली.

## राज ठाकरेंच्या निषेधार्थ...

तत्पूर्वी त्यांनी तुळजाभवानी देवीचे दर्शन घेतले. त्यापूर्वी सोलापूर येथे झालेल्या पत्रकार परिषदेत राज ठाकरे यांनी मराठा समाजाला आरक्षणाची गरज काय? असा प्रश्न उपस्थित केल्याचा आरोप आंदोलकांनी केला. ठाकरेंनी केलेल्या या वक्तव्याच्या निषेधार्थ धाराशिव शहरात मराठा समाजातील तरूण आक्रमक झाल्याचे पहायला मिळाले. शहरातील पुष्पक हॉटेल येथे राज ठाकरे यांचा ताफा दाखल झाल्यानंतर त्यांना जाब विचारण्यासाठी मराठा तरूणांची गर्दी झाली होती. राज ठाकरे यांनी आंदोलकांची भेट नाकारल्यामुळे काही वेळ गोंधळ उडाला आणि तणाव निर्माण झाला होता. ठाकरे हॉटेलच्या तिसऱ्या मजल्यावर मुक्कामी थांबले आहेत.मुक्कामी थांबलेल्या हॉटेलमधील त्यांच्या दालनापर्यंत जाण्याचा कार्यकर्त्यांनी प्रयत्न केला. पोलिसांनी हस्तक्षेप करीत आंदोलकांवर नियंत्रण मिळविले. या दरम्यान मराठा आरक्षणावरून हॉटेल परिसरात जोरदार घोषणाबाजी सुरू होती.

महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, यांचे कार्यालय**

☎ २२०१६९७५/७७
२२०१६९७३

Email : presidency.ee@mahapwd.com

**ई-निविदा सुचना क्र. ०५ सन २०२४-२५**

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई-०१ (दूरध्वनी क्र. २२०१६९७५/७७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून **अनुभवी कंत्राटदार व पुरवठादार** यांच्याकडून खालील कामाकरीता "बी-१" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) पध्दतीने मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर **http://mahatenders.gov.in** येथून डाऊनलोड करण्यांत यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई, यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**कामाचे नाव :-**

१. उप अभियंता, पश्चिम (सा.बां.) उपविभाग, मुंबई अंतर्गत देखभाल व दुरुस्ती करीता असलेल्या शासकिय नंदनवन, अग्रदुत या बंगल्यांची दैनंदिन साफसफाई करणे. **(अंदाजित रक्कम रुपये ४२,४१,४९४/-)**

२. उप अभियंता, पश्चिम (सा.बां.) उपविभाग, मुंबई अंतर्गत देखभाल व दुरुस्ती करीता असलेल्या मा.मुख्यमंत्री महोदय यांचे शासकिय निवासस्थान वर्षा -तोरणा बंगल्याची दैनंदिन साफसफाई करणे. **(अंदाजित रक्कम रुपये ७३,८३,०१२/-)**

**ई-निविदा उपलब्ध कालावधी-** दि. ०१.०८.२०२४ ते दि. ०९.०८.२०२४ पर्यंत
**ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास)** दि. १२.०८.२०२४ रोजी

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.

१) http://mahapwd.com
२) http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)
३) कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

**जा.क्र. काअ/इशवि/भांडार/ई-निविदा/** ३०५९९
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**इलाखा शहर विभाग, बांधकाम भवन, २ रा मजला,**
**२५ मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१**
**दूरध्वनी क्र. २२०१६९७५/७७**
**दिनांक :-** ३०/७/२०२४

(वि.अ.पाटसकर)
**कार्यकारी अभियंता**
**इलाखा शहर विभाग मुंबई**

**डीजीआयपीआर/२०२४-२०२५/१५५८**

**महाराष्ट्र शासन**

इलाखा शहर विभाग, (सा.बां.)

**ई -निविदा सुचना क्र. १४८ (फेरनिविदा) सन २०२३-२०२४**

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रमांक-२२०१६९७५ /२२०१६९७७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रू. लक्ष |
|---|---|---|
| १ | चर्चगेट मुंबई येथील यशोधन इमारत रुम नं. ३४ मध्ये दुरुस्ती, नूतनीकरण करणे. | १३.४५ |
| २ | एल्फीस्टन टेक्निकल हायस्कूल मुंबई आवारातील प्राचार्य निवासस्थाने दुरुस्ती करणे. | १९.१६ |
| ३ | जे जे स्कूल ऑफ आवारातील डीन बंगला २ च्या मंगलोरी छताची दुरुस्ती करणे | १९.९८ |
| ४ | जे जे स्कूल ऑफ आवारातील डीन बंगला १ च्या मंगलोरी छताची दुरुस्ती करणे. | १९.९७ |
| ५ | चर्नी रोड मुंबई येथील न्यू प्रेस इमारतीच्या दरवाजे, खिडक्या, प्लास्टर, फ्लोरिंग, नूतनीकरण करणे. | २१.०५ |
| ६ | हाजी अली मुंबई येथील शासकीय अधिकारी निवासस्थान इमारत १३ अंतर्गत किचन, बालकणी दुरुस्ती, रंगकाम करणे. | २५.२५ |
| ७ | चर्नी रोड मुंबई येथील कॅन्टीन इमारत २ मजल्यावरील खिडक्या, स्ट्रक्चरल दुरुस्ती, प्लास्टर, रंगकाम करणे. | १२.६६ |
| ८ | मादाम कामा रोड मुंबई येथे शासकीय बंगला ए,बी,सी मध्ये सोफासेट टीपॉय खुर्ची इत्यादी पुरवठा करणे. | १२.४४ |
| ९ | इन्साहमेंट मुंबई आवारातील विविध कार्यालयाचे दरवाजे, खिडक्या, प्लास्टिक, पार्टिशन, रोलिंग शटर दुरुस्ती करणे. | ९.०७ |
| १० | मादाम कामा रोड मुंबई येथील शासकीय बंगल्यामागील ड्रेनेज लाईन आणि चैंबर दुरुस्ती करणे. | १६.७४ |
| ११ | मादाम कामा रोड मुंबई नवीन प्रशासकीय इमारतीच्या १ मजल्यावरील निवडणूक आयोग कार्यालयामध्ये पार्टिशन फॉल्स सिलिंग दुरुस्ती करणे, प्लास्टर, रंगकाम करणे. | १७.४९ |
| १२ | कारवार स्ट्रेट पोलीस लाईन निवासस्थाने ए-विंग आरसीसी कॉलम दुरुस्ती, आवारभिंतीची ग्रील दुरुस्ती करणे. | २४.५० |
| १३ | भारतीय विज्ञान संस्था मुंबई येथील एमएसी लॅबोरेटरी आणि रिसर्च मायक्रोबायोलॉजी विभागाचे मॉड्युलर फर्निचरचे नूतनीकरण करणे. | १२.६५ |
| १४ | कारवार स्ट्रेट पोलीस लाईन निवासस्थाने बी-विंग रुम नं. २१ ते ३५ दरवाजे, खिडक्या, फ्लोरिंग दुरुस्ती प्लास्टर, रंगकाम करणे. | २४.९७ |
| १५ | एल्फीस्टन कॉलेज मुंबई येथे रसायनशास्त्र विभाग मंगलोरी छताची दुरुस्ती करणे. | १६.७३ |
| १६ | कारवार स्ट्रेट पोलीस लाईन निवासस्थाने बी-विंग आरसीसी कॉलम दुरुस्ती, आवारभिंतीची ग्रील दुरुस्ती करणे, नूतनीकरण करणे. | २४.५० |
| १७ | कारवार स्ट्रेट पोलीस लाईन निवासस्थाने बी-विंग इमारतीस रिगीड पेव्हमेंट ट्रिमिक्स ट्रीटमेंट करणे. | २४.३८ |
| १८ | आकाशवाणी आमदार निवास मुंबई येथे रुम नं. २०१ दुरुस्ती आणि नूतनीकरण करणे. | ११.९६ |
| १९ | मादाम कामा रोड मुंबई येथील शासकीय बंगला C- ४ मध्ये लाकडी स्टोरेज, फर्निचर, पॅनलिंग, खुर्ची इत्यादी कामे करणे. | २४.९७ |
| २० | मादाम कामा रोड मुंबई येथील शासकीय बंगला C- ४ मध्ये मागील हॉल प्लास्टर, पार्टिशन, पॅनलिंग, फॉल्स सिलिंग नूतनीकरण करणे, पॉलीश रंगकाम करणे. | ४८.६८ |
| २१ | मंत्रालय मुख्य इमारत मुंबई येथील ७ मजल्यावरील रुम नं.७१७ DCM कार्यालयामध्ये आसन व्यवस्था नुतनीकरण,दुरुस्ती करणे. | १५.२९ |
| २२ | फोर्ट मुंबई येथील SIAC इमारतीच्या आरसीसी कॉलेज प्रवेशव्दार दुरुस्ती करणे. | ४५.९५ |
| २३ | मलबार हिल मुंबई येथील शासकीय बंगला ज्ञानेश्वरी प्लास्टर, रंगकाम करणे. | १९.९८ |
| २४ | सुरुची सुनिती सेवा केंद्रातर्गत निलांबरी या शासकीय इमारतीमधील सदनिका, पॅसेजमध्ये प्लास्टर व रंगकाम करणे. | १९.९४ |
| २५ | जे.जे. स्कूल ऑफ आर्ट आवारातील ओल्ड आर्किटेक्चर इमाराती जवळील स्टोरेज दुरुस्ती करणे | ९.७९ |
| २६ | भारतीय विज्ञान संस्था मुंबई येथील कॅन्टीन जिमखाना, पॅसेज, दूरुस्ती रंगकाम करणे. | १०.६७ |
| २७ | एल्फीस्टन टेक्निकल हायस्कूल मुंबई आवारातील रंगभवन सेवक निवासथाने दुरुस्ती करणे. | १९.९७ |
| २८ | जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मुंबई आवारातील न्यू आर्किटेक्चर इमारतीच्या पुरुष आणि महिला प्रसाधनगृह दुरुस्ती करणे. | १९.०३ |
| २९ | एल्फीस्टन टेक्नीकल हायस्कूल मुंबई आवारातील स्मिती शेडच्या छताची दुरुस्ती,दरवाजे,अंतर्गत प्लास्टर, रंगकाम करणे. | १६.०९ |
| ३० | एल्फीस्टन टेक्निकल हायस्कूल मुंबई विस्तार इमारतीच्या टेरेस पाण्याची टाकी दुरुस्ती करणे. | २१.३८ |
| ३१ | सुरुची सुनिती सेवा केंद्रातर्गत सुनिती या शासकीय इमारतीमधील सदनिका, पॅसेजमध्ये प्लास्टर व रंगकाम करणे. | १६.७७ |
| ३२ | चर्चगेट मुंबई येथील सिमश्री कॉलेज येथे मंगलोरी छताची दुरुस्ती करणे. | ४४.१८ |
| ३३ | सुरुची सुनिती सेवा केंद्रातर्गत सुरुची-सुनिती या शासकीय इमारतीच्या आवारातील ड्रेनेज लाईन, सॅनिटरी फिटींगची दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | १६.६१ |
| ३४ | सुरुची सुनिती सेवा केंद्रातर्गत निलांबरी या शासकीय इमारतीमधील सदनिका, पॅसेजमध्ये प्लास्टर व रंगकाम करणे. | १६.८२ |
| ३५ | फोर्ट मुंबई येथील पोलीस अधिकारी निवासस्थाने ए-विंग रूम नं. १५ ते २१ प्लास्टर, पॉलीमर मोटर, फ्लोरिंग, दरवाजे, खिडक्या दुरुस्ती आणि रंगकाम करणे. | २४.९७ |
| ३६ | फोर्ट मुंबई येथील पोलीस अधिकारी निवासस्थाने ए-विंग रूम नं.८ ते १४ प्लास्टर, पॉलीमर मोटर, फ्लोरिंग, दरवाजे, खिडक्या दुरुस्ती आणि रंगकाम करणे. | २४.९७ |
| ३७ | सिव्हील डिफेन्स मुंबई आवारातील इमारतीच्या दरवाजे, खिडक्या, पाईपलाईन इत्यादी दुरुस्ती करणे, कॉक्रीट रंगकाम करणे. | १६.७९ |
| ३८ | फोर्ट मुंबई येथील पोलीस अधिकारी निवासस्थाने ए-विंग रूम नं.१ ते ७ प्लास्टर, पॉलीमर मोटर, फ्लोरिंग, दरवाजे, खिडक्या दुरुस्ती आणि रंगकाम करणे. | २४.९७ |
| ३९ | चर्चगेट मुंबई येथील सिडन्हॅम कॉलेजच्या सिमश्री इंस्टीट्यूटचे बी- विंग फ्लोरींग दुरुस्ती करणे. | १९.९२ |
| ४० | एन.डी. रोड मुंबई येथील रॉकी हिल टॉवर इमारत विविध सदनिकांचे अंतर्गत प्लास्टर व रंगकाम करणे. | २०.०७ |
| ४१ | चर्चगेट मुंबई येथील सिडन्हॅम कॉलेज इमारतीमधील विविध क्लासरुम, पॅसेज, व्हरांडा आरसीसी स्ट्रक्चरलचे मजबूतीकरण करणे. | २२.३८ |
| ४२ | मादाम कामा रोड मुंबई येथील ब/२ ते बी-५ बंगल्याच्या ड्रेनेज लाईन आणि सेवक निवासस्थाने पाण्याची पाईप लाईन दुरुस्ती करणे. | १६.८३ |
| ४३ | उच्च न्यायालय मुंबई विस्तार इमारत तळमजल्यावरील कार्यालय, पॅसेज, कोर्टरुम, चेंबर पॉलिश व रंगकाम करणे. | १६.६७ |
| ४४ | प्रशासकीय महाविद्यालय मुंबई आवारातील विविध इमारतीचे दुरुस्ती करणे. | १६.५० |
| ४५ | विस्तारीत आमदार निवास इमारतीमधील फ्लोरिंग, पॅसेज तसेच व्हरांड्याची दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | १९.७७ |
| ४६ | जूने जकात घर मुंबई बेल हेवन इमारत जोरावर भवन येथील सेवक निवासस्थान दरवाजे, खिडक्या, सॅनिटरी आणि पाण्याची पाईपलाईन दुरुस्ती करणे. | १६.६४ |
| ४७ | बाजारगेट यलोगेट कारवार स्ट्रीट पोलीस स्टेशन दरवाजे, खिडक्या, लाकडी ग्रेस आणि जाळी दुरुस्ती करणे. | १६.८२ |
| ४८ | विस्तारीत आमदार निवास इमारतीमधील ड्रेनेज लाईन, सॅनिटरी फिटींगची दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | १६.६५ |
| ४९ | चर्चगेट मुंबई येथील सिमश्री कॉलेज येथे पॉलीमर, मायक्रो कॉक्रीट, प्लास्टर, रंगकाम, दुरुस्ती करणे. | १५.६८ |
| ५० | मंत्रालय मुख्य इमारतीमधील पोर्च व त्रिमुर्ती चाकामधील टफन सॅन्डविच काच, ग्रेनाईट दुरुस्ती करणे. | १६.२७ |
| ५१ | पिफ मेट्रोपॉलिटन मॅजिस्ट्रेट एसप्लानेड मुंबई येथील ३ मजल्यावरील सिव्हील आस्थापना विभाग नुतनीकरण करणे. | २४.०२ |
| ५२ | चर्नी रोड मुंबई येथील न्यू प्रेस बिल्डिंग येथे वार्षिक देखभाल व दुरुस्तीची कामे करणे. | १७.९४ |
| ५३ | भारतीय विज्ञान संस्था मुंबई येथील वेलफेअर ऑफिस पंप रुम दुरुस्ती करणे. | १२.६३ |
| ५४ | मंत्रालय मुख्य व विस्तार इमारतीमधील मा.सचिव, अवर सचिव, उप सचिव यांच्या दालनामध्ये टेबल, कपाटे दुरुस्ती करणे | १८.६१ |
| ५५ | मंत्रालय मुख्य व विस्तार इमारतीमधील सचिव व अधिकारी प्रसाधनगृह दुरुस्ती करणे. | १८.५५ |
| ५६ | उच्च न्यायालय मुंबई मुख्य इमारत तळमजल्यावरील कार्यालय, पॅसेज, कोर्टरुम, चेंबर पॉलिश व रंगकाम करणे. | १७.६६ |
| ५७ | चर्चगेट मुंबई येथील यशोधन इमारतीचे प्लास्टर दुरुस्ती करणे, रंगकाम करणे. | १६.८६ |
| ५८ | एन.डी. रोड मुंबई येथील बॅन्डमेन्स क्वार्टर्सच्या विविध सदनिकांचे अंतर्गत प्लास्टर व रंगकाम करणे. | १६.७८ |
| ५९ | मलबार हिल मुंबई येथील चित्रकूट बंगला प्लास्टर रंगकाम करणे. | १९.९२ |
| ६० | मलबार हिल मुंबई येथील पर्णकुटी बंगला प्लास्टर रंगकाम करणे. | १९.९७ |
| ६१ | मादाम कामा रोड मुंबई येथील नविन प्रशासकीय इमारत १ ते ६ मजल्यावरील विविध कार्यालयाचे अंतर्गत प्लास्टर व रंगकाम करणे. | १९.८८ |
| ६२ | मादाम कामा रोड मुंबई येथील नविन प्रशासकीय इमारत ६, ८, १२ मजल्यावरील लाकडी पार्टीशन दुरुस्ती करणे. | १६.८५ |
| ६३ | एल्फीस्टन टेक्निकल हायस्कूल मुंबई आवारातील रंगभवन सेवक निवासथाने दुरुस्ती करणे. | १६.८५ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. ३१.७.२०२४ ते दि. ७.८.२०२४ पर्यंत.
ई-निविदा उघडणे- दि. ८.८.२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता
निविदा सुचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.
खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com
2) http :// mahatenders.gov.in

जा.क्र. इशवि/निलि/ ३०२५०
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला,बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक : २३/७/२४

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

**डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/१४०५**

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4 , Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate , Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com , Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# मुंबईतून 'लाडकी बहीण' योजनेसाठी सहा लाख अर्ज; प्रतितास ४० अर्जांची छाननी करण्याचे आदेश

■ मुंबई : गणेश बागडे

राज्य सरकारच्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने'साठी संपूर्ण मुंबईतून आतापर्यंत सुमारे सहा लाख अर्ज दाखल करण्यात आले आहेत. या अर्जांची छाननी प्रक्रिया सुरू असून छाननीसाठी प्रत्येक विभागामध्ये स्वतंत्र कक्ष सुरू करण्यात येणार आहेत. प्रतितास ४० अर्जांची छाननी करण्याचे आदेश पालिका प्रशासनाने विभाग कार्यालयांना दिले आहेत. अर्जांची छाननी वेगाने पूर्ण करण्यासाठी महानगरपालिकेची यंत्रणा युद्धपातळीवर कामाला लागली आहे.राज्यातील महिला वर्गाला खूश करण्यासाठी राज्य सरकारने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' आणली आहे. महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, त्यांच्या आरोग्य आणि पोषणामध्ये सुधारणा करणे आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्याचा या योजनेचा उद्देश असल्याचे राज्य सरकारने जाहीर केले आहे. मुंबई महानगरपालिकेच्या यंत्रणेमार्फत मुंबईमध्ये ही योजना राबवली जात आहे. महानगरपालिकेच्या सर्व २४ विभागांमध्ये अंगणवाडी सेविकांच्या माध्यमातून पात्र महिलांकडून ऑ




नलाइन अर्ज भरून घेतले जात आहेत. शिवाय, विभागांमध्ये कार्यरत असलेल्या नागरी सुविधा केंद्रावरही (सीएफसी) ऑनलाइन अर्जाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मुंबई महानगरपालिकेकडे आतापर्यंत शहर विभागातून सुमारे पावणेदोन लाख अर्ज आले आहेत, तर उपनगरातून सुमारे चार लाख अर्ज आले आहेत. अजून अर्ज येण्याची शक्यता असून एवढ्या मोठ्या संख्येने आलेल्या अर्जांची छाननी करणे हे आता मुंबई महानगरपालिकेपुढचे आव्हान आहे.

अर्जांची छाननी वेगाने व्हावी याकरिता पालिका प्रशासनाने विभाग कार्यालयांना निर्देश दिले आहेत. प्रत्येक विभाग कार्यालयात १० संगणक उपलब्ध करून स्वतंत्र कक्ष स्थापन करावा. प्रत्येक संगणकावर सकाळी सात ते दुपारी तीन आणि दुपारी तीन ते रात्री अकरा अशा दोन पाळ्यांमध्ये काम करावे. प्रत्येक पाळीमध्ये या योजनेची सखोल माहिती असलेल्या पर्यवेक्षकांची नेमणूक करावी असेही निर्देश देण्यात आले आहेत. या योजनेबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाने १२ जुलै रोजी काढलेल्या परिपत्रकात योजनेची संपूर्ण माहिती देणारे फलक लावण्याचे आदेश महापालिकेला दिले होते. त्याकरिता आवश्यक निधी वॉर्ड स्तरावर उपलब्ध अन्य निधीतून करावा असे निर्देश दिले होते. त्यामुळे या योजनेसाठी पालिकेचा निधी का, असा सवाल पालिका वर्तुळात विचारला जात होता. मात्र सुरुवातीच्या काळातील हे परिपत्रक असून नंतर काढलेल्या परिपत्रकानुसार जिल्हा नियोजन विकास समितीच्या निधीपैकी एक टक्का निधी हा या योजनेच्या जाहिरातीसाठी वापरावा असे निर्देश दिले असल्याची माहिती पालिकेच्या अधिकाऱ्यांनी दिली.

# मुंबईत जूनच्या तुलनेत साथीच्या आजारांत दुपटीने वाढ

■ मुंबई : यश सावंत

पावसाळ्यात उद्भवणाऱ्या साथीच्या आजारांना प्रतिबंध करण्यात मुंबई महानगरपालिकेचा आरोग्य विभाग अपयशी ठरत असल्याचे दिसत असून जूनच्या तुलनेत जुलैत साथीच्या आजारांच्या रुग्णांत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. मुंबईत जूनमध्ये साथीच्या आजाराचे १३९५ रुग्ण सापडले होते. जुलैत त्यात दुपटीने वाढ झाली आहे. जुलैत ३०४४ रुग्ण सापडले आहेत. त्यात गॅस्ट्रो, मलेरिया, डेंग्यू, कावीळ, स्वाईन फ्लू आणि लेप्टो या आजारांच्या रुग्णांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार जुलैत ३ हजार ४४ रुग्ण सापडले आहेत. जूनमध्ये महिन्याभरात सापडलेल्या १ हजार ३९५ रुग्णांच्या तुलनेत जुलैत अधिक



रुग्ण सापडले आहेत. जुलैत मुंबईतील साथीच्या आजारांमध्ये गॅस्ट्रोचे सर्वाधिक १२३९ रुग्ण सापडले असून त्याखालोखाल हिवताप ७९७ रुग्ण, डेंग्यू ५३५ रुग्ण, स्वाईन फ्लू १६१ रुग्ण, कावीळ १४६ रुग्ण, लेप्टोचे १४१ रुग्ण तर चिकुनगुन्याचे २५ रुग्ण सापडले आहेत. जूनच्या तुलनेत जुलैमध्ये मोठ्या प्रमाणात झालेल्या पावसामुळे साथीच्या आजाराच्या रुग्णांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत असल्याचे मत वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात आले आहे. राज्यामध्ये हिवताप व डेंग्यूच्या रुग्णांच्या संख्येत वाढ होत असून, आठवडाभरामध्ये राज्यामध्ये हिवतापाचे १५७८ रुग्ण तर डेंग्यूचे ८१४ रुग्ण सापडले आहेत. हिवतापाचे सर्वाधिक गडचिरोलीमध्ये २६६ रुग्ण, मुंबईमध्ये २४९ रुग्ण आणि चंद्रपूरमध्ये ७६ रुग्ण सापडले.

## बेस्ट वाचवण्यासाठी गणेशोत्सव मंडळांना साद

■ मुंबई : सम्यक कासारे

बेस्ट उपक्रमातील बेस्टचा स्वमालकीचा बस ताफा फक्त ३३ टक्के राहिला आहे. त्यामुळे बेस्ट उपक्रमातील स्वमालकीच्या किमान ३,३३७ बसगाड्यांचा ताफा असावा, यासाठी मुंबईकरांना एकत्र करून, 'बेस्ट बचाओ' अभियान राबवले जात आहे. आता हे अभियान जास्तीत जास्त मुंबईकरांपर्यंत पोहोचवण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी या अभियानाला पाठिंबा द्यावा. यासह 'बेस्ट बचाओ' हा विषय घेऊन कलात्मक देखाव्यांच्या माध्यमातून 'बेस्ट'ला वाचवण्यासाठी नागरिकांना आवाहन करावे, असे 'बेस्ट बचाओ'कडून सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना सुचवण्यात आले आहे.



पुढील महिन्यात गणेशोत्सव साजरा केला जाणार असून, त्यासाठीची तयारी सुरू झाली आहे. गणेशभक्तांमध्ये देखावा करण्याची लगबग सुरू आहे. सार्वजनिक गणेशोत्सवात कायम प्रबोधनात्मक देखावा केले जातात. त्या अनुषंगाने यंदा मुंबईच्या बेस्ट परिवहन सेवेवर देखावा करण्याचे आवाहन 'बेस्ट बचाओ'कडून केले आहे. गेल्या ७५ वर्षांहून अधिक काळापासून मुंबईकरांना बेस्ट सेवा देत आहे. मात्र, २०१९ सालापासून खासगी कंत्राटदारांच्या बस बेस्टच्या नावाने चालविल्या जात आहेत. त्यामुळे बेस्टच्या ताफ्यातील स्वमालकीचा ताफा कमी होण्यास सुरुवात झाली. आताच्याघडीला बेस्टच्या ताफ्यात १,०८५ बस असून संपूर्ण ताफ्याच्या ३३ टक्केच बस शिल्लक आहेत. बेस्ट उपक्रमातील १५ वर्षांचे आयुर्मान पूर्ण झालेल्या बस भंगारात काढण्यात येत आहेत. त्यामुळे बेस्ट उपक्रमाने स्वमालकीच्या बस खरेदी केल्या नाहीत. तर, ३१ मार्च २०२५ पर्यंत फक्त ७६१ बसचा ताफा शिल्लक राहील.

## झोपु योजनेचा दुसऱ्यांदा लाभ घेण्याचा प्रयत्न महागात, म्हाडा मुंबई मंडळाकडून सात जणांची पात्रता रद्द

■ मुंबई : विशाल कारंडे

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत पती-पत्नीला एकाच घराचा एकावेळी लाभ घेता येतो. असे असताना एक घर घेतल्यानंतर दुसऱ्या झोपु योजनेत दुसऱ्या घराचा लाभ घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोघांची पात्रता रद्द करण्याचा निर्णय म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या सक्षम प्राधिकरणाने घेतला आहे. खोटी कागदपत्रे सादर करून झोपुतील घर लाटण्याचा प्रयत्न करणाऱ्या पाच जणांची पात्रताही रद्द केली आहे. आता या सातही जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात येणार आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामार्फत मुंबईतील झोपड्यांचे पुनर्वसन करण्यात येते. म्हाडाच्या जागेवरील झोपु योजनेतील रहिवाशांची पात्रता ही मुंबई मंडळाच्या सक्षम प्राधिकरणाकडून निश्चित केली जाते. तर पात्रतेसंबंधीचे अपीलही सक्षम प्राधिकरणाकडे येतात. त्यानुसार सक्षम प्राधिकरणाकडे काही अपीलावर नुकतीच सुनावणी झाली. त्यादरम्यान दोन अर्जदारांनी एकदा झोपु योजनेचा लाभ घेतलेला असतानाही परत झोपु योजनेचा लाभ घेण्याचा प्रयत्न करत सरकारी यंत्रणांची फसवणूक केल्याचे स्पष्ट झाले. दुसऱ्या एका प्रकरणात पती किंवा पत्नी एकलाच झोपु योजनेतील एका घराचा लाभ घेता येतो. मात्र पती एका योजनेसाठी आधीच




पात्र असताना पत्नी दुसऱ्या योजनेसाठी पात्र ठरल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार पत्नीची पात्रता रद्द करण्यात आली आहे. अजून एका प्रकरणात एकाच झोपडीसाठी मतदार यादीच्या आधारे तीन जणांची पात्रता निश्चिती करण्यात आली होती. सर्व कागदपत्रांची पडताळणी केली असता दोन जण वेगवेगळ्या कारणाने अपात्र असल्याचे सिद्ध झाले असून दोघांची पात्रता रद्द करण्यात आली आहे. अन्य काही प्रकरणात दोन जणांची पात्रता रद्द करण्यात आली आहे. एकूणच या सर्व झोपडीधारकांनी सरकारी यंत्रणांची फसवणूक केल्याचे स्पष्ट झाले आहे.

# सागरी किनारा मार्गाविरोधातील याचिका न्यायालयाने फेटाळली, मार्गावरील प्रवेशयोग्य मोकळ्या जागा ठेवण्याच्या मागणीचा विचार करण्याची सूचना

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

सागरी किनारा मार्गाचे दक्षिण मुंबईतील बांधकाम जवळपास पूर्ण झाले असून या टप्प्यावर मार्गाचे संरेखन किंवा रचनेत कोणताही बदल करण्याचे आदेश दिले जाऊ शकत नाहीत. त्यामुळे, या प्रकल्पात मूलभूत बदल न करता अधिक प्रवेशयोग्य मोकळ्या जागा तयार करण्यासाठी मार्गाच्या रचनेत बदल करण्याची मागणी करणारी जनहित याचिका उच्च न्यायालयाने गुरुवारी फेटाळली.

त्याचवेळी, समुद्राचा आनंद लुटता यावा यासाठी समुद्राजवळ नागरिकांना फेरफटका मारण्यासाठी विस्तीर्ण जागा उपलब्ध करून दिली जाते. त्यामुळे, सागरी किनारा मार्गावरील अशा प्रवेशयोग्य मोकळ्या जागांचा अन्य कारणांसाठी वापर केला जाऊ नये, अशी मागणी याचिकाकर्त्याने केली होती. या मागणीचे निवेदन महापालिका आयुक्तांकडे सादर करण्याची मुभा मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या



खंडपीठाने यावेळी याचिकाकर्त्याला दिली. याचिकाकर्त्यांच्या या निवेदनावर महापालिका आयुक्तांनी योग्य तो निर्णय घ्यावा, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. शहर नियोजनाशी संबंधित ॲलन अब्राहम या वास्तुरचनाकाराने ही याचिका केली होती. या याचिकेवर गुरुवारी सुनावणी झाली असता, या प्रकल्पासाठी ११० एकर जागा समुद्रात भराव टाकून तयार करण्यात आली आहे. परंतु, त्या जागेचा अपेक्षित वापर होत नसल्याचे याचिकाकर्त्यातर्फे वकील तुषाद ककालिया यांनी न्यायालयाला सांगण्याचा प्रयत्न केला. अशा खुल्या जागा समुद्रकिनारी कधीच नसतात. या प्रकरणीही भराव टाकून सागरी किनारा मार्ग बांधण्याचा प्रस्ताव होता. त्यामुळे, हा मार्ग आणि जुना रस्ता यामध्ये मोकळ्या जागा ठेवण्यात येणार होत्या, असे महापालिकेच्यावतीने वकील जोएल कार्लोस यांनी न्यायालयाला सांगितले. तसेच, याचिकाकर्त्याची मागणी यापूर्वीही फेटाळण्यात आल्याचा दावा केला.

## 'महारेल'च्या व्यवस्थापकीय संचालकांची मुदतवाढ वादाच्या भोवऱ्यात! नवी नियुक्ती करणे अपरिहार्य

■ मुंबई : गणेश बागडे

राज्यातील रेल्वे प्रकल्पांसाठी केंद्रीय अर्थसंकल्पात हजार कोटींची तरतूद करण्यात आली असून यात महत्त्वपूर्ण असलेल्या महाराष्ट्र रेल्वे पायाभूत विकास महामंडळाच्या (महारेल) व्यवस्थापकीय संचालकांना दिलेली मुदतवाढ सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. आपली चूक लक्षात येताच राज्याच्या गृह (परिवहन) विभागावर ही मुदतवाढ रद्द करण्याचा प्रस्ताव मुख्यमंत्र्यांना सादर करण्याची नामुष्की ओढवली आहे. राज्यातील रेल्वे प्रकल्पांना गती मिळावी, प्रकल्प झटपटमार्गी लागावेत यासाठी राज्य शासन आणि रेल्वे मंत्रालय यांच्यात २०१६ मध्ये झालेल्या करारानुसार राज्य शासन आणि रेल्वेची समान भागीदारी असलेल्या 'महारेल'ची स्थापना करण्यात आली. या करारानुसार, व्यवस्थापकीय संचालक पद भरण्यासाठी राज्याचे मुख्य सचिव तसेच परिवहन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांची समिती नियुक्त करण्यात आली. या समितीमध्ये रेल्वेच्या दोन सदस्यांचाही समावेश करण्यात आला. हे पद भरण्यासाठी रेल्वे मंत्रालयाने २०१७



मध्ये जाहिरात प्रसिद्ध केली. या जाहिरातीला अनुसरून पाच उमेदवारांची नावे निश्चित करण्यात आली. त्यापैकी राजेश कुमार जायस्वाल या सनदी अधिकाऱ्यांच्या नावाची शिफारस करण्यात आली. प्रतिनियुक्तीवर महारेलचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून राजेश कुमार यांची नियुक्ती करण्यात आली. ही नियुक्ती तीन वर्षांसाठी होती. २०२० मध्ये झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत व्यवस्थापकीय संचालकांचे पद प्रतिनियुक्तीऐवजी नियमित करण्याबाबत ठराव मंजूर करण्यात आला. त्यानुसार नियुक्त झालेले व्यवस्थापकीय संचालक हे सेवानिवृत्तीपर्यंत म्हणजे वयाच्या ६० वर्षांपर्यंत पदावर राहतील, असे निश्चित करण्यात आले. त्यामुळे राजेश कुमार यांनी पदाचा तांत्रिक राजीनामा देऊन ते नियमित व्यवस्थापकीय संचालक म्हणून नियुक्त झाले. वयोमानानुसार ते ३१ मार्च २०२४ मध्ये सेवानिवृत्त होणार होते. परंतु ऑक्टोबर २०२३ मध्ये त्यांनी राज्य शासनाला पत्र लिहून आपल्याला तीन वर्षांची नियुक्ती मिळावी, असा अर्ज केला.


महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.
E-mail-northmumbai.ee@mahapwd.com
दुरध्वनी क्रमांक .०२२-२६२३९१६४ फॅक्स - २६२०५७८८

ई -निविदा सुचना क्र. ७ सन २०२४-२०२५

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक- २६२३९१६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत मुंबई उपनगर जिल्हा (पश्चिम उपनगरे) मजूर सहकारी संस्था मार्यादित, मुंबई, यांच्या कडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https//mahatenders.gov.in येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. अर्जदार मजूर संस्था ज्या उपनगरातील संबंधीत असेल त्याच उपनगरातील कामासाठी अर्ज करु शकतात.

| अ.क्र. | कामाचेनांव | रक्कम |
| --- | --- | --- |
| १ | विविक्षित दुरुस्ती अंतर्गत इस्माईल युसुफ महाविद्यालय, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथील ॲनेक्स इमारतीमधील दरवाजे, खिडक्या व पाईल लाईन इ. स्थापत्य कामे करणे. | रु.१६७९३१२/- |
| २ | विविक्षित दुरुस्ती अंतर्गत इस्माईल युसूफ महाविद्यालय, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथील ॲनेक्स इमारतीमधील फ्लोरींग इ. स्थापत्य कामे करणे. | रु.१९१५८९२/- |
| ३ | विविक्षित दुरुस्ती अंतर्गत इस्माईल युसूफ महाविद्यालय, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथील ॲनेक्स इमारतीमधील प्लंबिंग,अंतर्गत प्लास्टर व रंगकाम इ. स्थापत्य कामे करणे. | रु.२४७०५०१/- |
| ४ | विविक्षित दुरुस्ती अंतर्गत इस्माईल युसूफ महाविद्यालय, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथील ॲनेक्स इमारतीमधील ड्रेनेज लाईन व पेव्हर ब्लॉक इ. स्थापत्य कामे करणे. | रु.१७१४३३६/- |
| ५ | विविक्षित दुरुस्ती अंतर्गत इस्माईल युसूफ महाविद्यालय, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथील ॲनेक्स इमारतीमधील प्लंबिंग, बाहय अंतर्गत प्लास्टर व रंगकाम इ. स्थापत्य कामे करणे. | रु.२०९११३५/- |
| ६ | विविक्षित दुरुस्ती अंतर्गत इस्माईल युसूफ महाविद्यालय, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथील जिमखाना इमारतीमधील दरवाजे, खिडक्या इ. स्थापत्य कामे करणे. | रु.२०६८३६१/- |
| ७ | विविक्षित दुरुस्ती अंतर्गत इस्माईल युसूफ महाविद्यालय, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथील जिमखाना इमारतीमधील फ्लोरींग इ. स्थापत्य कामे करणे. | रु.१५४०४७०/- |
| ८ | विविक्षित दुरुस्ती अंतर्गत इस्माईल युसूफ महाविद्यालय, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथील जिमखाना इमारतीमधील प्लंबिंग,अंतर्गत प्लास्टर व रंगकाम इ. स्थापत्य कामे करणे. | रु.१९०७९५२/- |
| ९ | विविक्षित दुरुस्ती अंतर्गत इस्माईल युसूफ महाविद्यालय, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथील जिमखाना इमारतीमधील ड्रेनेज लाईन व पेव्हर ब्लॉक इ. स्थापत्य कामे करणे. | रु.१५५१४९०/- |
| १० | विविक्षित दुरुस्ती अंतर्गत इस्माईल युसूफ महाविद्यालय, जोगेश्वरी (पूर्व), मुंबई येथील जिमखाना इमारतीमधील प्लंबिंग, बाहय अंतर्गत प्लास्टर व रंगकाम इ. स्थापत्य कामे करणे. | रु.१६८०११८/- |
| ११ | मुळगोण कामांतर्गत मालवणी पोलिस स्टेशन, मालाड (प) मुंबई येथील पाठीमागील संरक्षण भिंतीची दुरुस्ती करणे. | रु. २५३२१५६/- |
| १२ | मुळगोण कामांतर्गत मालवणी पोलिस स्टेशन, मालाड (प) मुंबई येथील समोरील संरक्षण भिंतीची लांबी वाढवणे व दुरुस्ती करणे. | रु. १२४००९९/- |
| १३ | मुळगोण कामांतर्गत अतिरिक्त पोलिस आयूक्त कार्यालय, कांदीवली (प) मुंबई येथील प्रसाधनगृहाची नुतनीकरण, कारपेट टाकणे व इतर स्थापत्य विषयक कामे करणे. | रु.१३५८५५४/- |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता , उत्तर मुंबई(सा.बां) विभाग, अंधेरी (प.) मुंबई ५८.यांनी राखून ठेवला आहे.अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. ०६/०८/२०२४ ते दि.१३/०८/२०२४ पर्यंत
ई-निविदा उघडणे- दि. १४/०८/२०२४
जा.क्र.काअ/उमुवि/निविदा/ ७३०२
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,प्रशासकीय इमारत,
१ ला मजला,भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.
दिनांक :- 30 JUL 2024

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/१६२२



महाराष्ट्र शासन
इलाखा शहर विभाग, (सा.बां.)
ई -निविदा सुचना क्र. १३ सन २०२४-२०२५

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रमांक-२२०१६९७१ /२२०१६९७७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. लक्ष |
| --- | --- | --- |
| १ | कारवार स्ट्रीट येथील पोलीस वसाहत 'अ' इमारतीमधील सदनिका क्र. ४४ व ५१ भांडार कक्ष, सामाईक प्रसाधनगृहाची दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | २४.९७ |
| २ | कारवार स्ट्रीट येथील कारवार स्ट्रीट पोलीस ठाणे इमारतीमधील पहिल्या मजल्यावरी सहाय्यक पोलीस आयुक्तांचे कर्मचारी कार्यालय, पोलीस उपायुक्त यांचे दालन, पॅसेज व भांडार कक्षाची दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | २४.९८ |
| ३ | कारवार स्ट्रीट येथील कारवार स्ट्रीट पोलीस ठाणे आवारातील समोरील मोकळ्या जागेत सुशोभिकरण करणे, मंगलोरी कौलारु छत व लोखंडी पत्र्याच्या छताची, एचटाकीचे प्लॅटफोर्म ई.पी.डी., सांडपाणी व पावसाळी पाण्याच्या पाईपलाईनची दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | २४.९५ |
| ४ | कारवार स्ट्रीट येथील कारवार स्ट्रीट पोलीस ठाणे आवारातील सेल इमारतीमधील तळ मजल्यावर गिलावा, पॉलीमर, लादा, दरवाजे व खिडक्या, प्रसाधनगृहाची दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | २४.९८ |
| ५ | कारवार स्ट्रीट येथील कारवार स्ट्रीट पोलीस ठाणे मुख्य इमारतीवरील मंगलोरी कौलारु छताची, लाकडी फळ्या, जॉईस्ट व गर्डर्सची दुरुस्ती व नुतनीकरण करणे. | २४.९८ |
| ६ | कुलाबा मुंबई येथील सनी हाऊस रूम नं. ३०१ च्या दरवाजे, खिडक्या, प्लास्टर, मंगलोरी छताची दुरूस्ती करणे आणि रंगकाम करणे. | १४.३५ |
| ७ | कारवार स्ट्रीट मुंबई कारवार स्ट्रीट पालीस ठाणे इमारती मधील १ ल्या मजल्यावरील सहाय्यक पोलीस आयुकत कार्यालय रूम मुख्यामंत्री सुरक्षा प्रभारी, संरक्षा व संरक्षा कार्यालय, पॅसेजमध्ये गिलावा, पॉलीमर लादया, दरवाजे व खिडक्या प्रसाधनगृह दुरूस्ती व नुतनी करणे. | २४.९७ |
| ८ | एम.आर.ए पोलीस मुंबई आवारातील 'बी' इमारत येथे दरवाजे, फ्रेम, प्लास्टर, दुरूस्ती करणे. | २१.०९ |
| ९ | व्ही.पी.रोड पोलीस सेकशन मुंबई अधिकारी निवासस्थान येथे दरवाजे,वेदरशेड,बाहेरील प्लास्टर, रंगकाम दुरूस्ती करणे. | २८.७३ |
| १० | व्ही.पी.रोड प्रेस सेकशन मुंबई येथील २ मजल्यावरील निवासस्थान आणि अधिकारी निवासस्थान येथे फ्लोरींग, किचन, प्रसाधनगृह, दरवाजे, खिडक्या,प्लास्टर, रंगकाम दुरूस्ती व नुतनीकरण करणे. | २२.२९ |
| ११ | एम.आर.ए पोलीस स्टेशन आवार मुंबई येथील 'ए' इमारत येथील दरवाजे, फ्रेम,प्लास्टर,पॅसेज दुरुस्ती करणे. | २१.०९ |
| १२ | एल. टी. मार्ग मुंबई येथील सी.पी ऑफीस आवारमधील ए आणि बी ब्लॉक प्रसाधनगृह येथे बाहेरील बाजूस प्लास्टर व रंगकाम करणे. | ३२.०८ |
| १३ | मादाम कामा रोड येथील नविन प्रशासकीय इमारत तळ मजला येथे जनरेटर, डाटासेंटर चे स्ट्रक्चरल शेड रुफिंगचे काम करणे. | १६.८५ |
| १४ | एल.टी. रोड मुंबई येथील सी.पी.ऑफिस आवारातील ए आणि बी ब्लॉक येथील ३ मजला व टेरेस येथे वॉटर पुफींगचे काम करणे व नुतनीकरण करणे. | ३५.४० |

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. ५.८.२०२४ ते दि. १२.८.२०२४ पर्यंत.
ई-निविदा उघडणे- दि. १३.८.२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता
निविदा सुचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.
खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1)www.mahapwd.com
2) http :// mahatenders.gov.in

जा.क्रं. इशवि/निलि/ ७०६७९
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला,बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक : ३०/७/२४

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/१५५४

# रिसॉर्टवरील कारवाई योग्य की अयोग्य?

**■ विरार : सुचिता देशमुख**

अर्नाळा नवापूर येथील सेव्हन सी रिसॉर्ट मध्ये ठाण्यातील शिवसैनिकाचा मारहाणीत मृत्यू झाला आणि नवीन वातावरण पेटले. मुख्यमंत्र्यांच्या आदेशाने रिसॉर्ट जमीनदोस्त करण्यात आले. ही कारवाई सूडबुध्दीने झाल्याचा आरोप होत आहे. यामुळे स्थानिक उध्दवस्त झाले. पण या कारवाईमुळे स्थानिकांनी आनंद व्यक्त केला आहे.

ठाण्यातील एक गट अर्नाळा नवापूर येथील सी सेव्हन रिसॉर्ट मध्ये सहलीसाठी आला. सर्व काही आलबेल सुरू होतं. मौजमजा सुरू होती. पण एका स्थानिक रिक्षावाल्याने या गटातील एकाला धडक दिली. वाद वाढला. मग रिक्षाचालकाने गावातील काही लोकं आणि रिसॉर्टच्या कर्मचारी गोळा केले आणि या गटला मारहाण केली.परिणामी या गटातील एक मिलिंद मोरे यांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. प्रकरण एवढ्यावर थांबले असते. पण मिलिंद मोरे हे ठरले ठाण्याचे शिवसैनिक. खुद्द मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बालेकिल्ल्यातील. त्यातही ठाकरे गटाचे. त्यामुळे सहानभूती मिळविण्यासाठी शिंदे आक्रमक झाले. मारहाण करणाऱ्यांवर हत्येचा गुन्हा दाखल झाला आणि लगेच रिसॉर्ट जमीनदोस्त करण्याचे आदेश आले. खुद्द मुख्यंत्र्यांचे आदेश म्हटल्यावर महसूल आणि थेट संबंध नसलेली पालिका कारवाईला उतरली. सलग १६ तास कारवाई करून रिसॉर्ट जमीनदोस्त करण्यात आले. यानिमित्ताने चर्चा सुरू झाली ती रिसॉर्टवरील कारवाई योग्य की अयोग्य त्याची. रिसॉर्ट अनधिकृत होते हे सत्य पण कारवाई सुडबुध्दीने झाली असाही एक प्रवाह सुरू झाला आहे.

वसईच्या किनारपट्टीवर असणारे रिसॉर्ट, त्यामुळे होणारे विविध प्रकारचे तोटे हा विषय नवा नाही. गेल्या ३ दशकांपासून ही रिसॉर्ट संस्कृती एक समस्या बनली आहे. वसई पश्चिमेच्या किनारपट्टीवर अर्नाळा, नवापूर, जेलाडी ,राजोडी आदी परिसरात अनेक रिसॉर्ट आहेत. एकट्या अर्नाळा ते कळंब परिसरात २०० हून अधिक छोटी रिसॉर्ट असून ३५ तरणतलाव असलेली मोठी रिसॉर्ट आहेत.सीआरझेड कायद्याचे उल्लंघन करून, खाजण जमीनीवर हे बेकायदेशीर रिसॉर्ट उभारण्यात आले होते. दुसरीकडे सीआरझेड ची मर्यादा ५०० मीटर वरून ५० मीटरवर आली. त्यामुळे रिसॉर्टची संख्या देखील वाढली



त्यावर आंदोलने झाली, मोर्चे झाली..पर्यावरणवादी लढून लढून थकले. पण रिसॉर्ट संस्कृती कमी न होता वाढली. कधी कुठल्याही रिसॉर्टवर कारवाई झाली नाही. झाली तरी ती दिखाऊ. मागील वर्षी जानेवारी महिन्यात नवापूर वटार येथील सी व्हूयू कॅफे, ओशन बीन हाऊस, कॅफे सी अॅण्ड सॅण्ड, सी कोस्ट फार्म कॅफे या ४ रिसॉर्टवर दिखाऊ कारवाई करण्यात आली होती. कारण कारवाई नंतर ते पुन्हा सुरू झाले. सेव्हन सी रिसॉर्टवर कारवाई सुडबुध्दीने झाली असा एक मतप्रवाह वसईत आहे. कारण कारवाई एकाच दिवसात थंडावली. त्यामुळे मृत्यूची सहानभूती मिळविण्यासाठी कारवाई केल्याचे स्पष्ट होत आहे. या कारवाईला विरोध असणाऱ्या वर्गाचा रिसॉर्टमधील गैरप्रकाराना समर्थन नाही पण कारवाई करतना नोटीस पाठवणे गरजेचे होते असे मत आहे. एका रिसॉर्टवर कारवाई केली मग बाकी शेकडो अनधिकृत रिसॉर्टवर कारवाई का नाही असा सवाल केला जात आहे.. रिसॉर्ट मधील हा काही पहिला मृत्यू नाही. मागील दिड वर्षात ७ जणांचा रिसॉर्टमध्ये वेगवेगळ्या कारणांमुळे मृत्यू झाला होता. तेव्हा अशी तत्परतेने कारवाई का झाली नाही? असा देखील सवाल उपस्थित केला जात आहे. एकीकडे रिसॉर्टवरील या कारवाईला विरोध होत असला तरी दुसरीकडे स्थानिकांना मात्र आनंद झाला आहे. वसईच्या किनारपट्टीवरील रिसॉर्टमध्ये येणाऱ्या पर्यटकांकाच्या हुल्लडबाजीचा येथील ग्रामस्थांना त्रास होत असतो. शनिवार आणि रविवार या सुट्टीच्या दिवशी या रिसोर्समध्ये जवळपास एक लाखांहून अधिक पर्यटक येत असतात.

# २१ तृतीयपंथीयांवर गुन्हे दाखल; उरण फाटा, नेरुळ, सीबीडी,एपीएमसी पोलीस ठाण्यांतर्गत कारवाई

**■ नवी मुंबई : धनश्री सट्टा**

रात्री-अपरात्री सेवा रस्ते व एपीएमसी ट्रक टर्मिनल येथे बीभत्स व अश्लील चाळे करून वाहनचालकांना आकर्षित करणाऱ्या २१ तृतीयपंथीयांवर कारवाई करण्यात आली आहे. नवी मुंबईत अनेक ठिकाणी रात्रीच्या वेळी रस्त्याच्या कडेला तृतीयपंथीय उभे राहून अश्लील चाळे करीत वाहनचालकांना आकर्षिक करण्याचा प्रयत्न करत असतात. मात्र त्यांच्यावर फारशी कारवाई होत नसल्याने गेल्या काही दिवसांपासून त्यांच्या संख्येत वाढ होत होती. अनेकदा एकट्या-दुकट्या व्यक्तीला लुटण्याचे प्रकार



होतात, मात्र पोलीस ठाण्यात येण्याचे लोक टाळतात. रात्री उशिरा तर रस्त्याच्या मध्यापर्यंत तृतीयपंथी येत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे मोठा अपघात होण्याचीही शक्यता आहे. ही परिस्थिती निदर्शनास आल्याने पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी अशा लोकांवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांनी तीन विशेष पथके तयार केली. या पथकांनी निर्देश दिल्याप्रमाणे कारवाईअगोदर काही दिवस साध्या वेशात पाहणी केली.

# एपीएमसी फळ बाजारातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद

**■ मुंबई : विशेष प्रतिनिधी**

एपीएमसी बाजार आवारात अनेक घटना घडत असतात. लूटमार, चोरी, अवैध धंदे, गांजा विक्रीच्या घटनाही घडतात. एपीएमसी फळ बाजारात ६३ सीसीटीव्ही आहेत, मात्र यातील बहुतांश सीसीटीव्ही बंदच आहे. या सीसीटीव्ही यंत्रणेची लवकर दुरुस्ती करावी, अशी मागणी फळ बाजारातील व्यापाऱ्यांनी केली आहे. एपीएमसीची आशिया खंडातील सर्वात मोठी कृषी बाजारपेठ म्हणून ख्याती आहे. मात्र ही बाजार समिती सीसीटीव्हीविना सुरक्षेत मागे राहिली आहे. प्रत्येक बाजारात सुरक्षा रक्षक तेसच व्यापारी असोसिएशनच्या अंतर्गत काही ठिकाणी सीसीटीव्ही आहेत.




एपीएमसीकडून काही ठिकाणी सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत. फळ बाजारात ६३ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. मात्र त्यातील सर्वाधिक सीसीटीव्ही बंद आहेत. भाजीपाला बाजारात ५६ तर फळ बाजारात ६३ सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत. मात्र या १७० एकरवर वसलेल्या एपीएमसीला अधिक सुरक्षेची गरज आहे. फळ, धान्य, भाजीपाला, मसाला, कांदा-बटाटा असे सगळे बाजार एकाच आवारात सुरू झाले. या बाजारात दरोरोज जवळपास सहा हजार गाड्या वेगवेगळ्या ठिकाणांहून येतात. त्यात वेगवेगळ्या शेतकऱ्यांचा वेगवेगळ्या प्रतीचा माल असतो. या बाजाराच्या आवारात ३७०० गोदामे, १५०० व्यावसायिक गाळे, ४ मोठे लिलाव हॉल, ५ मोठे घाऊक मार्केट यार्ड आहेत. दोन ते तीन वर्षांपूर्वी खासदार निधीतून बाजारात सीसीटीव्ही बसविण्यात आले होते. मात्र काही चालू तर काही बंद तर काही ठिकाणी सीसीटीव्हीच नाहीत. अशी अवस्था आहे. फळ बाजारात चोरीच्या घटना घडतच असतात. तर काही वर्षांपूर्वी फळ बाजारात वैयक्तिक वादातून एका व्यक्तीने वाहन स्फोटक व ज्वलनशील पदार्थ ठेवून स्फोट घडवून आणला होता. मसाला बाजाराच्या आवाराबाहेर मोठ्या गटारात एक अज्ञात मृत इसमाचा सांगाडा निदर्शनास आला.

# प्राध्यापिकेला चिरडणारा तरुण मद्यधुंद असल्याचे स्पष्ट, सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल

**■ वसई : सुचिता देशमुख**

वसई- विरारच्या गोकुळ टाऊनशीप येथे प्राध्यापिका आत्मजा कासाट यांना धडक देणारा चालक शुभम पाटील (२४) हा मद्याच्या नशेत असल्याचे वैद्यकीय तपासणीत स्पष्ट झाले आहे. त्याच्यावर अर्नाळा सागरी पोलीस ठाण्यात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुरूवारी संध्याकाळी झालेल्या अपघाता प्रा आत्मजा यांचा




मृत्यू झाला होता. विरारच्या विवा कनिष्ठ महाविद्यालयात प्रा. आत्मजा कासाट या इंग्रजीच्या प्राध्यापिका म्हणून कार्यरत होत्या. गुरूवारी संध्याकाळी महाविद्यालय सुटल्यावर त्या गोकुळ टाऊनशीप येथील घरी जाण्यासाठी निघाल्या होत्या. त्यावेळी मुलजीभाई मेहता शाळेजवळ मागून येणाऱ्या फॉर्च्युनर गाडीने त्यांना धडक दिली होती. या धडकेत गंभीर जखमी असलेल्या प्रा. आत्मजा यांना विरारच्या प्रकृती या खासगी रुग्णालयात दाखळ करण्या रात्री दहाच्या सुमारास मृत्यू झाला होता. फॉर्च्युनर गाडी शुभम पाटील (२४) नावाचा तरूण चालवत होता. अपघात घडला तेव्हा गाडीत त्याचा मित्र आणि अन्य दोन तरूणी होत्या. ते सर्व मद्याच्या नशेत होते.

# भिवंडीतील अनधिकृत टेलिफोन एक्स्चेंजवर एटीएसची कारवाई, २४६ सिमकार्डसह १९१ अँटीना जप्त, आरोपीला अटक

**■ भिवंडी : सचिन कदम**

भिवंडीतून अनधिकृतपणे चालणाऱ्या टेलिफोन एक्स्चेंजवर राज्य दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) कारवाई केली आहे. या कारवाईत ९ सिम बॉक्स, विविध कंपन्यांचे २४६ सिम कार्ड, ८ वायफाय राउटर सिमबॉक्स चालविण्याकरीता वापरण्यात येणारे १९१ अँटीनासह विविध साहित्य जप्त करण्यात आले आहे. याप्रकरणी अनधिकृत टेलीफोन एक्स्चेंज चालविणाऱ्या जाफर बाबूउस्मान पटेल (४०) याला एटीएसने अटक केली आहे. बेकायदेशीर सिमबॉक्सच्या सहाय्याने अनधिकृत टेलिफोन एक्स्चेंज चालवले जात असल्याची माहिती ३१ जुलै रोजी एटीएसला मिळाली. त्या गोपनीय माहितीच्या आधारे एटीएसच्या अधिकाऱ्यांनी



भिवंडीतील नवीन गौरीपाडा आणि रोशनबाग या ठिकाणी छापा टाकून अनधिकृत टेलिफोन एक्स्चेंजचा शोध घेतला. कारवाई दरम्यान दिनस्टार कंपनीचे ९ सिम बॉक्स, विविध कंपन्यांचे २४६ सिम कार्ड, विविध कंपन्यांचे ८ वायफाय राउटर, सिमबॉक्स चालविण्याकरीता वापरण्यात येणारे १९१ अँटीना आणि सीमबॉक्स कायम कार्यान्वित रहावा यासाठी वापरण्यात येणारे इनव्हर्टर असा अंदाजे एक लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दीड वर्षापासून अनधिकृत टेलिफोन एक्स्चेंज सुरू होते. त्यामुळे भारत सरकारच्या दूरसंचार विभागाचे तीन कोटींचे नुकसान झाल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. तेथून आखाती देशात दूरध्वनी करण्यात आले आहेत. याप्रकरणी एटीएसने पटेल याला ताब्यात घेत चौकशीनंतर अटक केली. तो त्याच्या साथीदारांच्या मदतीने अनधिकृत टेलीफोन एक्स्चेंज चालवत होता. दहशतवाद विरोधी पथकाने त्याच्या विरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४), ३ (५) सह भारतीय टेलिग्राफ कायदा १८८५ मधील कलम ४, सह द टेलिकम्युनिकेशन ॲक्ट २०२३ चे कलम ४२ तसेच इंडियन वायरलेस टेलीग्राफी ॲक्ट १९३३ कलम ३ व ६ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.


महाराष्ट्र शासन, गृह विभाग (बंदरे व परिवहन)
**महाराष्ट्र सागरी मंडळ**
इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स, दुसरा मजला, १४ रामजीभाई कमानी मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई – ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६१०८१७७७ फॅक्स क्र. ०२२-६१०८१३८०
Website : https://mahammb.maharashtra.gov.in
Email: ceo.mmb@maharashtra.gov.in / ceommb@gmail.com

**ई - निविदा सूचना (सन २०२४-२५)**
Main Portal : https://mahatenders.gov.in

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व योग्य अनुभव असलेल्या ठेकेदाराकडून खाली नमूद केलेल्या कामासाठी बी- १ नमुन्यात ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाच्या निविदेची अंदाजित किंमत (रु.) | इसारा रक्कम (रु.) | को-या निविदेची किंमत (रु.) | काम पूर्ण करण्याचा कालावधी(महिन्यात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | Repairing , Beautification and Providing allied facilities to passeger Jetty at Varsova Tal. Andheri Dist. Mumbai Suburban. | ८८,८६,९८३/- | ८९,०००/- | ९,९८०/- | ०९ महिने (पावसाळा कालावधी धरून) |

तपशिलवार अटी व शर्ती पाहण्यासाठी तसेच कोरा निविदा फॉर्म डाऊनलोड करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा पोर्टल https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०१.०८.२०२४ रोजी १७:०० वा. ते दिनांक ०८.०८.२०२४ रोजी १७.०० वा. पर्यंत उपलब्ध असतील.

कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/१५६९

सही/-
(तुषार पाटोळे)
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई.



**वसई–विरार शहर महानगरपालिका**
प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम)
मुख्य कार्यालय विरार
दूरध्वनी क्र. १२२५०-२४०२१७९/२४०२५६३

**जाहिर नोटीस**

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्याचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १. | आचोळे-१२ | NL२१/२९३/४३ | १५५१ | विमला राजेश हेलिया | भावना लक्ष्मण परमार |
| २. | आचोळे-१२ | NL२१/१०२/९ | १५४९ | संजय सुर्वे | उर्मिला माताफेर गुप्ता |
| ३. | आचोळे-१२ | NL२१/३७५/३६ | १६०२ | लकेश्वरी सचिन वैती | शिफा परवेझ खान |
| ४. | आचोळे-१२ | NL२१/३५८/३७ | १६३० | महेश भागोजी कुंभेकर | सविता देवीदास बटावले |
| ५. | आचोळे-१२ | NL२१/३२२/४ | ४१०८७ | चतुरीसम कनोजिया | हरिकृष्ण टाकोरलाल गांधी |
| ६. | आचोळे-१२ | NL२१/१३२/१ | १६४४ | सरभु शंकर गुप्ता | पंकज आर यादव व धीरज राजेंद्र प्रसाद यादव |
| ७. | आचोळे-१२ | NL२१/११९/१४ | १६४६ | सुंदरम सोसायटी | पंकज आर यादव व धीरज राजेंद्र प्रसाद यादव |
| ८. | आचोळे-१२ | NL२१/१५३/१६ | १६८७ | जयश्री केशव कामले | रविंद्र नारायण सोलंकी व आरती रविंद्र सोलंकी |
| ९. | आचोळे-१२ | NL२१/९२/२८ | १६८९ | नामदेव यशवंत पाटील | संजु बीरेंद्र विश्वकर्मा |
| १०. | आचोळे-१२ | NL२१/११०/७ | ११११२ | चंद्रशेखर छोटेलाल माली | दत्ता जनार्दन भोईर |
| ११. | आचोळे-१२ | NL२१/७५/१२ | १८५२ | गीता संतोष सागवेकर | सुनिल सिताराम जाधव |
| १२. | आचोळे-१२ | NL२१/२४६/४१ | १७२१ | शंभु मिथिलेडा झा | अतिश शरद चव्हाण/भाग्यश्री अनिश चव्हाण |
| १३. | आचोळे-१२ | NL२१/९९/१६ | १७३९ | हसिन सिद्दीकी | प्रमोदकुमार अनुपलाल शर्मा |
| १४. | आचोळे-१२ | NL२१/३६३/१६ | १४९१ | चिन्मय अनंत पावसकर | मनिषा मनोहर जोगले |
| १५. | आचोळे-१२ | NL२१/२२२/३३ | १७७३ | अनंत आश्रय कंट्रक्शन | चंदन कुमार रॉय |
| १६. | आचोळे-१२ | NL२१/८८/६ | १७८६ | घनश्याम निरह गुप्ता व राधेश्याम निरह गुप्ता | दुर्गेश रामदरश गुप्ता व मुकेश रामदरश गुप्ता |
| १७. | आचोळे-१२ | NL२१/२८५/३१ | १८२४ | कैलाशचंद्र मालविया | शादाब रहमुद्दीन आलम व अफसाना बेगम शादाब आलम |
| १८. | आचोळे-१२ | NL२१/२४८/४५ | १८६३ | सर्वेश एस. चौबे | देवेश सुबेदार चौबे व अभिजित देवेश चौबे |
| १९. | आचोळे-१२ | NL२१/२१/२१ | १८७५ | दिगंबर नारायण मराठे | अक्षता अनंत भोसले व प्रथमेश अनंत भोसले |
| २०. | आचोळे-१२ | NL२१/२५७/७० | १८८६ | विशाल अनंत भुवड | जगन्नाथ रामजतन शर्मा |

जावक क्र.:-व.वि.श.म./क.वि.११०१/२०२४-२५
दिनांक: ०२-०८-२०२४

(निता कोरे)
प्र. सहाय्यक आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा



**महाराष्ट्र शासन**
इलाखा शहर विभाग, (सा.बां.)
**ई -निविदा सुचना क्र. ९ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रंमांक-२२०१६९७५ /२२०१६९७७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | विशेष दुरूस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १२/ब-१२ | १२.५४ |
| २ | विशेष दुरूस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. ११/ब-१७ | १२.५४ |
| ३ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १२/ब-५ | १२.५९ |
| ४ | विशेष दुरूस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १२/ब-३ | १२.४९ |
| ५ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १७/ब-११ | १२.४९ |
| ६ | विशेष दुरूस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १२/ब-४ | १३.०४ |
| ७ | विशेष दुरूस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. ११/ब-२० | १३.०३ |
| ८ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. ११/ब-१५ | १३.०९ |
| ९ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. ६/३० | १२.५० |
| १० | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १७/ब-२२ | १२.४३ |
| ११ | विशेष दुरूस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १२/अ-११ | १९.२४ |
| १२ | विशेष दुरूस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १७/अ-८ | १८.३० |
| १३ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १२/ब-११ | १२.५९ |
| १४ | विशेष दुरूस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १४/ब-१७ | १२.७५ |
| १५ | विशेष दुरूस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १३/ब-१८ | १२.६४ |
| १६ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १७/ब-१७ | १२.६० |
| १७ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १७/ब-५ | १२.६३ |
| १८ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. ११/ब-७ | १२.६४ |
| १९ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १४/ब-४ | १२.६४ |
| २० | विशेष दुरूस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. ६/३४ | १२.५९ |
| २१ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १२/ब-१५ | १२.५३ |
| २२ | विशेष दुरूस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १३/ब-१२ | १२.६८ |
| २३ | विशेष दुरूस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १३/ब-८ | १२.५९ |
| २४ | विशेष दुरूस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १२/ब-२० | १२.५८ |
| २५ | विशेष दुरुस्ती अंतर्गत हाजीअली शासकीय अधिकारी वसाहत येथील निवासस्थानाची स्थापत्य कामे व रंगरंगोटी करणे निवासस्थान क्र. १३/ब-१५ | १४.१२ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. १.८.२०२४ ते दि. ८.८.२०२४ पर्यंत.
ई-निविदा उघडणे- दि. ९.८.२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता
निविदा सुचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.
खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com
2) http :// mahatenders.gov.in

जा.क्रं. इशवि/निलि/ 90636
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला,बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक : 30/6/24

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/१५६१

# राज्यात २५१५ गावांतील विकासकामे थांबणार? पश्चिम घाट मसुदा अधिसूचनेतील नोंदीमुळे प्रकल्पांवर परिणाम

■ **मुंबई : यश सावंत**

केंद्र सरकारने पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील म्हणून जाहीर केलेल्या क्षेत्रात राज्यातील २५१५ गावांचा समावेश आहे. यासंबंधी नव्याने जारी अधिसूचनेवर अंमलबजावणी झाल्यास विशेषत: रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सातारा, कोल्हापूर आणि पुणे या जिल्ह्यांतील अनेक प्रस्तावित प्रकल्प, उद्योगांवर प्रभाव पडण्याची शक्यता आहे. केरळमधील वायनाड जिल्ह्यात नुकतेच अतिपावसामुळे झालेल्या भूस्खलनामुळे दोनशेहून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला असून, कित्येक जण बेपत्ता आहेत. या घटनेनंतर पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील असा पश्चिम घाट आणि या क्षेत्रातील विकासकामांचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला. यासंदर्भात ज्येष्ठ पर्यावरणतज्ज्ञ माधव गाडगीळ यांनी २०११मध्ये केंद्र सरकारला सादर केलेल्या अहवालाकडेही लक्ष वेधले जात आहे.

पश्चिम घाटाला पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील घोषित करण्यासाठीचा पाचवा मसुदा केंद्राने नुकताच जाहीर केला आहे. त्यानुसार राज्यातील १७ हजार ३४० चौ. किमी क्षेत्र संवेदनशील म्हणून घोषित करण्याचे प्रस्तावित आहे. यापूर्वी २०२२ साली जाहीर केलेल्या मसुद्यानुसार राज्यातील २१३३ गावांचा समावेश संवेदनशील क्षेत्रात करण्याचे प्रस्तावित होते.



त्यातील ३८८ गावे वगळण्याची मागणी करण्यात येत होती. राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनातही हा विषय गाजला होता. विकास प्रकल्प, औद्योगिक प्रकल्प, खाणी प्रस्तावित असलेली गावे वगळण्याबाबत केंद्राकडे प्रस्ताव पाठवण्यात येईल, असे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी जाहीर केले होते. गेल्या वर्षी जानेवारीत साधारण ५८२ गावे वगळण्याची विनंती केंद्राकडे करण्यात आली होती. मात्र, आता नव्याने जाहीर झालेल्या या मसुद्यात गावे वगळण्याऐवजी राज्यातील संवेदनशील म्हणून घोषित गावांची संख्या वाढल्याचे दिसते आहे. कोल्हापूर, सातारा, पुणे, रायगड या भागांत अनेक विकास प्रकल्प प्रस्तावित आहेत. पुणे शहराच्या लगत वाढ होणारी मुळशी, मावळ, आंबेगाव या भागांतील अनेक गावे संवेदनशील क्षेत्र म्हणून प्रस्तावित आहेत. रत्नागिरीतील परशुराम-पेढे, राजापूर, खेड, लांजा येथील अनेक गावे, सिंधुदुर्गातील देवगड, कणकवली, सावंतवाडी, कुडाळ, वैभववाडी येथील गावेही संवेदनशील घोषित होणार आहेत. नुकताच राज्याने सातारा येथील विकास कामांचा आढावा जाहीर केला. मात्र, महाबळेश्वर, वाई, सातारा, पाटण येथील अनेक गावांचा केंद्राने जाहीर केलेल्या आराखड्यात समावेश आहे. यापूर्वी कोल्हापूर येथील अनेक गावे वगळण्याची मागणी प्राधान्याने होत होती. कोल्हापूरमधील पन्हाळा, गगनबावडा, भूदरगड, चंदगड, आजरा, राधानगरी येथील गावांचा मसुद्यात समावेश आहे.

## अपप्रचारांविरोधात व्यापक मोहीम राबवा

■ **अलिबाग : नितीन देवळेकर**

मुस्लीम आणि बहुजन समाजात भाजपबद्दल करण्यात आलेल्या अपप्रचाराचा भाजपला लोकसभा निवडणुकीत मोठा फटका बसला. या विरोधकांकडून राबविण्यात आलेल्या अपप्रचाराची भाजपने मोठी धास्ती घेतली आहे. त्यामुळे जिल्हा पातळीवर कार्यकर्ता संमेलने घेऊन विरोधकांच्या अपप्रचाराविरोधात व्यापक मोहीम राबविण्याचे निर्देश कार्यकर्त्यांना देण्यात आले आहेत. लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान विरोधकांनी मुस्लीम मतांचे ध्रुवीकरण करण्याची खेळी खेळली. याचा परिणाम रायगड जिल्ह्यातील मुस्लीमबहुल मतदारसंघात मोठ्या प्रमाणात दिसून आला. दुसरीकडे नरेंद्र मोदी पुन्हा सत्तेत आले तर



देशाची राज्यघटना बदलली जाईल अशी भीती बहुजन समाजात पसरली गेली. याचा भाजपला मोठा फटका बसला. त्यामुळे जिल्हा पातळीवर कार्यकर्ता संमेलने घेऊन विरोधकांच्या अपप्रचारांना जोरदार प्रतिउत्तर देण्याचे निर्देश भाजपने कार्यकर्त्यांना देण्यास सुरुवात केली आहे. अलिबाग येथील सहाण येथे रायगड जिल्हा भाजप कार्यकर्ता संमेलन शुक्रवारी पार पडले. या संमेलनात भाजपचे कोकण प्रभारी आणि राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी कार्यकर्त्यांना खोट्या प्रचाराला खऱ्या प्रचाराने उत्तर देण्याचा सल्ला दिला. शासनाची ध्येयधोरणे, विविध योजना तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवा, विरोधकांचे अपप्रचार मोडून काढा, साडेतीन महिने सतत क्रियाशील राहा, असे निर्देशही त्यांनी दिले.

## सत्ताधाऱ्यांच्या ११ साखर कारखान्यांना मदत

■ **मुंबई : विशाल कारंडे**

राज्यातील सत्ताधाऱ्यांच्या ११ सहकारी साखर कारखान्यांना शासन हमीवर १५९० कोटी रुपयांचे खेळत्या भागभांडवलासाठी मार्जिन मनी लोन उपलब्ध करून देण्याचा निर्णय सरकारने घेतला असून त्यानुसार या कारखान्यांना निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. मात्र लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या विरोधात भूमिका घेणाऱ्या विरोधकांच्या दोन साखर कारखान्यांना केंद्राने मंजूर केलेले कर्ज रोखण्याचा राज्य सरकारचा निर्णय वादाच्या भोवऱ्यास सापडला आहे. सरकारच्या निर्णयाविरोधात न्यायालयात धाव घेण्याची तयारी काही



कारखादारांनी सुरू केल्याची माहिती सूत्रांनी दिली.

राज्य सरकारने लोकसभा निवडणुकीपूर्वी अडचणीतील साखर कारखान्यांना राज्य सरकारच्या हमीवर राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून कर्ज मिळवून देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार सत्ताधारी भाजप आणि राष्ट्रवादी अजित पवार गटातील अशा ११ तर विरोधकांमधील सहकारमहर्षी शंकरराव कोल्हे (कोपरगाव) १२५ कोटी आणि काँग्रेसचे भोरचे आमदार संग्राम थोपटे यांच्या राजगड साखर कारखान्यास ८० कोटी १३ कारखान्यांना १८९८ कोटी रुपयांच्या कर्जाचा प्रस्ताव केंद्रास पाठविण्यात आला होता.

लोकसभा निवडणुकीत बारामती आणि अहमदनगर मतदारसंघांत मदत होईल या आशेवर विरोधकांच्या दोन कारखान्यांना मदत करण्यात आली होती. सरकारच्या या प्रस्तावास राष्ट्रीय सहकार निगमने मान्यता दिली.

## लोकप्रतिनिधींनी निवडणुकीपूर्वी ओबीसींबाबत भूमिका स्पष्ट करावी... अन्यथा समाज पराभूत करणार – लक्ष्मण हाके

■ **सांगली : गणेश बागडे**

विधानसभा निवडणुकीपूर्वी ओबीसी आरक्षणाबाबत आपली भूमिका लोकप्रतिनिधींनी स्पष्ट करावी अन्यथा येत्या निवडणुकीमध्ये ओबीसी समाज त्यांना पराभूत करेल, असे प्रतिपादन राज्य मागासवर्गीय आयोगाचे सदस्य आणि ओबीसी आंदोलक प्रा. लक्ष्मण हाके यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत केले. प्रा. हाके म्हणाले, की ओबीसी समाज आपल्या न्याय्य हक्कांसाठी संघर्ष करत आहे. मात्र, लोकप्रतिनिधी यावर व्यक्त होत नाहीत. ओबीसी आरक्षणाच्या लढ्याबाबत जिल्ह्यातील आठ आमदार आणि एक खासदार यांनी स्पष्ट भूमिका जाहीर करावी,



अन्यथा विधानसभा निवडणुकीत त्यांना पराभूत करण्याची भूमिका समाज घेईल. विदर्भ, मराठवाड्यात अशी भूमिका आम्ही घेतली आहे. ओबीसींचे राजकीय आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने रद्द केले असून, याबाबत शासनाने निवडणुका स्थगित करून पुनर्विचार याचिका दाखल केली आहे. मात्र, जलद सुनावणीसाठी सरकार फारसे प्रयत्नशील दिसत नाही. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एकछत्री प्रशासक राज सुरू आहे. अनुसूचित जातीसाठी असलेल्या आरक्षणामध्ये उपवर्गीकरण करण्याचा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे. याबाबत विचारले असता ते म्हणाले, की मुळात आरक्षण हा केवळ आर्थिक उन्नतीचा विषयच होऊ शकत नाही. पिढ्यान् पिढ्या जो समाज दुय्यम ठरविला गेला, हा समाज समतेच्या आधारे उन्नत व्हावा हा हेतू यामागे आहे. यामध्ये क्रिमीलेअरची अट लागू करणेही चुकीचे असून, याबाबत राजकीय पक्षांनी आपली भूमिका स्पष्ट करण्याची गरज आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे अनेक प्रश्न नव्याने निर्माण होण्याचा धोका असल्याचेही प्रा. हाके या वेळी म्हणाले. या वेळी माजी महापौर संगीता खोत, मैनुद्दीन बागवान, विष्णू माने, उबाठा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख संजय विभुते, संग्राम माने, हरिदास लेंगरे आदी उपस्थित होते.

## बेकायदा फेरीवाल्यांचा गंभीर मुद्दा चेष्टेचा विषय, सरकार-महापालिकेतील आरोपप्रत्यारोपावरून उच्च न्यायालयाचे खडेबोल

■ **मुंबई : प्रथमेश चव्हाण**

मुंबई आणि उपनगरातील सार्वजनिक रस्ते आणि पदपथांवरील वाढत्या बेकायदा फेरीवाल्यांच्या समस्येवर ठोस तोडगा काढण्याऐवजी त्यांवर कारवाई कोणी करायची? यावरून राज्य सरकार आणि महानगरपालिकेकडून एकमेकांवर आरोपप्रत्यारोप केले जात आहेत. दोन्ही यंत्रणांच्या या वर्तनामुळे बेकायदा फेरीवाल्यांचा गंभीर मुद्दा चेष्टा- मस्करीचा विषय झाला असल्याचे खडेबोल उच्च न्यायालयाने गुरुवारी सुनावले. बेकायदा फेरीवाल्यांच्या समस्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी फेरीवाला पदपथ फेरावाला



कायदा २०१४ मध्ये लागू करण्यात आला. त्यानुसार, फेरीवाला समन्वय समिती (टीव्हीसी) स्थापन करणे, फेरीवाल्यांना परवाने देणे अनिवार्य आहे. परवानाधारक आणि बेकायदा फेरीवाल्यांची ओळख पटण्याच्यादृष्टीनेही हा कायदा महत्त्वपूर्ण आहे. परंतु, कायदा करून दहा वर्षे उलटली तरी फेरीवाला समन्वय समितीची स्थापना करण्यात आलेली नाही. त्याऐवजी, राज्य सरकार आणि महापालिका प्रशासन एकमेकांवर आरोपप्रत्यारोप करून जबाबदारी झटकत असल्याचे न्यायमूर्ती महेश सोनक आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठाने सुनावले. तसेच, पदपथ, सार्वजनिक रस्त्यांच्या दुतर्फा ठाण मांडणाऱ्या बेकायदा फेरीवाल्यांमुळे नागरिकांना दररोज त्रास सहन करावा लागत असून फेरीवाला कायद्याची अंमलबजावणी सरकार आणि महापालिकेकडून केली जात नाही हे दुर्दैवी आणि क्लेशकारक असल्याचा संताप न्यायालयाने व्यक्त केला. कायद्याची अंमलबजावणी आणि न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांचेही पालन केले जात नसल्याबाबत न्यायालयाने नाराजी व्यक्त केली. अद्यापही टीव्हीसीची स्थापना का झाली नाही ? महापालिका प्रशासन सहकार्य करत नसल्याचे सरकारकडून सांगितले जाते, तर महापालिका अन्य कोणाकडे तरी अंगुलनिर्देश करते. कारवाईच्या मुद्यावरून यंत्रणांमध्ये एवढी हतबलता का? एकत्र येऊन समस्येवर तोडगा का काढला जात नाही? बेकायदा फेरीवाल्यांमुळे सगळ्यांनाच त्रास होत आहे. हे आणखी किती दिवस चालणार ? टीव्हीसी योजना लागू न करता तुम्ही सर्वसामान्यांचा त्रास कसा कमी करणार आहात ? अशी प्रश्नांची सरबत्ती न्यायमूर्ती सोनक यांनी सरकार आणि महापालिका प्रशासनाकडे केली. घोड्याला ओढ्यापर्यंत नेऊ शकतो पण घोड्याला पाणी स्वत:च प्यावे लागेल, असे सुनावताना या समस्येवर काही व्यावहारिक उपाय शोधावा असेही न्यायालयाने म्हटले. आपल्याकडे कायदे केले जातात परंतु त्यांची अंमलबजावणी केली जात नाही. कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही, तोपर्यंत सर्वसामान्यांनी हा त्रास सहन करत राहायचा का? असा प्रश्न न्यायालयाने विचारला.


**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,**
**आरे गोरेगाव,(पूर्व),मुंबई -४०००६५.**

**ई-निविदा सूचना क्रमांक ०३ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, सा.बा. विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई - ४०० ०६५ योग्य कंत्राटदारांकडून अनु.क्र.१ ते४ करीता व नोंदणीकृत कंत्राटदार वर्ग-४ सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून अनु.क्र.५ ते ७ करीता खालील कामाकरीता ब -१ नमुन्यातील निविदा ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शसनाच्या संकेतस्थळावर www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कोणतेही कारण न देता सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली येथील प्राण्यांकरीता रुग्णालय पिंजरा, संरक्षक भिंत व प्राण्यांचा पिंजरा बांधणे, वाघ पिंजरा येथील संरक्षक भिंत मुख्य प्रवेशद्वार व इतर अनुषंगिक कामे करणे. | रु.२,४७,६५,८०२.०० |
| २. | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली येथील नौका विहार परिसर, कँट ओरीएंटेशन सेंटर येथील विविध सुधारणा, सुशोभिकरण, पागोडा व पाण्याचे कारंजे उभारणे व इतर अनुषंगिक कामे करणे. | रु.२,०८,०४,५४८.०० |
| ३. | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली येथील निसर्ग केंद्र प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे. | रु.१,६५,९२,४०१.०० |
| ४. | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली येथील निसर्ग कुटी क्र.१ ची सुधारणा,पुर्नबांधणी व सुशोभिरण करणे. | रु.१,५३,७०,३२०.०० |
| ५. | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली येथील बगीच्या मध्ये पागोडा उभारणे तसेच पोलीस बिट व चौकी ते विभागीय कार्यालय येथील रस्त्याची सुधारण व इतर अनुषंगिक कामे करणे. | रु.१,४४,१४,४८५.०० |
| ६. | तुगारेश्वर उत्तर वन्यजीव उभारण्य येथे पारोळ चेक पोस्ट ते बाजार माळ येथील रस्त्यावर संरक्षणात्मक उपाय योजना करणे. | रु.१,४७,०४,८२६.०० |
| ७. | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरीवली येथील मुख्य प्रवेशद्वारावरील रस्ता, बगीचा आणि वाहनतळ येथील विविध सुधरणा, सुशोभिकरण, मजबुती करणाची कामे करणे. | रु.१,३८,८४,४३३.०० |

ई - निविदा वेळापत्रक

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा डाऊनलोड करण्यांचा कालावधी | दिनांक ०५/०८/२०२४ @ १५.०० पासून दिनांक १२/०८/२०२४ @ १५:०० पर्यंत. |
| २ | निविदा उघडण्याचे ठिकाण दिनांक व वेळ (शक्य झाल्यास) | दिनांक १३/०८/२०२४ @ १५.१५ वाजता (शक्य झाल्यास) अधीक्षक अभियंता, मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर,मुंबई-४०००७१ यांचे कार्यालय |

खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. https://mahapwd.com
२. https://mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यांत येईल.)

३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव. (पूर्व). मुंबई-४०००६५. कार्यालयातील सूचना फलक.

Sd/-
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,
आरे, गोरेगाव, पूर्व, मुंबई-४०००६५.

जा. क्र. साबांविप्र-आरे/नि.लि./११३९
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,
आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई ४०००६५.
दुरध्वनी क्र. ०२२-२९२७२४४७
दिनांक:-०१/०८/२०२४.

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/१६१३



**महाराष्ट्र शासन**
इलाखा शहर विभाग, (सा.बां.)
**ई -निविदा सुचना क्र. १० सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रमांक-२२०१६९७५ /२२०१६९७७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई- निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १ | बी. टी. मार्ग मुंबई येथील पोलीस आयुक्त कार्यालय आवारातील SB – II इमारत येथे सीआय पाईप लाईनची दुरुस्ती करणे. | २४.७१ |
| २ | मलबार हिल मुंबई येथील पश्चिम उप-विभाग कार्यालय येथे फॉल्स सिलींग,प्लास्टर, रंगकाम, इ. कामे व प्रसाधनगृह दुरूस्ती करणे. | १९.९८ |
| ३ | मलबार हिल मुंबई येथील पश्मि उप-विभाग कार्यालय येथे टेबल, पार्टिशन, पॅनलिंग, स्टोरेज व इतर दुरूस्तीची कामे करणे. | १९.९४ |
| ४ | उच्च न्यायालय मुंबई विस्तार इमारतीच्या तळ मजला ते ४ मजल्यावरील विविध रुम, कार्यालय, पॅसेज इ. रंगकाम, पॉलिश करणे. | १६.७८ |
| ५ | भारतीय विज्ञान संस्था मुंबई इमारत १ आणि २ मजल्यावरील प्लास्टर व रंगकाम करणे. | १२.६३ |
| ६ | जूने जकात घर मुंबई इमारतीच्या लाकडी, फ्लोरींग, पॅनलिंग, दरवाजे, मंगलोरी छत, पार्टीशन दुरूस्ती करणे | ४२.४६ |
| ७ | मंत्रालय मुंबई विस्तार इमारत ५ मजल्यावरील सामान्य प्रशासन विभाग सह सचिव आणि अवर सचिव यांची कॅबिन नुतनीकरण करणे. | २०.४२ |
| ८ | चर्नी रोड मुंबई येथील न्यू प्रेस इमारत दक्षिण आणि पश्चिम बाजूची संरचनात्मक दुरुस्ती आणि मजबूतीकरण करणे. | ४३.७६ |
| ९ | उच्च न्यायालय मुंबई मुख्य इमारत येथील कोर्ट रूम आणि मा. जज चेंबर येथे पॉलिश व रंगकाम करणे. | १६.७९ |
| १० | मंत्रालय मुंबई विस्तार इमारत १ ते ३ मजल्यावरीलमा. मंत्री दालने आणि विविध कार्यालयाचे पॉलिश व रंगकाम करणे. | ३३.७२ |
| ११ | मंत्रालय मुंबई मुख्य इमारत १ ते ६ मजल्यावरील मा. मंत्री दालने आणि विविध कार्यालयाचे पॉलिश व रंगकाम करणे. | ३३.७१ |
| १२ | चर्नी रोड मुंबई येथील न्यू प्रेस इमारत उत्तर आणि पूर्व बाजूची संरचनात्मक दुरुस्ती आणि मजबूतीकरण करणे. | ३८.१८ |
| १३ | नविन विधानभवन मुंबई टॉवर इमारतीमधील विविध कमिटी रूमच्या पॅनलीग आणि फॉल्स सिलिंग नुतनीकरण करणे. | ९.४३ |
| १४ | मंत्रालय मुंबई येथील मुख्य इमारतीमधील प्रधान सचिव वित्त विभाग यांची कॅबिन नूतनीकरण करणे आणि टेरेसवरील पीव्हीसी टँक. पाण्याची पाईप लाईन दुरूस्ती करणे. | २८.०५ |
| १५ | नविन विधानभवन मुंबई टॉवर इमारतीमधील १ आणि २ मजल्यावरील कार्यालयीन रूम ची नुतनीकरण करणे. | ९.४८ |
| १६ | उच्च न्यायालय मुंबई मुख्य इमारत येथील कोर्ट रूम आणि मा. जज चेंबर, कार्यालय व पॅसेज येथे पॉलिश व रंगकाम करणे. | १६.८१ |
| १७ | मंत्रालय मुंबई मुख्य इमारतीच्या २ मजल्यावरील २०१ रुम मा. मंत्री महोदय दालन सभागृह, कार्यालय, बैठक व्यवस्था पूर्नस्थापना करणे. | २२.३३ |
| १८ | उच्च न्यायालय मुंबई पीडब्ल्यूडी इमारत येथील कार्यालय, पॅसेज, पार्टीशन, वॉल, फर्निचर येथे पॉलिश व रंगकाम करणे. | १६.४४ |
| १९ | नविन विधानभवन मुंबई येथील टॉवर इमारती मधील विविध कार्यालय येथे स्टोरेज युनिट प्रदान करणे. | ९.४० |
| २० | नविन विधान भवन मुंबई येथील डोम इमारतीच्या कार्यालय मधील दरवाजे,खिडक्या, स्टोरेज युनिट,टेबल येथे पार्टीशन, पॅनालिंग, नुतनीकरण व दुरुस्ती करणे. | १६.८५ |
| २१ | मंत्रालय मुंबई येथील मुख्य गेट, आरसा गेट व गार्डन गेट, ॲसायलिक शिट ते पोलीस गार्ड चौकी येथे एम.एस.शेड, एसीपी पॅनलिंग बसविणे | १०.९२ |
| २२ | फोर्ट मुंबई येथील टाऊन हॉल इमरात येथे बी.टी.रोड सरफरेत आणि कँपाउंड वॉलची दूरूस्ती करणे. | १६.९१ |
| २३ | इंसाहटमेंट आवारत,फोर्ट, मुंबई येथील के.आर.पी कार्यालय येथे,प्लास्टर, फ्लोरिंग, डॅडो, दरवाजे, खिडक्या, प्रसाधनगृह, रंगकाम करणे. | १२.६५ |
| २४ | मंत्रालय मुंबई येथील मुख्य इमारतीच्या टिंट ग्लास, ब्लाईंड,दरवाजे, खिडक्या, स्टोरेज, फॉल्स सिलींग, टेबल, दुरूस्ती करणे. | १८.५९ |
| २५ | मंत्रालय मुंबई येथील मुख्य व विस्तार इमारत येथे उपसचिव,सहसचिव,अंडर सचिव केबिन येथे वॉल पॅनलिंग,पार्टीशन व दुरूस्ती करणे. | १८.०९ |
| २६ | आकाशवाणी आमदार निवास मुंबई १ मजल्यावरील आमदार रूमचे प्लास्टर व रंगकाम करणे. | ११.९४ |
| २७ | नविन विधानभवन मुंबई येथे विरोधी पक्षनेते कार्यालय आणि प्रसाधनगृह येथे दुरूस्ती व नुतनीकरण करणे. | २४.९८ |
| २८ | वेल हेवन इमारत मुंबई येथील स्टोरेजची दुरूस्ती करणे. | १३.९९ |
| २९ | कारवार पोलीस लाईन मुंबई येथील ए आणि बी ब्लॉक येथे प्लास्टर व रंगकाम करणे. | १३.९९ |
| ३० | उच्च न्यायालय मुंबई येथील मुख्य इमारत येथील बॉम्बे बार असोशिएशन रूम येथे पॉलिश व रंगकाम करणे. | १६.८४ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. २.८.२०२४ ते दि. ९.८.२०२४ पर्यंत.
ई-निविदा उघडणे- दि. १२.८.२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता
निविदा सुचने मध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.
खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com
2) http :// mahatenders.gov.in

जा.क्र. इशवि/निलि/90632
कार्यकारी अभियंता
इलाखा शहर विभाग, मुंबई यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला,बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.
Email : presidency.ee@mahapwd.gov.in
दिनांक : 30/7/24

(व्ही. ए. पाटसकर)
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/१५६२

# डोंबिवलीतील बेकायदा राधाई कॉम्प्लेक्सवर हातोडा, दोन दिवसात इमारत भुईसपाट करण्याचे नियोजन

**डोंबिवली : गणेश बागडे**

येथील नांदिवली पंचानंद भागातील डॉन बॉस्को शाळेमागील बेकायदा सात माळ्याची राधाई कॉम्प्लेक्स इमारत शुक्रवारी भुईसपाट करण्याची कारवाई पालिकेच्या ई प्रभागाच्या तोडकाम पथकाने पोलीस बंदोबस्तात सुरू केली. ही इमारत तोडताना पुन्हा कोणी राजकीय अडथळा आणला तर त्याच्यावर कठोर कारवाई करण्याचा आणि पालिका, ठाणे पोलीस आयुक्तांनी नियोजन करून ही इमारत तोडण्याचे आदेश दिले असल्याने विरोध करण्यासाठी भाजप कार्यकर्त्यांसह रहिवासी पुढे आले नाहीत. राधाईमधील १३ रहिवाशांनी रात्रीतून आपले सामान इतरत्राच्या भाड्याच्या घरात हलविले. पालिका आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी ही इमारत जमीनदोस्त करण्याचे आदेश दिले होते. ई प्रभागाचे साहाय्यक आयुक्त चंद्रकांत जगताप, मानपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या नेतृत्वाखाली ६० पोलिसांच्या बंदोबस्तात पालिकेच्या २० तोडकाम पथकाचे कामगारांनी चार क्रॅकर यंत्र यांच्या साहाय्याने इमारतीचे स्लॅब, आधार खांब तोडण्यास सुरुवात केली. लोकसत्ताने या बेकायदा इमारतीच्या सातत्याने बातम्या दिल्या होत्या. या कारवाईला विरोध केला तर उच्च न्यायालयाच्या कारवाईला सामोरे जावे लागेल या भीतीने रहिवाशांचा कैवार घेऊन राधाई इमारत तोडकामापासून वाचविण्यासाठी पुढाकार घेणारे भाजपचे नंदू परब, संदीप माळी, मनीषा राणे आणि इतर शुक्रवारी गायब होते. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे या तोडकामाला विरोध करणाऱ्यांची चौकशी करण्याचे आदेश न्यायालयाने पोलिसांना दिले आहेत.

श्री स्वस्तिक होम्सचे मयूर रवींद्र भगत यांनी विकास करारनाम्याशी संबंधित भूमाफिया संजय विष्णू पाटील, सचिन विष्णू पाटील, राधाबाई विष्णू पाटील, सुरेश मारूती पाटील यांच्याशी संगनमत करून राधाई



बेकायदा इमारत उभारली. गेल्या चार वर्षापासून जयेश म्हात्रे ही बेकायदा इमारत तोडण्यासाठी प्रयत्नशील होते. पालिका अधिकाऱ्यांनी ही इमारत तोडण्यास यापूर्वी टाळाटाळ केल्याने जयेश म्हात्रे यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. जयेश म्हात्रे यांची वडिलोपार्जित जमीन हडप करून आरोपी भूमाफियांनी ही बेकायदा उभारली असल्याने न्यायालयाने ती जमीनदोस्त करण्याचे आदेश पालिकेला दिले होते. दहा दिवसापूर्वी पालिकेने ही इमारत तोडण्याची कारवाई सुरू केली होती. या कारवाईत भाजप कार्यकर्त्यांनी अडथळे आणल्याची माहिती पालिकेने छायाचित्रांसह प्रतिज्ञापत्रातून न्यायालयात दिली. यावरून उच्च न्यायालय संतप्त झाले होते.

न्यायालयाचे आदेश धुडकावून विरोध झाल्याने न्यायालयाने पालिका, पोलीस आयुक्तांना उभे राहून राधाई इमारत जमीनदोस्त करण्याचे आदेश दिले होते. दोन्ही आयुक्तांच्या आदेशावरून साहाय्यक आयुक्त जगताप यांनी राधाई इमारत भुईसपाट करण्याची कारवाई सुरू केली आहे.

## बांगलादेशमध्ये पुन्हा हिंसाचार! ७२ जणांचा मृत्यू,१०० हून अधिक जखमी;
# सरकारकडून अनिश्चित काळासाठी संचारबंदी लागू!

**ढाका : विशेष प्रतिनिधी**

बांगलादेशमध्ये पुन्हा एकदा हिंसाचार उफाळून आला आहे. या हिंसक घटनेत ७२ जणांचा मृत्यू झाला आहे. तर १०० पेक्षा अधिक जण जखमी झाले आहेत. या घटनेनंतर बांगलादेशमध्ये अनिश्चित काळासाठी कर्फ्यू लावण्यात आला असून इंटरनेटदेखील बंद करण्यात आले आहे. महत्त्वाचे म्हणजे भारत सरकारनेही या घटनेनंतर बांगलादेशमधील भारतीय नागरिकांनी सुरक्षित स्थळी राहण्याच्या सुचना दिल्या आहेत. तसेच येथील भारतीय नागरिकांसाठी हेल्पलाईन नंबरदेखील जारी करण्यात आला आहे.पंतप्रधान शेख हसीना यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी काही नागरिकांनी अहसहकार आंदोलनाची घोषणा केली होती. त्यानुसार हे नागरिक या आंदोलनात सहभागी होण्यासाठी



ढाक्यातील सायन्स लॅब चौकात दाखल झाले होते. मात्र, यावेळी त्यांना अवामी लीग, छात्र लीग आणि जुबो लीगच्या कार्यकर्त्यांनी जोरदार विरोध केला. त्यानंतर दोन्ही गटांमध्ये जोरदार हाणामारी सुरू झाली. याशिवाय काही आंदोलनकांनी ढाक्याच्या शाहबाग भागातील बंगबंधू शेख मुजीब वैद्यकीय महाविद्यालयासह या भागातील काही कार्यालय आणि आस्थापनांवरही हल्ले केले. विशेष म्हणजे काही आंदोलक लाठ्या-काठ्या घेऊन शाहबाग चौकात जमले, तेव्हा पोलीस आणि आंदोलकांमध्ये जोरदार संघर्ष झाला. यावेळी आंदोलकांना पांगवण्यासाठी पोलिसांना अश्रूधुरांच्या नळकांड्या फोडाव्या लागल्या. दरम्यान, या घटनेनंतर आता बांगलादेशच्या गृहमंत्रालयाने देशात अनिश्चित काळासाठी कर्फ्यूची घोषणा केली आहे. तसेच इंटरनेटदेखील बंद करण्यात आले आहे. महत्त्वाचे म्हणजे या घटनेनंतर भारत सरकारने बांगलादेशमधील भारतीयांना घराबाहेर न पडण्याच्या सुचना केल्या आहेत.

## कल्याण डोंबिवली पालिका कर्मचाऱ्यावर खंडणीचा गुन्हा, आरोपींमध्ये चार जणांचा समावेश

**डोंबिवली : नितीन देवळेकर**

**डोंबिवली शहरातील एका विकासकाकडे डिसेंबर २०१८ ते जुलै २००२४ या कालावधीत त्यांच्या शहरातील विविध बांधकाम प्रकल्पांविषयी कल्याण डोंबिवली पालिका, शासकीय कार्यालयांमध्ये ती बांधकामे अनधिकृत आहेत म्हणून तक्रारी करून, त्याविषयी समाज माध्यमांमध्ये या प्रकल्पांची माहिती सामायिक करून संबंधित विकासकाची बदनामी करणाऱ्या, तसेच या विकासकाकडून सात वर्षाच्या कालावधीत ४१ लाख रूपये रोख आणि चार सदनिका जबरदस्तीने खंडणी स्वरुपात घेणाऱ्या एक पालिका कर्मचारी, त्याचे तीन साथीदार आणि एका माहिती कार्यकर्त्या विरुध्द खंडणी विरोधी पथकाने मंगळवारी खंडणीचा गुन्हा विष्णुनगर पोलीस ठाण्यात दाखल केला.**

विनोद मनोहर लकेश्री, प्रशांत शिंदे, विलास शंभरकर, परेश शहा आणि मागील अनेक वर्ष डोंबिवलीतील बेकायदा बांधकामांच्या विरुध्द निर्भय बनो संस्थेच्या माध्यमातून आवाज उठविणारे माहिती कार्यकर्ते महेश दत्तात्रय निंबाळकर यांच्या विरुध्द ठाणे येथील खंडणी विरोधी पथकाचे साहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकृष्ण गोरे यांनी विकासक प्रफुल्ल गोरे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल केला आहे.

लकेश्री हे कल्याण डोंबिवली पालिकेत वाहन चालक म्हणून कार्यरत आहेत. ते पालिकेच्या अ प्रभागात घनकचऱ्याच्या



वाहनावर कर्तव्यावर आहेत. काही महिन्यापूर्वी त्यांच्यावर पालिकेच्या डोंबिवली विभागीय कार्यालयाबाहेर भूमाफियांकडून हल्ला करण्यात आला होता. त्यातून ते थोडक्यात बचावले होते. डोंबिवली पश्चिमेतील कुंभारखाणपाडा येथील बांधकाम गृहप्रकल्पात हा प्रकार २०१८ ते २०२४ या कालावधीत घडला असल्याचे तक्रारीत म्हटले आहे. पोलिसांनी सांगितले, डोंबिवलीतील विकासक प्रफुल्ल मोहन गोरे (४०, रा. रिजन्सी अनंतम, शिळ रस्ता, डोंबिवली) यांचे डोंबिवलीत डिसेंबर २०१८ पासून कुंभारखाणपाडा, देसलेपाडा, कोपर रस्ता, गोग्रासवाडी भागात इमारत बांधकाम प्रकल्प सुरू होते. या कालावधीत आरोपींनी विकासक प्रफुल्ल गोरे यांचे प्रकल्प अनधिकृत आहेत. ते तोडण्यात यावेत म्हणून पालिका कार्यालये, शासकीय कार्यालयांमध्ये तक्रारी केल्या. या बांधकामांची छायाचित्रे समाज माध्यमांवर सामायिक करून या गृहप्रकल्पांमध्ये कोणी घर घेऊ नये म्हणून विकासकाला अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला. या गृहप्रकल्पांच्या तक्रारी मागे घेण्यासाठी आरोपींनी तक्रारदार विकासक प्रफुल्ल गोरे यांच्याकडून वेळोवेळी एकूण ४१ लाख रूपये खंडणी स्वरुपात उकळले. तसेच डोंबिवली येथील गृहप्रकल्पातील चार सदनिका खंडणी स्वरुपात जबरदस्तीने बळकावल्या.

## डोंबिवलीत पूर्ववैमनस्यातून रिक्षा चालकाची हत्या

**डोंबिवली : सतिश सोनावणे**

डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानकाजवळील रिक्षा वाहनतळावर रिक्षा रांगेत लावण्यावरून दोन रिक्षा चालकांमध्ये वाद झाला होता. या वादातून एका रिक्षा चालकाने दुसऱ्या रिक्षा चालकाची ठाकुर्ली खंबाळपाडा भागात शुक्रवारी



रात्री धारदार शस्त्राने हत्या केली. टिळकनगर पोलीस ठाण्यात याप्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अश्विन बजरंग कांबळे (२८, रा. समतानगर झोपडपट्टी, गोळवली, डोंबिवली) असे खून झालेल्या रिक्षा चालकाचे नाव आहे. सुनील गोपाळ राठोड (३५, रा. डोंबिवली) असे खून करणाऱ्या रिक्षा चालकाचे नाव आहे. शुक्रवारी रात्री खंबाळपाडा प्रवेशव्दाराजवळ हा खून झाला. मयत अश्विनचा भाऊ आकाश कांबळे याने याप्रकरणी टिळकनगर पोलीस ठाण्यात तक्रार केलीआहे. आकाश नोकरी करतो. आकाश यांचा अश्विन हा लहान भाऊ होता. पोलिसांनी सांगितले, मयत अश्विन बजरंग कांबळे आणि सुनील राठोड हे दोघेही रिक्षा चालक आहेत. ते डोंबिवली रेल्वे स्थानक ते खंबाळपाडा भागात रिक्षेने प्रवासी वाहतूक करून उपजीविका करतात. डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानकाजवळील रिक्षा वाहनतळावर रिक्षा रांगेत उभे करण्यावरून अश्विन आणि सुनील राठोड यांच्यात वाद झाला होता. माझा क्रमांक रांगेत असताना तू मध्ये का घुसला. यामुळे प्रवासी मिळण्यास आता उशीर होईल, असे या भांडणाचे किरकोळ कारण होते. या वादातून त्यांच्यात धुसफूस सुरू होती. सुनीलने अश्विनला धडा शिकवण्याचा निर्णय घेतला होता. मयत रिक्षा चालक अश्विन कांबळे शुक्रवारी रात्री खंबाळपाडा प्रवेशव्दार येथून रिक्षा घेऊन जात असताना सुनील राठोडने ते पाहिले. राठोडने आपली रिक्षा तात्काळ मागे फिरवून त्याने अश्विनच्या रिक्षेचा पाठलाग सुरू केला. अश्विनला खंबाळपाडा प्रवेशव्दाराजवळ गाठले. तेथे त्याच्याशी भांडण उकरून काढून सुनीलने रिक्षेतील लोखंडी सळई बाहेर काढून अश्विन कांबळेला काही कळण्याच्या आत त्याच्यावर लोखंडी सळईने प्रहार करून त्याला जागीच ठार मारले. अचानक घडलेल्या या प्रकाराने परिसरातील दुकानदारांनी घाबरून दुकाने बंद केली.

# वसई पालिका उपायुक्त अजित मुठे यांच्यावर भूमाफियांचा हल्ला

**वसई : विशेष प्रतिनिधी**

वसई विरार महापालिकेचे उपायुक्त अजित मुठे यांच्यावर भूमाफियांनी हल्ला केला. बुधवारी संध्याकाळी नायगाव पूर्वेच्या पोमण शिलोत्तर भागात ही घटना घडली. वसई विरार महापालिकेच्या अतिक्रमण विभागाचे प्रमुख असलेले उपायुक्त अजित मुठे हे बुधवारी दुपारी आपल्या पथकासह नायगाव पूर्वेच्या पोमण शिलोत्तर येथे कारवाई करण्यासाठी गेले होते. या ठिकाणी भूमाफियांनी बेकायदेशीररित्या अनधिकृत बांधकाम केले होते. ही कारवाई करत असताना भूमाफियांनी अचानक मुठे यांच्यावर हल्ला



चढवला. यात मुठे यांना किरकोळ दुखापत झाली. नंतर पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली. या प्रकरणी नायगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तो पर्यत मुठे यांनी भूमाफियांचे अकरा हजार चौरस किलोमीटर अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त केले होते.

# ठाण्यात शेठ बिल्डर विरोधात ग्राहकांचा आक्रोश, आठ वर्षे उलटूनही घरे मिळत नसल्याने ग्राहकांकडून घोषणाबाजी

**ठाणे : तृप्ती गोरे**

येथील लक्ष्मी-चिरागनगर भागातील शेठ झुरी या बांधकाम प्रकल्पात सदनिका खरेदी करणाऱ्या ग्राहकांना दोन वर्षाची मुदत उलटूनही बिल्डरने सदनिकांचा ताबा दिलेला नाही. यामुळे आक्रमक झालेल्या ग्राहकांनी शनिवारी बांधकाम प्रकल्प कार्यालयात एकत्रित येऊन बिल्डरविरोधात घोषणाबाजी करत महारेरा कायद्यानुसार दिरंगाई भरपाई देण्याबरोबरच सदनिकांचा ताबा तातडीने देण्याची मागणी केली. दरम्यान, ठाणे पालिका आयुक्त सौरभ राव यांच्या कार्यालयात मंगळवारी रहिवाशी आणि विकासक यांची एक बैठक आयोजित करण्यात आली आहे. ठाणे येथील लक्ष्मी-चिरागनगर परिसरात शेठ झुरी या नावाचा बांधकाम प्रकल्प सुरू आहे. शेठ बिल्डर्समार्फत हा प्रकल्प उभारण्यात येत आहे. या प्रकल्पात तीन टॉवर उभारण्यात येणार असून यातील एक टॉवर उभारण्यात आलेला आहे. या प्रकल्पाच्या कार्यालयात शनिवारी अनेक ग्राहक जमले होते. बिल्डरकडून सदनिकांचा ताबा देण्यासाठी वारंवार नवीन तारखा देऊन फसवणुक केली जात असल्याचा आरोप करत ग्राहकांनी बिल्डर विरोधात घोषणाबाजी केली. तसेच बिल्डरकडून



प्रतिसाद मिळत नसल्यामुळे ग्राहकांनी तिथेच ठिय्या मांडला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा मतदार संघ असल्यामुळे त्यांनी या प्रकरणात लक्ष घालावे अशी मागणी ग्राहकांकडून करण्यात येत होती. याबाबत माहिती मिळताच स्थानिक आमदार प्रताप सरनाईक यांनी त्याठिकाणी जाऊन ग्राहकांचे म्हणणे ऐकून घेतले आणि या संदर्भात ठाणे पालिका आयुक्त सौरभ राव यांच्याशी चर्चा करून एक बैठक आयोजित केली. या बैठकीला ग्राहकांबरोबरच बिल्डर उपस्थित राहणार आहेत. या वृत्तास आमदार सरनाईक यांनी दुजोरा देत ग्राहकांना न्याय मिळवा, या उद्देशातून ही बैठक आयोजित केली असल्याचे त्यांनी सांगितले. २०१६ मध्ये या प्रकल्पाच्या बांधकामाला सुरुवात झाली. तीन वर्षात प्रकल्पाचे काम पुर्ण होणार असल्याचा दावा बिल्डरने केला होता. परंतु २०१७ मध्ये महारेरा कायद्यांतर्गत प्रकल्पाची नोंदणी करताना बिल्डरने २०२२ मध्ये प्रकल्पाचे काम पुर्ण होणार असल्याची नोंद केली.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग,
पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),कोंकण भवन,नवी मुंबई.

दुरध्वनी क्र.- ०२२-२७५७१५३४ e-mail : harbournkb.ee@mahapwd.gov.in

निविदा सुचना क्र. ५ सन २०२४-२०२५
ई-निविदा सूचना

पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),कोंकण भवन,नवी मुंबई ४०० ६१४, योग्य निविदा धारकाकडून (कंत्राटदारांकडून) खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑन लाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारावण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार पत्तन अभियंता, पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ), कोकण भवन, नवी मुंबई यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अनु.क्र | कामाचे नाव | अंदाजित किंमत |
|---|---|---|
| १. | भाटी कोळीवाडा, मुंबई उपनगर येथे मासे सुकविण्याचा चौथरा बांधणे | रु. २,३५,४३,४५७/- |
| २ | भाटी कोळीवाडा, मुंबई उपनगर येथील अस्तित्वातील जेट्टीची लांबी वाढविणे. | रु. २,४०,०७,०३६/- |
| ३ | मढ लोचरगांव, मुंबई उपनगर येथे मासळी सुखविण्याचा चौथरा बांधणे | रु. २,३८,३९,५२९/- |

निविदा डाऊनलोड करण्याचा कालावधी :- दि.०६/०८/२०२४ स. ११.३० ते १३/०८/२०२४ दु.१४.०० पर्यंत

निविदा पुर्व बैठक- :- दि ०९/०८/२०२४ दु.१२.०० वा. मा.किनारी अभियंता, सा.बां मंडळ, बांद्रा ३ ला मजला, प्रशासकीय इमारत, बांद्रा, मुंबई-५१ येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

निविदा उघडण्याचा कालावधी :- दि.१४/०८/२०२४ दु.१५.०५ वा.

टिप- ई- निविदेची संपुर्ण माहिती खाली नमुद केलेल्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
१. https://mahapwd.gov.in
२. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर व सुचना फलकावर कळविण्यात येईल)
३. कार्यालयातील सूचना फलक.

(एस.एफ.सावंत)
पत्तन अभियंता,
पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),
कोंकण भवन, नवी मुंबई


जा.क्र. पअउ/निविदा/१०४४
पत्तन अभियंता यांचे कार्यालय,
पत्तन अभियांत्रिकी विभाग (उ),
कोंकण भवन,नवी मुंबई-४०० ६१४.
दिनांक -३१/७/२०२४

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/१६०९

## वेब मालिकेच्या नावाखाली हरियाणातील व्यावसायिकाची फसवणूक

**मुंबई : राकेश गायकवाड**

चित्रपट निर्मिती कंपनीच्या संचालकाने एक कोटी रुपयांची फसवणूक केल्यामुळे हरियाणातील एका व्यावसायिकाने वर्सोवा पोलिसात




तक्रार दाखल केली आहे. आरोपी महिलेने तक्रारदाराला तिच्या वेब मालिकेच्या निर्मितीसाठी एक कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यास प्रवृत्त केले. त्या रकमेतून कोणतीही वेब सिरीज तयार न करता तक्रारदाराची फसवणूक केल्याचा आरोप आहे. तक्रारदार योगेशकुमार राहार (४०) हे मूळचे हरियाणातील रहिवासी आहेत. तक्रारीनुसार २०२२-२३ दरम्यान जेली बीन इंटरटेन्मेंट कंपनीच्या पांचाली चक्रवर्ती यांनी वर्सोवा येथील बंगल्यात बोलवून कब तक जवानी छुपाओगी रानी या वेब मालिकेत गुंतवणूक केल्यास ५० टक्के निर्मिती खर्च परतावा म्हणून देण्याचे आमीष दाखवले होते. त्यानुसार तक्रारदाराने ५ डिसेंबर २०२२ ते १ मे, २०२३ या कालावधीत एक कोटी रुपये रोख रक्कम व ऑनलाईन व्यवहारांद्वारे दिले. पण प्रत्यक्षात ती वेबमालिका तयारच झाली नाही व रकमेचा अपहार करण्यात आला, असा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्याबाबत विचारणा केली असता आरोपी महिलेने खोट्या गुन्ह्यात अडवकण्याची धमकी दिली. अखेर याप्रकरणी योगेशकुमार यांनी वर्सोव पोलिसांकडे तक्रार केली.

महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय
मध्य मुंबई विद्युत विभाग, सा.बां.विभाग, सावली इमारत, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई ई-४०० ०१८.
दुरध्वनी क.०२२-२४९२४३४९, ई-मेल eelcentralmumbai.ee@mahapwd.com

ई निविदा सुचना क्र. ०५ सन २०२४-२५ (प्रथम वेळेस)

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई विद्युत विभाग वरळी मुंबई, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून विद्युत अनुज्ञप्तीधारक कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता बी २ (बाब निहाय दर) टक्केवारी नमुन्यातील निविदा, ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता मध्य मुंबई विद्युत विभाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नांव |
|---|---|
| 1 | Estimate No.H11002 of 2024–25 Providing Fire and Electrical Safety Measures (as per National Safety Council's safety Audit Recommendations ) at JJ Hospital campus buildings, Byculla Mumbai |

१ वरील अंदाजीत रक्कमेत जी.एस.टी. समाविष्ठ नसून ठेकेदारांनी निविदेत दर भरताना जी.एस.टी. वगळून दर नमुद करावा. अंदाजीत रक्कमेवर नमुद केलेल्या दरानुसार आलेल्या रक्कमेवर जी.एस.टी. १८ टक्के पर्यंत वेगळा अदा करण्यात येईल.

२ ई-निविदा उपलब्ध कालावधी : दि.०५.०८.२०२४ ते दि.१९.०८.२०२४ रोजी सायंकाळी ५.३० पर्यंत.

३ निविदा पुर्व बैठक: दि.१२.०८.२०२४ रोजी दुपारी ३ वाजता मुख्य अभियंता यांचे कार्यालय सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई ४था मजला, बांधकाम भवन २५, मर्झबान पथ फोर्ट, मुंबई ४०० ००१ येथे घेण्यात येईल.

४ ई निविदा उघडणे : दि.२२.०८.२०२४ रोजी सकाळी ११.०० नंतर सोईस्कर वेळेनुसार अधीक्षक अभियंता, मुंबई प्रादेशिक विद्युत मंडळ, सा.बां.विभाग, मुंबई यांच्या कार्यालयात

५ खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहिती उपलब्धआहे.
१. http://mahatenders.gov.in
(सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती व सूचना फलकावर कळविण्यात येईल.)

जा.क्र.काअ/मर्मुविवि/निविदा/१८१० /२०२४
दिनांक : ३१/०७/२०२४

Sd/-
कार्यकारी अभियंता
मध्य मुंबई विद्युत विभाग
सा.बां.विभाग वरळी

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/१५६४

# पूजा खेडकर यांच्यानंतर आणखी सहा अधिकाऱ्यांवर कारवाईचा बडगा; बोगस अपंग प्रमाणपत्राची चौकशी

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

प्रशिक्षणार्थी आयएएस अधिकारी पूजा खेडकर या पुणे जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशिक्षणासाठी गेल्यानंतर त्यांचे एक एक कारनामे समोर येऊ लागले. अखेर यूपीएससीने त्यांचे सदस्यत्व रद्द केले. पूजा खेडकर प्रकरणानंतर एकूणच यूपीएससीच्या कारभारावर संशय व्यक्त केला गेला. पूजा खेडकर यांच्या अपंगत्वाच्या प्रमाणपत्रावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले आहे. आता तर कार्मिक व प्रशिक्षण विभागाने (उदडऊ) आणखी सहा अधिकाऱ्यांची यादी तयार केली असून त्यांच्या प्रमाणपत्राची तपासणी केली जाणार आहे. यामध्ये प्रशिक्षणार्थी आणि सेवेत असणाऱ्या अधिकाऱ्यांचाही समावेश आहे, अशी माहिती सूत्रांकडून मिळते आहे.

पूजा खेडकर यांनी ओबीसी नॉन क्रिमिलेयर आणि अपंगत्वाचे बोगस प्रमाणपत्र देऊन यूपीएससी परिक्षेत यश मिळविले असा आरोप आरटीआय कार्यकर्ते विजय कुंभार यांनी केला होता. त्यानंतर यूपीएससीकडून या प्रकरणाची चौकशी केली जात आहे. नुकतेच त्यांचे सदस्यत्व रद्द करून त्यांना भविष्यात यूपीएससी परीक्षेस बसण्यास मनाई करण्यात आली आहे. त्या पार्श्वभूमीवर आता इतर अधिकाऱ्यांवरही कारवाईचा बडगा उगारला जात आहे.

कार्मिक व प्रशिक्षण विभागाने आरोग्य सेवा महासंचालकांना पत्र लिहून अपंगत्व प्रमाणपत्र दाखवून सेवेत रूजू झालेल्या



अधिकाऱ्यांची पुन्हा एकदा तपासणी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. यापैकी सहा अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत.

यूपीएससीच्या नियमानुसार, अपंगांच्या राखीव कोट्याचा लाभ घेण्यासाठी संबंधित उमेदवार कमीत कमी ४० टक्के अपंग असणे आवश्यक आहे. अशा दिव्यांग उमेदवारांना यूपीएससीकडून वयोमर्यादेत सूट, इतरांपेक्षा अधिकवेळा परीक्षा देण्याची सूट, तसेच परीक्षा केंद्र निवडण्यासारख्या सुविधाही उपलब्ध करून दिल्या जातात. पूजा खेडकर यांनी नगरमधील जिल्हा रुग्णालयातून दोन वेळा अपंगत्व प्रमाणपत्र घेतले. पहिले प्रमाणपत्र त्यांनी २०१८ मध्ये दृष्टी अधू असल्याचे घेतले. त्यानंतर तेथूनच त्यांनी २०२० मध्ये मानसिक आजार असल्याचे प्रमाणपत्र घेतले. यानंतर ऑगस्ट २०२२ मध्ये त्यांनी पिंपरी-चिंचवडमधील वायसीएम रुग्णालयाकडून अस्थिव्यंगाचे प्रमाणपत्र मिळविले. मात्र, त्यात त्यांना केवळ ७ टक्के अस्थिव्यंग असल्याचे दाखविण्यात आले. त्याच वेळी त्यांनी औंधमधील जिल्हा रुग्णालयातही प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्याचे समोर आले. अस्थिव्यंगासाठी वायसीएम रुग्णालयाने आधीच प्रमाणपत्र दिले असल्याने औंध रुग्णालयाने त्यांचा अर्ज फेटाळून लावला. पूजा खेडकर यांच्या उमेदवारीबाबत [illegible] ने केलेल्या कारवाईबाबत एएनआय वृत्तसंस्थेच्या एक्स पोस्टमध्ये माहिती दिली आहे.

# हनीट्रॅपमध्ये अडकवून लुटणाऱ्या टोळीत पोलीस उपनिरीक्षक

**पुणे: विशेष प्रतिनिधी**

**मोहजालात (हनीट्रॅप) अडकवून एका ज्येष्ठाला लुटणाऱ्या टोळीत पुणे पोलीस दलातील पोलीस उपनिरीक्षक सामील झाल्याची धक्कादायक माहिती उघडकीस आली आहे. याप्रकरणी विश्रामबाग पोलीस ठाण्यात उपनिरीक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच उपनिरीक्षक पसार झाला आहे.**

याप्रकरणी पोलीस उपनिरीक्षक काशीनाथ मारुती उभे (वय ५५) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोहजालात अडकवून ज्येष्ठाला लुटल्याप्रकरणी विश्रामबाग पोलीस ठाण्यात नुकताच गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी अवंतिका सचिन सोनवणे (वय ३५), पूनम संजय पाटील (वय ४०), आरती संजय गायकवाड (वय ५८, तिघी रा. कोथरुड) यांना अटक करण्यात आली. पूनम पाटीलविरुद्ध कोल्हापूर येथील शाहूपुरी पोलीस ठाण्यात एका डॉक्टरला ५० लाखांची खंडणी मागितल्याप्रकरणी




गुन्हा दाखल करण्यात आला होता, अशी माहिती पोलिसांनी दिली. या टोळीने अनेकांना मोहजालात अडकवून लुटल्याचा संशय आहे. त्यादृष्टीने तपास करण्यात येत आहे. कोथरुड भागातील एका ज्येष्ठाला मोहजालात अडकवून महिलेने एका हॉटेलमध्ये नेले. त्यानंतर पोलीस आणि महिला हक्क आयोगाचे सदस्य असल्याचे सांगून ज्येष्ठाला मारहाण करण्यात आली. बलात्काराचा खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी देऊन पाच लाख रुपयांची खंडणी मागितली. त्याच्याकडील २० हजारांची रोकड मोबाइल संच काढून घेण्यात आला. २९ जुलै रोजी लक्ष्मी रस्त्यावरील एका हॉटेलमध्ये ही घटना घडली होती. याप्रकरणी तीन महिलांसह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

याप्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज बरुरे यांनी सुरु केला. लक्ष्मी रस्त्यावरील हॉटेलमध्ये महिलेने आधारकार्ड दिले होते. पोलिसांनी तपास करून अवंतिका सोनवणेसह, पूनम पाटील, आरती गायकवाड यांना ताब्यात घेतले. सीसीटीव्ही चित्रीकरणात एक मोटार आढळून आली. तेव्हा मोटार मुळशीतील एकाच्या नावावर असल्याचे समजले. चौकशीत मोटारीचा वापर पोलीस उपनिरीक्षक काशीनाथ उभे करत असल्याचे उघड झाले. त्यानंतर पोलिसांनी उभे याला ताब्यात घेतले. उभे या कटात सामील असल्याचे उघडकीस आले आहे. हॉटेलमधील खोलीत महिला हक्क आयोगाचा सदस्य असल्याचे सांगून प्रवेश करणाऱ्या महिलांसोबत उभे असल्याची माहिती तपासात मिळाली.

# देवीचे चित्र असलेल्या नाण्याच्या नावाखाली वयोवृद्धाची लाखोंची फसवणूक

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

वैष्णवदेवीची प्रतिमा असलेल्या पाच रुपयांच्या नाण्यासाठी नऊ लाख रुपये मिळतील असे आमिष दाखवून ७८ वर्षीय व्यक्तीची साडे आठ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार घडला आहे. याप्रकरणी तक्रारीनंतर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध फसवणुकीसह माहिती तंत्रज्ञान प्रतिबंधक कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. तक्रारदार माहिम येथे वयोवृद्ध बहिणीसह राहतात. त्यांना जुनी नाणी जमा करण्याचा छंद आहे. त्यांना २६ जून रोजी फेसबुकवर संजीवकुमार नावाच्या एका व्यक्तीची जाहिरात दिसली. त्यात वैष्णवदेवीचे चित्र असलेले एक पाच रुपयांचे नाणे होते. त्या नाण्यासाठी नऊ लाख रुपये मिळतील, असे जाहिरातीत सांगण्यात आले होते. त्यामुळे त्यांनी संजीवकुमारशी मोबाईलवरून संपर्क साधला. त्यावेळी त्याने या नाण्याच्या बदल्यात नऊ लाख रुपये मिळतील, असे सांगितले. ते नाणे घेऊन पुन्हा विकण्याच्या उद्देशाने तक्रारदाराने होकार दर्शवल्यानंतर काही दिवसांनी संजीवकुमार याने त्यांचे आधारकार्ड




आणि छायाचित्र मागवले. त्यानंतर त्यांना वस्तू व सेवा कर नोंदणी करण्यासाठी काही रक्कम पाठविण्यास सांगितले. ही प्रक्रिया तेवढ्यावरच थांबली नाही. आरोपीने त्यांना हस्तांतरीत करार, विक्रीकर, परतावा दाखल, नोंदणीकरणाचे प्रमाणपत्र, जीपीएस, टीडीएस, विमा अशी विविध कागदपत्रे तक्रारदाराला पाठवली. त्या सर्व कागदपत्रांसाठी तक्रारदाराला विविध बँक खात्यांमध्ये रक्कम भरण्यास सांगितले.


# देशभरातून मोबाइलची चोरी करून त्यांची विक्री करणाऱ्या टोळीला गुन्हे शाखेकडून अटक, १६ लाखांचे मोबाइल जप्त

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

विविध राज्यांमध्ये मोबाइलची चोरी केल्यानंतर त्यांचे ईएमआय नंबर बदलून याच मोबाइलची पुन्हा विक्री करणाऱ्या एका टोळीला गुन्हे शाखेने गोवंडी येथून अटक केली आहे. या टोळीच्या ताब्यातून पोलिसांनी १६ लाख रुपये किमतीचे एकूण १६२ मोबाइल जप्त केले असून पोलीस त्यांच्याकडे याबाबत अधिक तपास करत आहेत.

## बेवारस मृतदेह

समतानगर पोलीस ठाणे, मुंबई अपमृत्यु नोंद क्र. १९९/२०२३ कलम- १७४ फौ.दं.प्र.संहिता १९७३ अन्वये बेवारस वय अंदाजे- ६० वर्षे, बांधा- सडपातळ, केस पांढरे, असलेला इसम गावदेवी रोड, पोयसर कांदिवली पूर्व, समतानगर पोलीस ठाणे, मुंबई हद्दीमध्ये मिळून आला असून उपचाराकामी डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय कांदिवली (प.)



दाखल करण्यात आले असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी उपचारादरम्यान मयत घोषीत केले. नमूद इसमाच्या नातेवाईकांचा शोध घेणे सुरू आहे तरी कोणी ओळखत असल्यात खालील नंबरवर संपर्क करावा.

**आश्विनी हिरे, पोलीस उपनिरीक्षक**
**समतानगर पोलीस ठाणे, मुंबई**
**मोबाईल क्र : ९५८८४०४७३४**
**पोलीस ठाणे क्रमांक : ०२२२८८७६११९**

## बेवारस मृतदेह

वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई अपमृत्यु नोंद क्र. ६५/२०२४, कलम- १९४ भा.ना.सु. संहिता २०२३ अन्वये बेवारस पुरुष हिंदू धर्माचा वय अंदाजे- ५० वर्षे, वर्ण- सावळा, उंची-अंदाजे ५ '६'इंच, चेहरा- लांब, नाक- सरळ, डोक्यावर जखम, दोन्ही हात-पाय शाबूत असलेला इसम वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई हद्दीमध्ये मिळून आला असून उपचाराकामी भाभा रुग्णालय वांद्रे (प.) येथे



दाखल करण्यात आले असता तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी दाखलपूर्व मयत घोषित केले. नमूद इसमाचे नातेवाईकांचा शोध घेणे सुरू आहे तरी कोणी ओळखत असल्यात खालील नंबरवर संपर्क करावा.

**संपर्क-**
**श्री.कृष्णा खोत, पोलीस उपनिरीक्षक**
**वांद्रे पोलीस ठाणे, मुंबई**
**मोबाईल क्र : ९५९४९४३५१७**
**पोलीस ठाणे क्रमांक : ०२२२६५१३७१६**

# बांगलादेशी घुसखोरांचा पुण्यातून 'या' देशात जाण्याचा प्लॅन फसला, ४ जणांना अटक

**पिंपरी : विशेष प्रतिनिधी**

भारतात घुसखोरीच्या मार्गाने येऊन अनेक वर्ष वास्तव्य केल्यानंतर पासपोर्ट काढून पोलंड देशात जाण्याच्या तयारीत असलेल्या व्यक्तीसह चार बांगलादेशी नागरिकांना सांगवी पोलिसांनी अटक केली. पोलीस पडताळणीसाठी आलेल्या अर्जाबाबत संशय आल्याने सांगवी पोलिसांनी चौकशी करत ही कारवाई केली.

सागोर सुशांतो बिस्वास (वय २६), देब्रोतो बोबेन बिस्वास (वय २६), जॉनी बोबेन बिस्वास (वय २७, तिघे रा. दोरीशोलोई, पो. आरपारा, शालीखा, जि. मागुरा, खुलना, बांगलादेश), रोनी अनुप सिकदर (वय २८, रा. बाहीर नोगोर, पो. भीमपुर, जि. फरीदपूर, बांगलादेश) अशी अटक केलेल्या बांगलादेशी घुसखोरांची नावे आहेत.मिळालेल्या माहितीनुसार, सागोर बिस्वास हा मागील अनेक वर्षांपासून बेकायदेशीरपणे भारतात वास्तव्य करीत आहे. त्याने बारावी पर्यंत शिक्षण घेतले असून, तो काही वर्षांपासून हॉटेल मध्ये वेटरचे काम करत आहे. पोलंड येथे वेटरचा जॉब करण्यासाठी त्याने भारतातून पोलंडला जाण्याचे ठरवले.

त्यासाठीत याने पासपोर्ट काढला. त्यानंतर विदेश विमान प्रवासासाठी लागणारे पोलीस क्लियरन्स सर्टिफिकेट (पीसीसी) काढण्यासाठी त्याने अर्ज केला. हा अर्ज सांगवी पोलिसांकडे आला. सांगवी पोलीस ठाण्यात चारित्र्य पडताळणीचे काम पाहणारे सीमेवरील मुलकी अधिकाऱ्यांची लेखी परवानगी नसल्याचे उघडकीस आले. त्याच्याकडे जन्माचा दाखला आणि ट्रान्सफर सर्टिफिकेट देखील बनावट असल्याचे उघडकीस आले.

सांगवी पोलिसांनी पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या दहशतवाद विरोधी शाखेच्या मदतीने सागोर



पोलीस अंमलदार जितेंद्र बाविस्कर यांना सागोर बिस्वास याच्या अर्जाबाबत संशय आला. त्यामुळे त्यांनी बिस्वास याने अर्जात नमूद केलेल्या पत्त्यावर भेट दिली. त्यावेळी तो त्या पत्त्यावर राहत नसल्याचे उघडकीस आले.

त्यामुळे सांगवी पोलिसांनी अधिक चौकशी केली असता सागोर बिस्वास हा बांगलादेशी घुसखोर असून, त्याच्याकडे वैध व्हिसा व भारत-बांगलादेश बिस्वास याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी करत त्याच्या एका साथीदाराला पुनावळे येथून तर दोघांना पुणे कॅम्प परिसरातून ताब्यात घेतले. या आरोपींकडे बनावट जन्म दाखला, आधारकार्ड, पॅन कार्ड आढळून आले. या कागदपत्रांच्या आधारे त्यांनी पासपोर्ट काढले असल्याचे उघडकीस आले आहे. याप्रकरणी सांगवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पतीचे विवाहबाह्य संबंध, पत्नीने व्हायरल केले खासगी फोटो; तक्रारदार महिला म्हणते, 'घरी कोणी नसताना...'

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

विवाहबाह्य संबंधातून शारीरिक संबंध प्रस्थापित केल्यानंतर हे फोटो आणि व्हिडीओ सार्वजनिक करण्याची धमकी दिल्याप्रकरणी एका जोडप्याला मुंबई पोलिसांनी अटक केली आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मध्यवर्ती मुंबईतील एका उच्चभ्रू इमारतीत ही महिला तिच्या पती आणि मुलीबरोबर राहते. पोलिसांना दिलेल्या जबाबात तिने म्हटलंय की २०१७ मध्ये ५४ वर्षीय व्यक्ती त्याच्या पत्नी आणि दोन मुलांसह एकाच मजल्यावर राहण्याची आला होता. २०१९ च्या सुमारास दोघांमध्ये चांगली मैत्री आणि मैत्रीचं रुपांतर नात्यात झालं. 'आम्ही दोघं फोनवर बोलू लागलो. एक दिवस त्याची बायको आणि मुलं घरी नसताना त्याने मला त्याच्या घरी बोलावलं. तेव्हापासून त्यांच्या घरी कोणी नसताना आम्ही त्यांच्या घरी भेटायचो', असं तक्रारदार महिलेने पोलिसांना सांगितलं. मात्र १५ जुलै रोजी तक्रारदार महिलेला त्याच्या पत्नीचा फोन आणि त्यांच्या नात्याबाबत विचारपूस सुरू केली. यानंतर त्याची पत्नी तिच्या घरी गेली आणि त्यांचे खासगी फोटो आणि व्हिडिओ या महिलेला दाखवून धमकावले.

तक्रारदार महिलेचा दावा आहे की आरोपीने गुपचूप त्यांचे फोटो काढले आहेत. हे फोटो



कोणालाही शेअर करू नयेत अशी विनंतीही तक्रारदार महिलेने केली. परंतु, तरीही हे खासगी फोटो आणि व्हिडिओ त्याच्या पत्नीने तक्रारदार महिलेच्या नातेवाईकांना पाठवले. याबाबत तक्रारीत म्हटलंय की, तिने माझी बदनामी केली. त्यामुळे मला आणि माझ्या कुटुंबीयांना खूप मानसिक आघात झाला. परंतु, त्यानंतरही मी पोलिसांत तक्रार दाखल केली नव्हती. मात्र मंगळवारी ते फोटो आणि व्हिडिओ पॉर्न साईट्सवर पोस्ट करण्याची धमकी देण्यात आली.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,**
**प्रशासकीय इमारत, १ ला मजला, भवन्स कॉलेज जवळ,**
**दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.**
E-mail-northmumbai.ee@mahapwd.com दुरध्वनी क्रमांक .०२२-२६२३१९६४ फॅक्स - २६२०५७८८

**ई -निविदा सुचना क्र. ८ सन २०२४-२०२५**

**(फक्त मुंबई उपनगर जिल्हा — पुर्व उपनगरे मजुर सहकारी संस्था यांचे साठी )**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक- २६२३१९६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिका बांधकाम खात्याकडुन योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत मुंबई उपनगर जिल्हा (**पुर्व उपनगरे**) मजूर सहकारी संस्था मार्यादित, मुंबई, कडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https//mahatenders.gov.in येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. नमुद केल्याप्रमाणे अर्जदार मजूर संस्था ज्या उपनगरातील संबंधीत असेल त्याच उपनगरातील कामासाठी अर्ज करु शकतात.

| अ.क्र. | कामाचेनांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | मुळगोण कामांतर्गत इमारत क्र. ९२ नेहरू नगर, कुर्ला, मुंबई येथे बाह्य संरचना दुरुस्ती, आर.सी.सी. सदस्यांचे बळकटीकरण, निवासी इमारतीत प्लास्टरिंग करणे. | रु. २५२७०५८/- |
| २ | मुळगोण कामांतर्गत इमारत क्र. ९२ नेहरू नगर, कुर्ला, मुंबई येथे आतल्या संरचना दुरुस्ती, आर.सी.सी. सदस्यांचे बळकटीकरण, निवासी इमारतीत प्लास्टरिंग करणे. | रु. २५८४४२३/- |
| ३ | मुळगोण कामांतर्गत इमारत क्र. ९४ नेहरू नगर, कुर्ला मुंबई येथे निवासी इमारतीवर टेरेस वॉटरप्रूफिंग डबल्यु.सी. बाथ वॉटरप्रूफिंग प्रदान करणे. | रु. २०४२३८६/- |
| ४ | मुळगोण कामांतर्गत इमारत क्र. १०४ नेहरू नगर, कुर्ला, मुंबई येथे बाह्य संरचना दुरुस्ती, आर.सी.सी. सदस्यांचे बळकटीकरण, निवासी इमारतीत प्लास्टरिंग करणे. | रु.२६६२०९८/- |
| ५ | मुळगोण कामांतर्गत इमारत क्र. १०४ नेहरू नगर, कुर्ला, मुंबई येथे आतल्या संरचना दुरुस्ती, आर.सी.सी. सदस्यांचे बळकटीकरण, निवासी इमारतीत प्लास्टरिंग करणे. | रु. २७२४६४१/- |
| ६ | मुळगोण कामांतर्गत इमारत क्र. १०४ नेहरू नगर, कुर्ला मुंबई येथे निवासी इमारतीवर टेरेस वॉटरप्रूफिंग डबल्यु.सी. बाथ वॉटरप्रूफिंग प्रदान करणे. | रु. १७७९९४६/- |
| ७ | मुळगोण कामांतर्गत इमारत क्र. १०६ नेहरू नगर, कुर्ला, मुंबई येथे आतल्या संरचना दुरुस्ती, आर.सी.सी. सदस्यांचे बळकटीकरण, निवासी इमारतीत प्लास्टरिंग करणे. | रु. २७२४६४१/- |

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता , उत्तर मुंबई(सा.बां) विभाग, अंधेरी (प.) मुंबई ५८.यांनी राखून ठेवला आहे.अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

**ई-निविदाउपलब्धकालावधी- दि. ०६/०८/२०२४ ते दि.१३/०८/२०२४ पर्यंत**
**ई-निविदा उघडणे- दि. १४/०८/२०२४**

जा.क्र.काअ/उमुंवि/निविदा/ ७३८१
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग, प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,अंधेरी (प.) मुंबई ५८.
दिनांक :. 30 JUL 2024

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
अंधेरी (प.) मुंबई ५८.

**डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/१६२१**


# महागड्या दुचाकी चोरणाऱ्या सराईत आरोपीला अटक

**मुंबई : विशेष प्रतिनिधी**

घराबाहेर पार्क केलेल्या महागड्या दुचाकी चोरून त्यांची विक्री करणाऱ्या एका सराईत आरोपीला ट्रॉम्बे पोलिसांनी अटक केली आहे. या आरोपीच्या ताब्यातून पोलिसांनी तीन दुचाकी हस्तगत केल्या असून पोलीस याबाबत अधिक



तपास करत आहेत. ट्रॉम्बेच्या चिता कॅम्प परिसरात राहणारे अन्वर खान (२८) या तरुणाने त्याची दुचाकी ३० जुलैला घराजवळ उभी केली होती. मात्र त्याच रात्री चोरट्याने बनावट चावीच्या आधारे ती चोरून पोबारा केला. याबाबत खान यांनी ट्रॉम्बे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. परिसरातील काही सीसीटीव्ही चित्रण ताब्यात घेऊन पोलिसांनी पाहणी केली असता त्यात आरोपीचा चेहरा कैद झाला होता. त्यानुसार पोलिसांनी आरोपीची ओळख पटवून चिता कॅम्प परिसरातूनच त्याला अटक केली. फरदिन सय्यद (१९) असे आरोपीचे नाव असून तो त्याच परिसरातील राहणारा आहे.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा. बां.) विभाग,**
**प्रशासकीय इमारत, १ ला मजला,**
**भवन्स कॉलेज जवळ, दादाभाई रोड, अंधेरी (प.), मुंबई- ४०००५८.**
E-mail-northmumbai.ee@mahapwd.gov.in

**ई -निविदा सुचना क्र. ५ सन २०२४-२०२५ (शुध्दीपत्रक क्र. ०१)**

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, मुंबई (दुरध्वनी/फॅक्स क्रमांक- २६२३१९६४/२६२०५७८८) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडुन योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडुन खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https//mahatenders.gov.in व **www.mahapwd.com** येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां.) मंडळ, फोर्ट, मुंबई तसेच कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग, अंधेरी (प.), मुंबई यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र | कामाचेनांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | वांद्रे (प.) मुंबई येथील ४० पोलीस क्यूटर्स "एफ" बिल्डींग वॉटरफाईल्ड रोड येथे टेरेसवर कोरेगेटेड शीट रूफिंग शेड (मानसून शेड) प्रदान करणे आणि उभारणे. | रु. २३०६३३०/- |
| २ | विशेष दुरुस्ती अंतर्गत इएसआयएस रुगणालय येथे प्रकार-४. मुलुंडमध्ये अर्धवट प्लास्टर आणि पेंटिंग, पाणीपुरवठा लाईन आणि इतर विविध कामाची दुरुस्ती करणे. | रु. २४८९५८२/- |
| ३ | विविक्षित दुरुस्ती अंतर्गत अंधेरी निवडणूक कार्यालय जोगेश्वरी (पू) मुंबई येथे प्लास्टर, पेंटिंग, दरवाजा, खिडकी, छप्पर, फरशी दुरुस्ती करणे. | रु. ५६१२३९५/- |
| ४ | विविक्षित दुरुस्ती अंतर्गत जोगेश्वरी निवडणूक कार्यालय जोगेश्वरी (पू) मुंबई येथे प्लास्टर, पेंटिंग, दरवाजा, खिडकी, छप्पर, फरशी दुरुस्ती करणे. | रु. ५९८०२५५/- |
| ५ | विविक्षित दुरुस्ती अंतर्गत भास्कर न्यायालयाच्या इमारतीतील पाणी पुरवठा आणि सॅनिटरी फिटिंगची दुरुस्ती व नूतनीकरण करणे (लहान कारण आणि अतिरिक्त. मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय वांद्रे (ई) मुंबई) | रु. ४१९७४२२/- |
| ६ | विशेष दुरुस्ती अंतर्गत जीएसटी भवन वांद्रे इमारत क्र. अ (पॉलिमर पॅल्स्टर, टॉयलेट ब्लॉक आणि पेंटिंग काम) | रु. २१०६९८२/- |
| ७ | विशेष दुरुस्ती अंतर्गत जीएसटी भवन वांद्रे इमारत क्र. ब (पॉलिमर पॅल्स्टर, टॉयलेट ब्लॉक आणि पेंटिंग काम) | रु. २१०६०९७- |
| ८ | मुळगोन कामांतर्गत कँटीन स्टोअर डिपार्टमेंट घाटकोपर, मुंबई येथे गवत काढणे, झाडे तोडणे आणि परिसराभोवती कडक कुरकुर करणे. | रु. १२१९०५४/- |
| ९ | मुळगोन कामांतर्गत मुलुंड पोलीस स्टेशन, मुलुंड (प.) मुंबई येथे टॉयलेट ब्लॉकचे नूतनीकरण करणे | रु. २७५८२६३/- |
| १० | मुलुंड पोलीस स्टेशन बिल्डी. मुलुंड (प) मुंबई येथे टेरेस वॉटर प्रूफिंग आणि ओव्हरहेड पाण्याची टाकी. | रु. १७७४४४४/- |

टिप :- वरिल "ई" निविदा सुचना https//mahatenders.gov.in व www.mahapwd.com येथे पहावयास तसेच डाऊनलोड करावयास मिळेल. सदर निविदे सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास या वेब साईटवर कळविण्यांत येईल.
ई- निविदा उपलब्ध कालावधी- दि. ०५.०८.२०२४ ते दि. १२.०८.२०२४ पर्यंत
ई - निविदा उघडणे - दि. १३.०८.२०२४ दुपारी १५.०० वाजता.

जा.क्र.काअ/उमुंवि/निविदा/ ७३८९
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
उत्तर मुंबई(सा.बां) विभाग,
प्रशासकीय इमारत, १ ला मजला,
भवन्स कॉलेजजवळ, दादाभाई मार्ग,
अंधेरी (प.) मुंबई ५८. दिनांक :- 30 JUL 2024

कार्यकारी अभियंता,
उत्तर मुंबई (सा.बां.) विभाग,
अंधेरी, मुंबई.

**डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/१५६६**

# अधिक किंमतीत रक्त विकणाऱ्या पेढ्यांवर कारवाई, १ कोटी रुपयांची दंड वसुली, हिंदूजा रुग्णालयाचा दोन वर्षांचा दंड थकीत

■ मुंबई : नितीन देवळेकर

रक्तपेढ्यांनी अतिरिक्त किंमतीत रक्त विकल्याप्रकरणी रक्त संक्रमण परिषदेने (एसबीटीसी) १ कोटी ३२ लाख ९२ हजार रुपये दंडापोटी वसूल केले आहेत. मुंबईतील २१ खासगी रुग्णालयांच्या रक्तपेढ्यांकडून ही रक्कम वसूल करण्यात आली आहे. मात्र एका खासगी रुग्णालयाने दोन वर्षे उलटली तरी दंडाची रक्कम भरण्यास टाळाटाळ केल्याचे माहिती अधिकारातून उघड झाले आहे.

रुग्णांना अल्पदरात रक्त उपलब्ध व्हावे यासाठी केंद्र सरकारच्या सूचनेनुसार राज्य सरकारच्या राज्य रक्त संक्रमण परिषदेने (एसबीटीसी) रक्ताचे शुल्क निर्धारित केले होते. मात्र खासगी रुग्णालयाकडून त्याचे उल्लंघन होत असल्याने राज्य सरकारने २०१८ मध्ये अतिरिक्त शुल्क आकारणाऱ्या रक्तपेढ्यांवर चार पट दंड आकारण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र त्यापूर्वी या नियमाचे उल्लंघन केलेल्या रक्तपेढ्यांचा दंडही थकला असल्याचे माहिती अधिकारातून उघडकीस आले आहे. एसबीटीसीने २०१४ ते २०१८ या कालावधीत अतिरिक्त किंमतीत रक्त देणाऱ्या २१ रक्तपेढ्यांकडून दंडापोटी १ कोटी ३२ लाख ९२ हजार वसूल केले. त्यात सर्वाधिक दंड हा हिंदूजा रुग्णालयाकडून ३३ लाख ३० हजार रुपये इतका दंड वसूल केला आहे. त्याखालोखाल जसलोक रुग्णालयाकडून १७ लाख ३७ हजार रुपये, कोकीलाबेन रुग्णालय १४ लाख ७२ हजार रुपये, मुंबई रुग्णालय १२ लाख ६२ हजार रुपये, फोर्टीस रुग्णालय ९ लाख ३४ हजार रुपये इतके दंड वसूल करण्यात आले आहेत. मात्र हिंदूजा रुग्णालयाच्या एकूण



दंडाच्या रकमेपैकी त्यांनी फक्त ३३ लाख भरले असून उर्वरित १५ लाख ७३ हजार ९३५ रुपयांचा दंड दोन वर्षांपासून भरलेला नाही. हा दंड भरण्यासाठी एसबीटीसीकडून वारंवार पाठपुरावा करण्यात येत असूनही त्याला प्रतिसाद मिळत नसल्याचे माहिती अधिकारातून उघडकीस आले आहे.


एसबीटीसीने आकारलेल्या दंडामध्ये थॅलेसेमिया सारख्या रुग्णांना मोफत रक्त दिलेल्या रक्ताचा तसेच लेखा परीक्षकांनीही काही दंड पुन्हा आकारला असल्याचा दावा हिंदूजा रुग्णालयाने केला होता. मात्र एसबीटीसीने झालेली चूक सुधारल्यानंतर सुधारित दंडापैकी १५ लाख रुपये रुग्णालयाने भरले नसल्याचे माहिती अधिकारात मिळालेल्या उत्तरातून दिसते आहे. माहिती अधिकार कार्यकर्ते चेतन कोठारी यांनी ही माहिती मागितली होती. आकारलेल्या अतिरिक्त शुल्काच्या रकमेवर २० टक्क्यांपेक्षा अधिक दंड आकारणे अपेक्षित होते. हिंदुजा आणि एसबीटीसी यांच्यातील हे प्रकरण मागील दोन वर्षांपासून प्रलंबित आहे. त्यामुळे आता एसबीटीसीने या दंडाच्या रकमेवर व्याज आकारून त्याची वसूली करावी, असे कोठारी यांनी सांगितले.

पी.डी. हिंदुजा रुग्णालय हे दर्जेदार आरोग्य सेवा देण्यासाठी ओळखले जाते. उच्च दर्जाची आरोग्य सेवा पुरवण्यावर रुग्णालयातर्फे नेहमीच भर दिला जातो. त्यासाठी सर्व मार्गदर्शक तत्त्वांचे आणि शिफारशींचे संबधित अधिकाऱ्यांकडून काटेकोरपणे पालन केले जाते. त्यानुसार राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या सर्व नियमांचे नेहमीच पालन केले असून, त्यांना सहकार्य केले आहे.

# मी ढेकणाला आव्हान देत नाही', उद्धव ठाकरेंची पुन्हा एकदा देवेंद्र फडणवीसांवर टीका; म्हणाले...

■ मुंबई : यश सावंत

'दोन दिवसांपूर्वी मुंबईतल्या सभेत बोललो की, एक तर तू राहशील किंवा मी राहिल. माझ्या पायाशी कलिंगड ठेवलेलं होतं. त्यामुळे काही जणांना वाटलं मी त्यांना आव्हान दिलं. मी कोणत्याही ढेकणाला आव्हान देत नाही. मी म्हणजे कोण आणि तू म्हणजे कोण? याची संकल्पना उद्धव ठाकरे यांनी सांगितली. मी म्हणजे माझा संस्कारी महाराष्ट्र आणि तू म्हणजे महाराष्ट्रावर दरोडे टाकणाऱ्या दरोडेखोरांचा पक्ष. ढेकणाला कधी आव्हान दिलं जात नाही, ढेकणं चिरडायची असतात. कुणीतरी हे आव्हान स्वतःवर घेतलं. त्यानं सांगितलं माझ्या नादाला लागू नका. मी म्हणतो, तुझ्या नादाला लागण्याएवढ्या



किंमतीचा तू नाहीच आहेस', अशी टीका शिवसेना उबाठा गटाचे नेते उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर केली. आज पुण्यामध्ये उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवसेनेच्या पुण्यातील पदाधिकाऱ्यांचा मेळावा संपन्न झाला. यावेळी त्यांनी भाजपावर पुन्हा एकदा टीकास्त्र सोडले. 'बऱ्याच वर्षांनंतर मी पुण्यात येत आहे. यापुढे लढाई मैदानात होणार, हॉलमध्ये होणार नाही', असेही आव्हान त्यांनी यावेळी दिले.

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले, काही दिवसांपूर्वी पुण्यात भाजपाचा एक कार्यक्रम झाला. इतिहासात आपण डोकावलं, तर शाहिस्तेखान जरा तरी हुशार होता, असं म्हणावं लागेल. त्याचं बोटावर निभावलं. तीन बोटं कापली गेल्यानंतर पुन्हा महाराष्ट्रात नाही आला. त्यातनं काही शहाणपण यांनी घेतले असते तर परत महाराष्ट्रात आले नसते, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी अप्रत्यक्षरित्या केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर टीका केली. 'पण ते (अमित शाह) परत का आले? तर महाराष्ट्राच्या जनतेने दिलेल्या फटक्यांचे वळ कुणाकुणाच्या अंगावर उमटले. हे पाहण्यासाठी ते आले. अहमदशाह अब्दालीचा राजकीय वंशज हा पुण्यात आला होता. तो अहमद शाह होता आणि हे अमित शाह आहेत. अहमद शाहचा राजकीय वशंच इथे वळवळायला आला होता.

# अतिवृष्टीमुळे सांगलीतील ११६ गावे बाधित, साडेआठ हजार हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान

■ सांगली : गणेश बागडे

**अतिवृष्टी व सततचा पाऊस यामुळे जिल्ह्यातील ११६ गावे बाधित झाली असून, साडेआठ हजार हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी दिली. जिल्ह्यात आतापर्यंत ५ हजार १४५ नागरिकांचे स्थलांतर झाले असल्याचेही त्यांनी सांगितले.**

जिल्ह्यात शिराळा वगळता अन्य ठिकाणी शनिवारी पावसाने विश्रांती घेतली असली, तरी विविध धरणांतून करण्यात येत असलेल्या विसर्गामुळे येत्या २४ तासांत कृष्णेच्या पाणी पातळीमध्ये एक ते दोन फुटांनी वाढ अपेक्षित असून, नदीकाठी सतर्क राहण्याचा इशारा जिल्हा प्रशासनाने दिला आहे.

शुक्रवारी रात्रीपासून



आयर्विन पुलाजवळ कृष्णा नदीची पाणीपातळी ३९ फूट १० इंचावर स्थिर आहे. तथापि, सातारा जिल्ह्यात दोन दिवस अतिमुसळधार पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. कोयनेतून ५२ हजार १०० आणि चांदोली धरणातून ११ हजार ५३९ क्युसेक विसर्ग सुरू आहे. पडणारा पाऊस, धरणातून होत असलेला विसर्ग यामुळे नदीच्या पाणी पातळीत वाढ गृहीत धरून नदीकाठच्या रहिवाशांनी सतर्क राहावे, असा इशारा जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी दिला आहे.

जिल्हाधिकारी म्हणाले, की अतिवृष्टी व सततचा पाऊस यामुळे ११६ गावांतील ८ हजार ५५६ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्याचा आदेश दिला आहे. राज्य मार्ग ५, प्रमुख जिल्हा मार्ग २१ व ग्रामीण मार्ग ११ पाण्याखाली गेले आहेत. आपत्तीचा सामना करण्यासाठी एन.डी.आर.एफ. पथक (३० जवान) ५ जूनपासून व एक सैन्य दल पथक (१०७ जवान) २६ जुलैपासून जिल्ह्यात तैनात आहे. त्यांच्या वतीने ठिकठिकाणी रंगीत तालीम घेण्यात आली आहे.

# निवडणुकीच्या तोंडावर अजित पवार, राज ठाकरे यांच्या यात्रा तर उद्धव ठाकरे यांचे मेळावे

■ मुंबई : गणेश बागडे

विधानसभा निवडणूक जवळ येऊन ठेपल्याने नेतेमंडळींचे दौरे व मतदारांशी संपर्क अभियान सुरू झाले आहे. मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांची नवनिर्माण यात्रा सुरू झाली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांची जनसन्मान यात्रा येत्या गुरुवारपासून सुरू होत आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे शिवसंकल्प मेळाव्यांच्या माध्यमातून पक्षाचे नेते व कार्यकर्त्यांशी संवाद साधत आहेत. निवडणुकीच्या तोंडावर आयोजित करण्यात येणाऱ्या यात्रांचा राजकीय नेत्यांना फायदा होते. लोकसभा निवडणुकीपूर्वी दोन टप्प्यांमध्ये काढलेल्या 'भारत जोडो' यात्रेमुळे काँग्रेस नेते राहुल गांधी यांचा आत्मविश्वास बळावला होता. लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला



या यात्रेचा फायदाही झाला. २००४च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी आंध्र प्रदेशमध्ये तत्कालीन काँग्रेस नेते वाय. एस. राजशेखर रेड्डी यांनी काढलेल्या पदयात्रेचे राज्याचे राजकीय चित्रच बदलले होते.

# वक्फ बोर्डाच्या अधिकारांवर नियंत्रण येणार? मंत्रिमंडळाच्या बैठकीतील निर्णयाची चर्चा!

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

कोणत्याही मालमत्तेला वक्फ मालमत्ता घोषित करण्याच्या वक्फ बोर्डाच्या अधिकारांवर सरकार नियंत्रण आणण्याच्या प्रयत्नात आहे. प्रस्तावित सुधारणांनुसार वक्फ बोर्डाने केलेल्या सर्व मालमत्तेच्या दाव्यांसाठी अनिवार्य पडताळणी आवश्यक असेल. वक्फ बोर्डाच्या वादग्रस्त मालमत्तांसाठी हीच पडताळणी प्रक्रिया प्रस्तावित आहे. वक्फ कायद्यात सुधारणा करणारे विधेयक पुढील आठवड्यात संसदेत मांडले जाण्याची शक्यता आहे, असं सूत्रांनी सांगितलं.सरकारने यापूर्वी कोणत्याही मालमत्तेवर दावा करण्यासाठी राज्य वक्फ बोर्डांचे व्यापक अधिकार आणि बहुतेक राज्यांमध्ये अशा मालमत्तांचे सर्वेक्षण करण्यात होणारा विलंब लक्षात घेतला



होता. तसंच गैरवापर टाळण्यासाठी वक्फ मालमत्तेचे निरीक्षण करण्यासाठी जिल्हा दंडाधिकाऱ्यांना सहभागी करून घेण्याचाही प्रयत्न आहे. २०१३ मध्ये यूपीए सरकारने वक्फ बोर्डांना अधिक व्यापक अधिकार देण्यासाठी मूळ कायद्यात सुधारणा केली. हे बदल वक्फ अधिकारी, वैयक्तिक मालमत्तेचे मालक आणि भारतीय पुरातत्व सर्वेक्षणसारख्या राज्य संस्थांमध्ये वादाचे प्रमुख मुद्दे होते.

अल्लाह आणि इस्लामच्या नावावर धर्मादाय हेतूने दान केलेली संपत्ती म्हणजे 'वक्फ' होय. कायदेशीर भाषेत सांगायचे झाल्यास, इस्लामचे पालन करणाऱ्या व्यक्तीकडून कायमस्वरूपी दान केलेली मालमत्ता म्हणजे वक्फ होय. मग ही मालमत्ता स्थावर आणि जंगम अशा दोन्ही स्वरुपाची असू शकते. मुस्लिमांसाठी पवित्र, धार्मिक किंवा धर्मादाय ठरत असलेल्या कोणत्याही परोपकारी कारणासाठी ही संपत्ती दान केलेली असू शकते. ही मालमत्ता चांगल्या कामासाठी समाजाची मालमत्ता म्हणून ओळखली जाते आणि अल्लाहशिवाय कुणीही त्या मालमत्तेचे मालक असत नाही आणि होऊही शकत नाही, असे मानले जाते. एखाद्या मालमत्तेचा दीर्घ कालावधीसाठी धार्मिक किंवा धर्मादाय हेतूंसाठी वापर केला जात असल्यास ती वक्फ मानली जाऊ शकते. या मालमत्तेचा वापर सामान्यतः शैक्षणिक संस्था, स्मशानभूमी, मशिदी आणि निवारा गृहे चालवण्यासाठी केला जातो.

# मुख्य प्रवाहातून बाहेर असल्यानेच मराठा समाज आरक्षणास पात्र, राज्य मागासवर्ग आयोगाची उच्च न्यायालयात भूमिका

■ मुंबई : सम्यक कासारे

भारतासारख्या उच्च आर्थिक वृद्धी असलेल्या देशात, सामान्यतः सर्व पैलू प्रगतीशील असणे अपेक्षित आहे. परंतु, मराठा समाजाच्या बाबतीत ही स्थिती नाही. किंबहुना, सध्याच्या आर्थिक परिस्थितीच्या विरोधात, मराठ्यांची दयनीय आर्थिक स्थिती ही त्यांचे असामान्य आणि असाधारण आर्थिक मागासलेपण दर्शवते. हा समाज मुख्य प्रवाहातून बाहेर ढकलला गेला आहे. त्यामुळे, मराठा समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात आरक्षण देण्याची गरज आहे, असा दावा राज्य मागासवर्ग आयोगाने उच्च न्यायालयात केला आहे.

मराठा समाजाला आरक्षणा देण्याची शिफारस करताना परिमाणात्मक संशोधन आणि अभ्यास केला गेला. शिवाय, मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत यापूर्वीच्या आयोगांनी दिलेले अहवाल आणि केलेल्या शिफारशींचाही अभ्यास करण्यात आला. या सगळ्यांतून राज्यात मराठा समाजाला तुच्छतेने पाहिले जात असल्याचे आणि या समाजात अपवादात्मक मागासलेपण असल्याचे समोर आल्याचा दावाही मराठा समाजाला सरकारी नोकऱ्या देताना आणि शिक्षणात १० टक्के आरक्षणाची शिफरस करण्याच्या निर्णयाचे समर्थन करताना निवृत्त न्यायमूर्ती सुनील शुक्रे यांच्या राज्य मागासवर्ग आयोगाने उच्च न्यायालयात दाखल प्रतिज्ञापत्रात केला आहे. राज्य मागासवर्ग आयोगाला प्रतिवादी करण्याचा आग्रह काही आरक्षणविरोधी याचिकाकर्त्यांनी केला होता. त्यानंतर, आयोगाला प्रतिवादी करण्यात आले. मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय, न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती फिरदोश पुनीवाला यांच्या



विशेष पूर्णपीठाने आयोगाला सगळ्या याचिकांवर एकत्रित उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार, आयोगाने प्रतिज्ञापत्र सादर करून या प्रकरणी भूमिका स्पष्ट केली.

भारतासारख्या उच्च आर्थिक वृद्धी असलेल्या समाजात सामान्यतः सर्व पैलूंवर प्रगतीशील कल अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर, मागासलेपणाकडे अपवादात्मक आणि सामान्यपणाच्या परिणामापलीकडे पाहणे आवश्यक होते. परंतु मराठा समाजाच्या बाबतीत ही स्थिती नाही. त्यांचे मागासलेपण आणि दयनीय आर्थिक स्थिती लक्षात घेता मराठा समाजाला मुख्य प्रवाहाचा भाग मानले जाऊ शकत नाही, असे आयोगाने नमूद केले आहे. मराठा समाजाचे मागासलेपण तपासताना विशेषतः जात, पारंपरिक व्यवसाय तसेच सध्याचे व्यवसाय यांचा विचार करता त्यात मोठ्या प्रमाणात व गंभीर स्वरुपाची तफावत दिसून येते. मराठा समाजातील महिला आणि पुरुष दोघेही मोठ्या प्रमाणावर अंगमेहनतीची कामे करत असल्याचेही अभ्यासात स्पष्ट झाले आहे, असेही नमूद करण्यात आले आहे.

मराठा समाज आणि खुल्या प्रवर्गातील व्यक्तींचे राहणीमान, जमीन मालकी आणि आर्थिक दायित्वांमधील लक्षणीय असमानता दिसून येते. याशिवाय, मराठा समाजातील दारिद्र्याचा दर उच्च असून मराठा समाजातील बहुतांश लोक कच्च्या घरांतच अद्याप राहतात. मराठा समाजाकडून कर्ज घेण्याचे प्रमाण अधिक असल्याचो आयोगानो प्रतिज्ञापत्रात म्हटले आहे.

# 'ओबीसी आरक्षणाला १०० टक्के धोका, कुणबी मराठा हे खरे...', प्रकाश आंबेडकर यांचं वक्तव्य

■ सोलापूर : गणेश बागडे

महाराष्ट्रात मराठा आरक्षणाचा प्रश्न चर्चेत आहे. मागील एक ते दीड वर्षापासून मनोज जरांगेंनी मराठा आरक्षणाची मागणी लावून धरली आहे. आम्हाला ओबीसीतून आरक्षण हवं आणि सगे सोयऱ्यांच्या अंमलबजावणीसह आरक्षण हवं असं मनोज जरांगेंनी म्हटलं आहे. तर ओबीसी समाजाने आमच्या आरक्षणातून मराठ्यांना आरक्षण देऊ नये असं म्हटलं आहे. अशात आता प्रकाश आंबेडकर यांनी ओबीसी आरक्षणाला १०० टक्के धोका आहे असं वक्तव्य केलं आहे.'कुणबी मराठ्यांपासून सावध राहा. कुणबी हे स्वतःला ओबीसी समजत असले तरीही सभागृहात मी मराठ्यांसह आहे असं आमदार सांगतो. याचाच अर्थ तो आमदार धनगरांबरोबर, माळी समाजाबरोबर, वंजारी, लिंगायत, बंजारा समाजाबरोबर नाही. तसंच तो तेली, तांबोळी, लोहार, सोनार यांच्याबरोबर तर अजिबात नाही' असं प्रकाश आंबेडकर म्हणाले.

मी तुम्हाला जे सांगतो आहे ते लक्षात घ्या. ओबीसी आरक्षणाला धोका आहे. हा धोका १०० टक्के आहे. निवडणूक पार पडल्यानंतर हा धोका निर्माण होईल हे



विसरु नका. तसंच जातनिहाय जनगणना झाली पाहिजे अशीही मागणी प्रकाश आंबेडकर यांनी केली आहे.'कुणबी मराठा हे खरे ओबीसी नाहीत, त्यामुळे त्यांच्यापासून सावध राहा. विधीमंडळ सभागृहात १९० कुणबी मराठा आमदार आहेत. तर ओबीसी आमदार हे फक्त ११ आहेत. त्यामुळे ओबीसी आरक्षणाला १०० टक्के धोका आहे.' असं खळबळजनक वक्तव्य प्रकाश आंबेडकर यांनी केलं आहे. प्रकाश आंबेडकर हे आरक्षणाच्या मुद्द्यावर रोज भाष्य करत आहेत. शनिवारीच त्यांनी शरद पवार हे मराठा आणि ओबीसी समाजात आग लावण्याचं काम करत आहेत असं प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं होतं.

मराठा आणि ओबीसी यांच्यात वाद लावण्याचं काम राजकीय पक्ष करत आहेत. शरद पवारांचं स्टेटमेंट आलं महाराष्ट्राचा मणिपूर करु नका. त्यांचं हे वक्तव्य आग लावणारं आहे. उद्धव ठाकरेंची जी भूमिका आहे की तुम्ही नरेंद्र मोदींकडे जा आणि जागा वाढवून घ्या त्यानंतर मराठ्यांना ओबीसीत घेऊ आणि आरक्षणाकडे नेऊ. हे बोलणं चिथावणी देणारं आहे. अशी अनेक वक्तव्यं येत आहेत, ज्यातून चिथावणी मिळते आहे.

# राजकीय खटले मागे: मराठा आंदोलनाचा फटका बसल्याने राज्य सरकारची खबरदारी

■ मुंबई : राकेश गायकवाड

मराठा आंदोलनाची धग लोकसभा निवडणुकीत बसलेल्या महायुती सरकारने आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मराठा आंदोलकांसह विविध राजकीय खटले मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भातील शासकीय आदेश शुक्रवारी प्रसिद्ध करण्यात आला. मराठा आरक्षण तसेच मराठा समाजास कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या मागणीवरून राज्यात गेल्या काही काळापासून सुरू असलेल्या राजकीय आणि सामाजिक आंदोलनातील मराठा कार्यकर्त्यांवर दाखल झालेले खटले मागे घेण्याची मागणी मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी केली होती.

येत्या ३१ ऑगस्टपर्यंत आरोपपत्र दाखल होऊ शकेल असे खटले मागे घेण्याचे आदेश पोलिसांना देण्यात आले आहेत. राज्यात जून २०२२मध्ये महायुतीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर २० सप्टेंबरच्या शासन निर्णयाद्वारे राजकीय आणि सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेण्याचा पहिला निर्णय घेत सत्ताधाऱ्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना दिलासा दिला होता. मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली गेले वर्षभर आंदोलन सुरू आहे. ऑक्टोबर २०२३मध्ये या आंदोलनादरम्यान मराठवाड्यात हे आंदोलन हिंसक झाल्यानंतर



दोन आमदारांच्या घरावर हल्ला आणि जाळपोळ करण्यात आली होती. त्यात पोलिसांनी मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांवर मोठ्या प्रमाणात गुन्हे दाखल केले होते. मात्र या हिंसाचाराशी मराठा आंदोलनाचा संबंध नसून आंदोलनाला बदनाम करण्यासाठी समाजकंटकांनीच हा हिंसाचार घडवून आणल्याचा दावा करीत खटले मागे घेण्याची मागणी मनोज जरांगे पाटील यांनी लावून धरली होती. हे खटले मागे घेतले नाहीत तर विधानसभा निवडणुकीत महायुतीविरोधात जाण्याचा इशाराही त्यांनी दिला होता. त्याची दखल घेत सरकारने आता हे खटले मागे घेण्याचा निर्णय घेतल्याची माहिती गृह विभागातील सूत्रांनी दिली.

मराठा आंदोलकांवरील खटले मागे घेण्याबाबत गृहविभागाने शासन निर्णय निर्गमित केला असून त्यात राजकीय आणि सामाजिक आंदोलनातील ज्या गुन्ह्यांमध्ये जीवितहानी झालेली नसेल तसेच खासगी वा सार्वजनिक मालमत्तेचे पाच लाखपेक्षा अधिक नुकसान झालेले नसेल अशा गुन्ह्यात ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत दोषारोपपत्र दाखल होतील असे खटले मागे घेण्याचे आदेश पोलिसांना देण्यात आले आहेत. पाच लाखांपर्यंतच्या नुकसानीचे खटले मागे घेताना संबंधितांनी नुकसानभरपाई भरण्याची लेखी संमती दिल्यास हे खटले मागे घ्यावेत.